रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८९ | अंक २६६ | पृष्ठे १० | RGD/016/2026-28
www.krushival.in

## शासकीय जमिनीतून उत्खनन महागात

**रायगड :** शासकीय जमिनीमधून बेकायदेशीररित्या खनिजांचे उत्खनन करणाऱ्यांना मुरूड न्यायालयाने दणका दिला आहे. चोरी केल्याच्या आरोपाखाली जप्त करण्यात आलेला जेसीबी अंतरिम ताब्यात देण्याची मागणी न्यायालयाने फेटाळून लावली आहे. यावरील पुढील सुनावणी १२ मार्चला होणार असल्याची माहिती उपलब्ध झाली आहे. संबंधित प्रकरणात तहसीलदारांनी ७५ ब्रास खडीच्या बेकायदेशीर उत्खननासाठी ११ लाख रुपयांचा दंड आकारला होता. जो अद्याप भरला नाही. तहसीलदारांनी लेखी आदेश देऊनही पान २ वर


# कृषीवल

रायगड, शुक्रवार, दि. ६ मार्च २०२६

किंमत ४ ₹


## युद्धामुळे जागतिक बाजाराला फटका

**नवी दिल्ली :** इराणवरील इस्रायल आणि अमेरिकेचे हल्ले आणि तेहरानच्या प्रत्युत्तरात्मक कारवायांमुळे केवळ मध्य पूर्वेतील वातावरण तापले नाही तर त्याचा परिणाम संपूर्ण जगावर झाला आहे. जागतिकीकरणाच्या या युगात सर्व देश एकमेकांशी जोडलेले आहेत. त्यामुळे एका देशातील कोणत्याही चांगल्या किंवा वाईट कृतीचा दुसऱ्या देशातील व्यवहारावर परिणाम होतो. त्याचप्रमाणे इराणवरील युद्धामुळे भारतात अनेक गोष्टी महाग झाल्या आहेत. या युद्धजन्य वातावरणात सोने आणि चांदीच्या किमती वाढल्या आहेत.

## वे|ध|क

### धर्मांतरणाला बसणार आळा

**मुंबई :** महाराष्ट्रातील फडणवीस सरकारने दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या धर्मांतरणविरोधी विधेयकाला गुरूवारी (दि.५) अखेर मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी दिली. आता लवकरच हे विधेयक विधानसभेत मांडले जाणार असून त्यानंतर शासन निर्णय जारी केला जाणार आहे. मंत्रिमंडळ बैठकीनंतर मंत्री नितेश राणे यांनी ही माहिती दिली. नवीन प्रस्तावित कायद्यानुसार जर कोणी जबरदस्ती, फसवणूक किंवा प्रलोभन देऊन धर्मांतरण घडवून आणले, तर त्याच्यावर नॉन-बेलेबल गुन्हा दाखल केला जाईल.

### ‘३० जूनपूर्वी शेतकरी कर्जमाफी’

**मुंबई :** शेतकरी कर्जमाफीबाबत प्रवीण परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली असून एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात अहवाल अपेक्षित आहे. त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार हे ३० जूनपूर्वी शेतकरी कर्जमाफीबाबत निर्णय जाहीर करतील, अशी हमी कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली. कलम २६० अन्वये झालेल्या चर्चेला उत्तर देताना कृषिमंत्री भरणे यांनी शेतकऱ्यांच्या हितासाठी शासन कटिबद्ध असल्याचे स्पष्ट केले.

### पाणीबचतीसाठी जिल्हा प्रशासन अलर्ट मोडवर

# रायगडवर जलसंकट




**| रायगड | प्रमोद जाधव |**

जिल्ह्यातील लाखो नागरिकांना पाणी पुरवठा करणाऱ्या लघु पाटबंधारे विभागाच्या २८ धरणांमधील जलसाठा दिवसेंदिवस कमी होत आहे. पाण्याच्या पातळीत घट होत आहे. त्यामुळे आगामी उन्हाळ्यात पाणी टंचाईचे संकट ओढवण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. जिल्हयात यंदा समाधानकारक पाऊस पडला असला, तरी धरणांमधील जलसाठा कमी होत असल्याने पाणी टंचाईची समस्या भेडसावण्याची भीती निर्माण झाली आहे. सध्या या धरणांमध्ये ५४ टक्के जलसाठा शिल्लक आहे.

ग्रामीण भागातील अनेक गावे या धरणांवर अवलंबून असल्याने जलसाठा आणखी कमी झाल्यास टँकरद्वारे पाणीपुरवठ्याची वेळ येऊ शकते. त्यामुळे पाण्याचा वापर जपून करण्याबरोबरच अनावश्यक अपव्यय टाळण्याचे आवाहन संबंधित विभागाकडून करण्यात येत आहे. दरम्यान, पाणी टंचाईची परिस्थिती निर्माण होऊ नये यासाठी प्रशासनाने धरणांमधील जलसाठ्यावर सतत लक्ष ठेवले असून, आवश्यक त्या उपाययोजना करण्याची तयारी सुरू असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

अनेक जिल्ह्यामध्ये लघुपाट बंधारे विभागाच्या अखत्यारित २८ धरणे आहेत. त्यात सुधागड तालुक्यात पाच, श्रीवर्धनमध्ये तीन, म्हसळ्यामध्ये दोन, महाडमध्ये चार, खालापूर तीन, पनवेल तीन, कर्जत दोन, उरण, मुरुड, तळा, रोहा, पेण व अलिबाग या तालुक्यांमध्ये प्रत्येकी पान २ वर

### शिल्लक जलसाठ्याची टक्केवारी

फणसाड-६0, वावा-८१, सुतारवाडी-७८, आंबेघर-७७, श्रीगांव-५४, कोंडगाव-३६, घोटवडे - १८, ढोकशेत - 00, कवेळ - २८,उन्हेरे - २१, कार्ले - ५९, कुडकी - ६३, रानीवली - २५,पाभरे - ६८, संदेरी-१00, वरंध - ५७, खिंडवाडी - ५८, कोथुर्डे -४७, खैरे - ५९,साळोख -४६, अवसरे - ५१,भिलवले - ६२, कलोते मोकाशी - ७0, डोणवत - ४६, मोरबे-७६, बामणोली - ७४,उसरण - ६६,पुनाडे - ३३ टक्के.

### नद्या तळ गाठण्याच्या स्थितीत

महाडमधील सावित्री, नागोठणेमधील अंबा, डोलवहालमधील कुंडलिका, लोहपमधील पातळगंगा, कर्जतमधील उल्हास आणि पनवेलमधील गाढी या जिल्ह्यातील सहा प्रमुख नद्या आहेत. सध्या या नद्यांमध्ये १.३६ मी पासून २.७० मीटर इतक्या पाण्याची क्षमता आहे. या नद्यांमधील पाण्याची पातळी देखील दिवसेंदिवस कमी होत आहे. त्यामुळे या नद्या तळ गाठण्याच्या वाटेवर असल्याचे दिसून येत आहे.

### धरणांमधील जलसाठा कमी होण्याच्या वाटेवर

रायगड जिल्ह्यातील म्हसळा तालुक्यातील संदेरी धरणामध्ये शंभर टक्के जलसाठा शिल्लक आहे. सहा धरणांमध्ये ३६ टक्केपर्यंत, १७ धरणांमध्ये ७६ टक्केपर्यंत, तीन धरणांमध्ये ८१ टक्केपर्यंत जलसाठा शिल्लक आहे. मात्र सुधागडमधील ढोकशेत धरणाने तळ गाठला असून या धरणात शुन्य टक्के जलसाठा असल्याची माहिती समोर आली आहे.या धरणात पाणी नसल्याने पाण्यासाठी वणवण करण्याची वेळ नागरिकांवर येण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

## पी.एन.पी. नागाव शाळा समितीच्या सदस्यांची निवड जाहीर




**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

नागाव येथील पीएनपी सायरस पुनावाला सीबीएसई इंग्लिश मिडीयम स्कूलच्या शाळा समितीच्या पदाधिकाऱ्यांसह सदस्यांची निवड गुरुवारी (दि.५) करण्यात आली. पीएनपी एज्युकेशन सोसायटीच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील यांच्या उपस्थितीत हा समारंभ पार पडला. नवनिर्वाचित सदस्यांना चित्रलेखा पाटील यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देण्यात आले. तसेच त्या सर्वांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करीत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. व्यक्तिमत्वातील सकारात्मकता, सामाजिक, बांधिलकी आणि शैक्षणिक क्षेत्रातील तळमळ लक्षात घेता या पदांसाठी पान २ वर

### गॅस पाईपच्या स्फोटाने एकाचा मृत्यू

**| रसायनी | प्रतिनिधी |**

रसायनी पोलीस ठाण्याच्या हद्दीमधील लोहोप येथील विठोबा कंपनी, प्लॉट नं.५६/१६ लोहोप गाव, तालुका खालापूर येथे अॅल्युनिमिनय गॅस पाईपच्या स्फोटाने एकाचा भाजून मृत्यू झाल्याची घटना घडली. रसायनी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार सुनिलकुमार बिदा सिंग (वय ४१, रा. गुप्ता आईस, विठोबा कंपनी, प्लॉट नं.५६/१६ लोहोप गाव, तालुका खालापूर, मुळ गाव रा. गाजीपूर, पोस्ट तमकुई, जिल्हा कुशीनगर, राज्य-उत्तरप्रदेश) हा रात्रपाळीस ड्युटीस पान २ वर

## दादरचे शेतकरी जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकणार

**जमिनीचे सातबारे शेतकऱ्यांच्या नावे करण्याची मागणी**




**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

प्रकल्पाच्या नावाखाली शेकडो एकर जमीन भूसंपादन करण्यात आली. फसव्या नोकऱ्या, उद्योगधंदे, या अमिषाला बळी पडून करोडो रुपयांच्या जमिनी मुंबई एस.ई.झेड या प्रकल्पाला कवडीमोल भावाने दिल्या. मात्र आजतागायत एक वीटही उभी राहिली नाही. पान २ वर




# वनजमिनीवर पालिकेचे स्वच्छतागृह


वन विभागाने महसूल विभाग आणि नगरपरिषद यांना दिले आहेत. मात्र असे असताना देखील माथेरान शहरातील रेल्वे

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

माथेरान शहरात पर्यावरण स्नेही स्वच्छतागृह बसवले जात आहेत. माथेरान नगरपरिषदेने खरेदी केलेल्या स्वच्छता गृह यांचा गैरव्यवहार विषय गाजत आहे,मात्र त्याचवेळी त्यातील एक स्वच्छतागृह हे शहरातील स्टेशन परिसरात वन विभागाच्या जमिनीवर ते स्वच्छता गृह आणून ठेवण्यात आले आहे. त्या ई-टॉयलेट बद्दल सर्वत्र चर्चा वाढत असून वन विभागाने आपल्या जमिनीवर स्वच्छता गृह ठेवून दिल्याने माथेरानमध्ये वन विभागाच्या कार्यक्षमतेवर प्रश्न निर्माण झाले आहे.

माथेरान शहर वनजमिनीवर वसले असून काही भूखंड वन विभागाने महसूल विभाग आणि नगरपरिषद यांना दिले आहेत. मात्र असे असताना देखील माथेरान शहरातील रेल्वे स्टेशन परिसरातील बोहरी समाज हॉलचे मागे असलेल्या वन जमिनीवर कचरा आणि बांधकाम साहित्य टाकले जात आहे.वन विभाग एक झाड तोडले तर त्या सर्वसामान्य व्यक्तीवर गुन्हे दाखल करायला मागेपुढे पाहत नाही. मात्र धनाढ्य लोकांनी काही प्रकार केले तर मात्र त्याकडे दुर्लक्ष करीत असल्याचे दिसून आले आहे. आता तर माथेरान नगरपरिषदेकडून तेथे अतिक्रमण केले असून माथेरान पालिकेने आणलेली आणि गैरव्यवहाराच्या गर्तेत सापडलेली ई-टॉयलेट तेथे आणून बसवण्यात आली आहेत. त्यावेळी कोणत्याही प्रकारची नागरिक आणि पर्यटक यांची सोय होणार हे न पाहता एका कोपऱ्यात आणि तेथे जाण्यासाठी रस्ता आहे किंवा नाही? याची कोणतीही खात्री न करता तेथे स्वच्छतागृह ठेवण्यात आले आहे.माथेरान पालिकेच्या या कारभाराबद्दल नाराजी व्यक्त केली जात असून वनविभाग आपल्या जमिनीमध्ये अतिक्रमण करू देत असल्याने सर्वत्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

वन जमिनीमध्ये ते ई-टॉयलेट ठेवण्यात आल्याने माथेरानमधील वन विभाग सुस्त आहे.याबद्दल वन अधिकारी यांच्याशी संपर्क साधला असता तेथे त्या भूखंडावर माथेरान पालिकेचे स्वच्छतागृह होते आणि त्याच ठिकाणी नवीन स्वच्छतागृह बसवण्याची परवानगी आहे. परंतु नवीन स्वच्छतागृह कोणत्या ठिकाणी ठेवले आहे हे पाहिले जाईल आणि कोणत्याही स्थितीत नवीन जागा दिली जाणार नाही, अशी माहिती वनपाल राजवर्धन आडे यांनी दिली आहे. तर ज्या ठिकाणी आता नव्याने स्वछता गृह ठेवले आहे तेथे जाण्यासाठी जागा देखील उपलब्ध नाही आणि त्यामुळे नगरपरिषदेने वन विभागाला एक जागा निश्चित करून द्यावी आणि माथेरान पालिकेनेदेखील बसवण्यात येणाऱ्या नवीन ई-टॉयलेटकडे जाण्यासाठी रस्ता आणि पाण्याची व्यवस्था आधी करून द्यावी तरच ते स्वच्छता गृह कार्यान्वित करावे अशी मागणी कुलदीप जाधव यांनी केली आहे.

## साडेचार लाख रुपयांची फसवणूक

**पनवेल :** गॅस कनेक्शनच्या महिन्याचे बिल अपडेट करण्यास सांगून चार लाख ६४ हजारांची फसवणूक केल्याप्रकरणी अनोळखी व्यक्तीविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. भूपेंदर कौर मोहिंदर सिंग या खारघर येथे राहत असून त्यांना महानगर गॅस लिमिटेड संबंधी मोबाईलवर मेसेज आला आणि गॅस कनेक्शन डिस्कनेक्ट होणार असल्याचे सांगून महिन्याचे बिल अपडेट करण्यास सांगितले. त्यावेळी त्यांनी बिल भरले असल्याबाबतचा मेसेज समोरच्या मोबाईलवर पाठवला. त्यानंतर मी वरिष्ठ अधिकारी बोलत असल्याचे सांगून फसवणूक केली.



## महाराष्ट्र भूषण डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांचा जन्मदिन साजरा

**। वाघ्रण । प्रतिनिधी ।**

सेवाश्रम सामाजिक विकास सेवा संस्था वाघ्रण तर्फे थोर निरूपणकार महाराष्ट्र भूषण डॉ. नारायण विष्णू धर्माधिकारी यांचा जन्मदिन साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमात उपस्थित महिलांचे स्वागत सेवाश्रम सामाजिक विकास संस्था वाघ्रणचे अध्यक्ष दिपक पाटील यांनी केले. यावेळी सहा दशकांहून अधिक काळ श्री सदस्यांना बैठकांच्या माध्यमातून समाज प्रबोधन करणाऱ्या तिर्थरूप नानासाहेबांच्या जीवनाचा आढावा घेत मौलिक शब्दात कार्य गौरव केला. या कार्यक्रमाला संस्थेचे संचालक महेंद्र म्हात्रे, नेहा पाटील, रुपेश पाटील, ॲड. प्रणाली पाटील, राजेंद्र पाटील, उदय शेरमकर, उदय पाटील यांनी शुभेच्छा दिल्या.

# उरणकरांना उन्हाचा तडाखा



- **दुपार होताच रस्ते पडतात ओस**
- **थंड पेयांच्या गाड्यांवर नागरिकांची गर्दी**

**। उरण । प्रतिनिधी ।**

मार्च महिना सुरू होताच उन्हाने उरणकरांना अक्षरशः घाम फोडला आहे. बुधवारी दुपारी तापमानाचा पारा थेट अचानक उरण शहरासह परिसरात अंगाची अक्षरशः लाहीलाही होत असल्याचे चित्र दिसून आले. सकाळी अकरानंतरच उन्हाच्या झळा जाणवू लागल्याने नागरिकांची काहिली झाली.

दुपारच्या सुमारास उन्हाचा पारा वाढताच रस्त्यांवरील वर्दळ कमी झाली, अनेकांनी घरातील किंवा कार्यालयातील एसीचा आसरा घेणेच पसंत केले. दुसरीकडे उकाड्यापासून दिलासा मिळवण्यासाठी थंड पेय, उसाचा रस आणि सरबताच्या गाड्यांवर नागरिकांची गर्दी वाढल्याचे चित्र शहरात सर्वत्र दिसून आले.

हवामान खात्याच्या नोंदीनुसार बुधवारी सकाळी तापमान वाढल्याने उकाड्याचा तडाखा अधिक तीव्र जाणवला.

दरम्यान तज्ज्ञांच्या मते शहरांमध्ये वाढत असले-ली काँक्रीटची जंगलं आणि बांधकामांमध्ये वाढलेला काचेचा वापर यामुळे उष्णता अधिक वाढत आहे. पूर्वी माती उष्णता शोषून घेत होती; मात्र आता तिची जागा सिमेंट आणि काचांनी घेतल्याने उष्णतेचा तडाखा अधिक तीव्र होत आहे.

याशिवाय खाडी परिसरातील गाळ साचणे, खारफुटीचे नष्ट होणे आणि मिथेन वायूचे प्रमाण वाढणे यामुळेही वातावरणातील तापमानात वाढ होत असल्याचे तज्ज्ञ सांगतात. किनारी शहरांमध्ये आर्द्रता जास्त असल्याने तापमान ३० अंशांपेक्षा वर गेल्यावर शरीराला जाणवणारे तापमान प्रत्यक्षात ३ ते ४ अंशांनी अधिक भासते, त्यामुळे उकाडा अधिक त्रासदायक ठरतो..

## लाखोंचे अमली पदार्थ जप्त

**पनवेल :** खारघर परिसरात अमली पदार्थविरोधी कक्षाने धडक कारवाई करत आठ लाखांच्या अमली पदार्थांसह दोघांना अटक केली आहे. ही कारवाई करण्यात आली. याप्रकरणी दोन संशयितांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप निगडे व त्यांच्या पथकाने इमारतीमधील संशयित घरावर छापा मारला. घराची झडती घेतली असता संशयित आरोपी ऋषिकेश जितेंद्र मिश्रा याच्या ताब्यातून विविध प्रकारचे अमली पदार्थ जप्त करण्यात आले. चार लाख ४२ हजारांचा ४४.२६ ग्रॅम हायड्रो गांजा, दोन लाख ३७ हजारांचा ६.७९ ग्रॅम मेफेड्रोन आणि एक लाख २६ हजारांच्या ३.१७ ग्रॅमच्या एमडीएमएच्या सात गोळ्या असा एकूण आठ लाख सात हजारांच्या अमली पदार्थाचा समावेश आहे.

# महाराजस्व अभियानाला ७ मार्चपासून सुरुवात

## नागरिकांनी मोठ्या संख्येने लाभ घेण्याचे आवाहन

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

तालुक्यातील नागरिक, शेतकरी, विद्यार्थी आणि महिलांना विविध प्रकारचे शासकीय दाखले व महसूल विषयक सेवा तातडीने उपलब्ध करून देण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज महसूल शिबीर अभियान ७ मार्चपासून सुरू होत आहे. या अभियानाच्या माध्यमातून महसूल विभागाच्या विविध सेवांचा लाभ थेट नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात येणार असून, सर्व स्तरावरील नागरिकांनी या उपक्रमाचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन प्रांताधिकारी डॉ. संदीपान सानप यांनी केले.

या विशेष अभियानांतर्गत तालुक्यातील विविध भागांमध्ये महसूल शिबिरे आयोजित करण्यात आली असून नागरिकांना त्यांच्या गावाजवळच सेवा मिळणार आहेत. त्यामुळे कार्यालयीन फेऱ्या टाळून नागरिकांचे वेळ व खर्च दोन्ही वाचणार आहेत.

या अभियानाचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे आहे. ७ मार्च निकम स्कूल, लोणेरे १४ मार्च ग्रामपंचायत तळाशेत - इंदापूर आणि ग्रामपंचायत निजामपूर १० एप्रिल मराठी शाळा, विळे, १७ एप्रिल बुद्ध विहार, गोरेगाव,८ मे तलाठी भवन, माणगाव, १५ मे ग्रामपंचायत मोरबा, ही सर्व शिबिरे सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत आयोजित करण्यात येणार आहेत.

या शिबिरांमध्ये ग्रामीण भागातील नागरिकांच्या महसूल विभागाशी संबंधित दैनंदिन जीवनातील विविध समस्या आणि तक्रारी तातडीने निकाली काढण्यावर भर दिला जाणार आहे. विशेषतः उत्पन्न दाखला, जात दाखला, रहिवासी दाखला, वारस प्रमाणपत्र, ७/१२ उतारे, फेरफार नोंदी तसेच इतर महसूल विषयक कागदपत्रे तातडीने देण्यासाठी आवश्यक ती प्रक्रिया शिबिरातच पूर्ण केली जाणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रवेशासाठी तसेच नागरिकांना विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी मोठी मदत होणार आहे.

डॉ. संदीपान सानप यांनी सांगितले की, गेल्या वर्षी या अभियानाला नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळाला होता. गतवर्षी एकूण १ हजार ६८० दाखले तातडीने वितरित करण्यात आले होते. यंदा त्यापेक्षा अधिक प्रमाणात दाखले देण्याचा आणि नागरिकांच्या तक्रारी व समस्या प्रभावीपणे सोडविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

महसूल प्रशासन नागरिकांच्या दारात सेवा पोहोचविण्यासाठी कटिबद्ध असून या शिबिरांमुळे ग्रामीण भागातील लोकांच्या अडचणी मोठ्या प्रमाणात कमी होतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. त्यामुळे शेतकरी, महिला, विद्यार्थी तसेच सर्वसामान्य नागरिकांनी आपल्या आवश्यक कागदपत्रांसह या शिबिरांना उपस्थित राहून शासनाच्या या उपक्रमाचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. संदीपान सानप यांनी केले आहे. या उपक्रमामुळे महसूल प्रशासन आणि नागरिक यांच्यातील दुवा अधिक मजबूत होऊन लोकांना शासनाच्या सेवांचा त्वरित, पारदर्शक आणि सुलभ लाभ मिळण्यास मदत होणार आहे.

पान १ वरून

## पी.एन.पी. नागाव शाळा समितीच्या सदस्यांची निवड जाहीर

वेगवेगळ्या क्षेत्रातील दहा जणांची निवड करण्यात आली आहे. कृषीवलच्या संपादक माधवी सावंत तसेच राजकीय, सामाजिक, शिक्षण व क्रीडा क्षेत्रातील आवड असणाऱ्या अंजली मोरे, नागावंचे माजी सरपंच निखील मयेकर, राकेश म्हात्रे, निलेश खोत, राहूल गणपत, अमित फुंडे, शरयू अधिकारी, अभिजीत वाळंज, रंजित राऊत यांची शाळा समितीच्या सदस्यपदासाठी निवड करण्यात आली.

यावेळी पीएनपी एज्युकेशन सोसायटीच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील म्हणाल्या की, ग्रामीण भागातील खेड्या-पाड्यातील मुला-मुलींना दर्जेदार शिक्षण मिळाले पाहिजे, यासाठी शेकापचे नेते तथा पीएनपी एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष जयंत पाटील यांनी कोकणचे भाग्यविधाते, रायगड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष स्व. प्रभाकर पाटील यांच्या नावाने पीएनपी एज्युकेशन सोसायटी नावाची शिक्षण संस्था सुरु केली. शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या कलागुणांना संधी देण्याचे काम या शिक्षण संस्थेच्या माध्यमातून केले जात आहे. विद्यार्थ्यांना इंग्रजी शिक्षण अधिक चांगले मिळावे, यासाठी नागाव येथे सीबीएसई बोर्डाची पीएनपी सायरस पूनावाला ही अद्ययावत शाळा सुरु केली. जिल्ह्यात आज पीएनपी शिक्षण संस्थेचा विस्तार वाढत आहे. साडेसात हजारहून अधिक विद्यार्थी या संस्थेमध्ये शिक्षण घेत असल्याचा आनंद आहे. पीएनपी शिक्षण संस्थेसाठी स्व. फुलगांवकर यांचे मोलाचे योगदान राहिले आहे. आज नागाव येथील शाळा समितीच्या सदस्यांची निवड करताना खऱ्या अर्थाने आनंद होत आहे. या समितीमध्ये वेगवेगळ्या क्षेत्रातील मंडळी आहेत. या शाळेमध्ये शिक्षक विद्यार्थ्यांना चांगल्या पध्दतीने शिकवित आहेत. शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी समितीच्या सदस्यांचेही योगदान मोलाचे राहिल, अशा विश्वास चित्रलेखा पाटील यांनी व्यक्त केला. यावेळी पीएनपी एज्युकेशन सोसायटीचे कार्यालयीन मार्गदर्शक गबाजी गीते, कॉलेजचे संचालक विक्रांत वार्डे, लेखापाल अंकित भानुशाली, अकॅडमिक डायरेक्टर राजश्री पाटील, प्रा. निशिकांत कोळसे, जनसंपर्क अधिकारी अमोल नाईक आदींसह अन्य मान्यवर, शाळेतील प्राचार्य, शिक्षक, कर्मचारी उपस्थित होते.

## रायगडवर जलसंकट

एक धरण आहेत. या धरणांमधून, पेण नगरपरिषद, महाड शहर, श्रीवर्धन नगर परिषदेला, महाडमधील १९ गावे, १३ गावे तसेच दुंदरेपाडा, चिंचवली, मोर्बे, आडगाव, आपटी, होराळे, जांभिवली, नंदनपाडा, नारंगी, सावरोली, शिरवली, तांबाटी, डोणवत, गोरठण, तांबाटी, खिरकंडी, ठाकुरवाडी, निगडोल, नडोदे, कलोते, वावर्ले वावंढळ, श्रीगांव, कुर्डूस, कुसूंबळे, पोयनाड, पाभरे, तोंडसुरे, संदेरी, आंबेत, फळसप, बोर्ली, मांडला, भोईघर, काकळघर, काशिद, वैतागवाडी, सोनसडे, भानंगकोंड, कलमशेत, मांदाड, वनास्ते, शेणवली, कार्ले, दिवेआगर, बोर्ली, पंचतन, भरखोल, रानवली, निगडी, गालसुरे, बापवन अशा एकूण ७८ गावांना पाणी पुरवठा होतो. लाखो नागरिकांना पाणी पुरवठा या धरणांद्वारे केला जातो. जिल्ह्यात यंदा पाऊस चांगला पडला. धरणे, विहीरी, तलाव, धरणे, तलाव, विहिरी पाण्याने तुडूंब भरून गेल्या. त्यात प्रशासनाकडून वेगवेगळ्या पाण्याच्या योजना राबवून मुबलक पाणी पुरवठा घरोघरी पोहचविण्याचा प्रयत्न केला. मात्र वाढत्या नागरिकीकरणाबरोबरच औद्योगिकीकरणामुळे पाण्याचा वापर प्रचंड वाढू लागला आहे. जीर्ण झालेल्या पाईपलाईनची वेळेवर दुरुस्ती होत नसल्याने पाणी गळतीचे प्रमाण वाढत आहे. जिल्ह्यातील या धरणांमधील पाण्याची पातळी हळूहळू कमी होऊ लागली आहे. त्याचा परिणाम गावांमध्ये पाणी कपातीचे संकट सुरू झाले आहे. पावसाळा सुरु होईपर्यंत पाण्याचा साठा धरणांमध्ये शिल्लक राहवा यासाठी कोलाड येथील लघु पाट बंधारे विभागाकडून पाणी पुरवठ्याचे नियोजन केले आहे. जिल्ह्यांतील धरणांमध्ये फक्त आता ५४ टक्के जलसाठा शिल्लक राहिला आहे. आतापासून जिल्ह्यात पाणी टंचाईचे संकट सुरु झाल्याचे चित्र समोर येत आहे.

**पाणी जपून वापरा**

धरणांमधील जलसाठा हळुहळू कमी होऊ लागला आहे. काही गावांमध्ये पाणी कपात सुरु आहे. तर काही गावांमध्ये नियमीतपणे पाणी पुरवठा केला जात आहे. पाणी पुरवठा करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. जून महिन्यात पाऊस सुरु होईपर्यंत धरणांमध्ये पाणी पुरवठा शिल्लक राहवा यासाठी नियोजन केले आहे. जिल्ह्यातील नागरिकांनी पाण्याचा वापर जपून करावा,असे आवाहन लघु पाटबंधारे विभागाने केले आहे.

## दादरचे शेतकरी जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकणार

भूसंपादनाच्या अटीचे पालन न करता बेकायदेशीरपणे शेतकऱ्यांच्या शेतजमिनी कंपनीच्या नावे केल्या आहेत. त्या जमिनीचे सातबारे पुन्हा शेतकऱ्यांच्या नावे करून देण्यात यावे अशी मागणी दादर येथील शेतकऱ्यांनी केली आहे अन्यथा १३ मार्चला जिल्हाधिकारी कार्यालयासमोर भव्य मोर्चा काढण्यात येईल, असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे. अपर जिल्हाधिकारी सुनील थोरवे यांना निवेदन देण्यात आले. यावेळी रायगड जिल्हा मिनीडोअर संघटनेचे अध्यक्ष, सामाजिक कार्यकर्ते विजय पाटील, संतोष म्हात्रे, दिपक पाटील, अनंत पाटील, मोहन पाटील आदी उपस्थित होते. पेण तालुक्यातील दादर या गावाला पुर्वी भाताचे कोठार म्हणून ओळखले जात होते. १९८९ मध्ये झालेल्या महापुरात बांधबंदिस्ती तुटली. त्यामुळे भातशेती पूर्णपणे उध्वस्त झाली. बांधबंदिस्ती करून मिळावी, म्हणून सरकारकडे त्यावेळी अनेकदा प्रयत्न केला. परंतू सरकारने दुर्लक्ष केले. शासनाने बंदिस्तीसाठी कोणतीही शासकीय योजना राबविली नाही. दरम्यान, केंद्र सरकारने सेझ प्रकल्प निर्माण करून ग्रामीण भागात उद्योगधंदे, कारखाने उभे करण्याचा प्रयत्न केला. तरुणांना नोकरी, व्यवसाय, गरीब शेतकऱ्यांना विकासाच्या प्रवाहात आणण्याचा उद्देश समोर ठेवत रिलायन्स सेझ प्रकल्पाला नियम, अटीशर्तीवर भूसंपादनाची परवानगी देण्यात आली. पेण तालुक्यातील २४ गावे, उरण तालुक्यातील वीस, पनवेलमधील मधील ४१ अशी ८५ गावे भुसंपादनाची परवानगी देण्यात आली. त्यावेळी शेतकऱ्यांनी आपल्या मुलांच्या भवितव्याचा विचार करून शासनावर विश्वास ठेवून दादर गावांतील ८०० एकरहून अधिक जमीन कवडीमोल भावाने शेतकऱ्यांनी दिली. मुंबई एस.ई.झेड. या प्रकल्पासाठी जमिनी दिल्या. प्रकल्पाच्या नावाखाली जमीनी घेतल्या. परंतू १७ वर्षाहून अधिक काळ उलटूनही साधी वीटही त्याठिकाणी उभी राहिली नाही. जमीनी विकत घेताना करारामध्ये नमुद केलेल्या बाबींची पूर्तता करण्यात आली नाही. मात्र सातबारा कंपनीच्या नावे बेकायदेशीररित्या करून शेतकऱ्यांची फसवणूक करण्यात आली असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. जमिनी गेल्याने शेतकऱ्यांचे भविष्य अंधकारमय झाले आहे. जिवंतपणी मरण यातना भोगाव्या लागत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. त्यामुळे संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी आता स्वतःच्या न्याय हक्कासाठी लढा देण्याचा निर्णय घेतला आहे. बेकायदेशीररित्या सातबाऱ्यावर चढविलेले कंपनीचे नाव कमी करून मूळ शेतकऱ्यांच्या जमिनी पुन्हा नावे करण्यात याव्यात, अशी मागणी बुधवारी (दि.४) दादरमधील शेतकऱ्यांनी अपर जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदन देऊन केली.

**शेतकऱ्यांना न्याय मिळालाच पाहिजे - विजय पाटील**

रायगड जिल्ह्यातील मिनीडोअर चालक व मालकांच्या प्रश्नासाठी जिल्हा, राज्य पातळीवर पाठपुरावा केला आहे. त्यांच्या प्रलंबित मागण्यासाठी रस्त्यावर उतरले आहे. दादर येथील शेतकऱ्यांच्या लढ्यासाठी रस्त्यावर उतरण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांच्या न्याय हक्कासाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चा काढण्यात येणार आहे. त्यापूर्वी प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करावी, शेतकऱ्यांना न्याय मिळाला पाहिजे, ही आमची भूमिका असणार आहे, असे विजय पाटील म्हणाले.

## शासकीय जमिनीतून उत्खनन महागात

आरोपीने जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत सरकारी जमिनीतून खनिजांची चोरी केली होती. तहसीलदार कार्यालयामार्फत संबंधित मालमत्ता कायमस्वरूपी जप्त करण्याची प्रक्रिया आधीच सुरू केली. याबाबत अर्जदार नितीन नामदेव आंबुर्ले यांनी आपण मालमत्तेचे मालक असून गुन्ह्याशी संबंध नसल्याचा दावा केला होता. मात्र, न्यायालयाने राजस्थान उच्च न्यायालयाच्या एका निकालाचा संदर्भ देत स्पष्ट केले की, जर जप्तीची प्रक्रिया सुरू असेल, तर केवळ सुरक्षा ठेवून वाहन सोडता येणार नाही. त्यासाठी आधी दंड भरणे आवश्यक आहे. अर्जदार दंड भरण्यास तयार नसल्याने, जेसीबी सोपवणे योग्य ठरणार नाही, असे न्यायालयाने नमूद केले. दंड न भरल्याने न्यायालयाने अर्ज फेटाळून लावला. याबाबत बुधवारी (दि.४) पुढील सुनावणी होणार होती. मात्र १२ मार्च ही तारीख दिली आहे. या तारखेला होणाऱ्या सुनावणीनंतर चित्र स्पष्ट होणार आहे. यामध्ये आणखी सात जणांविरोधात कारवाई झाल्याची माहिती समोर येत आहे.

## गॅस पाईपच्या स्फोटाने एकाचा मृत्यू

असताना कंपनीत २ वाजता ॲल्युमिनियम गॅस पाईपचा स्फोट झाल्याने सुनिलकुमार बिदा सिंग हे जखमी झाले.त्यांना उपचाराकरिता ऐरोली-नवी मुंबई येथे नेले असताना तसेच त्यानंतर अश्विनी हॉस्पिटल कोपरखैरणे येथे उपचार घेत असताना सुनिलकुमार बिदा सिंग यास तपासून मृत घोषित केले. याबाबत सुनिलकुमार बिदा सिंग यांची पत्नी पूजादेवी सुनिलकुमार सिंग यांनी रसायनी पोलीस ठाण्यात खबर दिली असून रसायनी पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक अभिजीत भुजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोसई प्रकाश माळी अधिक तपास करीत आहेत.

# देहेन येथे संत तुकाराम बीज महोत्सव



**। भाकरवड । वार्ताहर ।**

श्रीगाव ग्रामपंचायत हद्दीतील देहेन गावात हरिनाम सप्ताह व पंचमवेद अभंग त्याचे सामुदायिक पारायणाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात प्रथम ध्वजारोहण, कलश पूजन, मूर्ती अभिषेक, वीणा टाळ मृदुंग पूजन, गाथा पूजन ,गाथा सांगता पूजन, करून हरिपाठ, प्रवचन, कीर्तन, हरी जागरण आदींचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

फाल्गुन शुद्ध प्रतिपदेपासून सुरू झालेल्या या बिजोत्सवानिमित्त प्रवचनकार, कीर्तनकार तसेंच पंचक्रोशीतील नामवंत भजन मंडळाचा हरीजागर करण्याकरिता समावेश होता. त्यामध्ये संत तुकाराम महिला भजन मंडल देहेन, संत तुकाराम भजन मंडळ देहेन, सर्वेश्वर भजन मंडळ नवीन देहेन, श्री हनुमान प्रासादिक भजन मंडळ देहेन, मरीआई प्रासादिक सेवा भजन मंडळ भाकरवड, मरीआई भजन मंडळ तळाशेत तर पहिल्या दिवशी कीर्तन सेवेकरिता अनिल महाकले, गोविंद शेलार, संदीप गोगावले, वामन भोईर, जगन्नाथ राऊत, संगीता चोपडे, अमित बळवली यांनी परमेश्वराकडे काय मागावे, कुणी मागावे, आणि कशा करिता मागावे या तुकाराम महाराजांच्या चार चरणाचे अभंग आपल्या सुंदर आवाजात कीर्तन सेवेकरिता घेऊन भाविक भक्तांना मंत्रमुगद्य करून सोडले तर पुष्पवृष्टी कीर्तन सेवा वै. गुरुवर्य अंबाजीनाथ बाबा निगडे यांचे शिष्य व गुरुवर्य रायगड भूषण नारायण गडबकर यांचे मार्गदर्शन लाभलेले भिकाजी आमटेम यांनी सुद्धा संत तुकाराम महाराजांच्या जीवनपट उभा करून भक्तीच्या मार्गाने आपले जीवन सार्थ करावे असे आपल्या कीर्तन सेवेत प्रबोधन केले.

या सप्ताहात पंचक्रोशीतील तसेच पेण, अलिबाग, पनवेल, तालुक्यातील दररोज सातशे हुन अधिक भक्तगण उपस्थित राहून प्रवचन कीर्तन सेवेचा लाभ घेत असत तर या सर्वांची नास्ता, चहा, भोजनाची व्यवस्था श्री संत तुकाराम मंडळ देहेन, संत तुकाराम महिला भजन मंडळ देहेन व संत तुकाराम क्रीडा मंडळ देहेन, बाळ युवक, शिवज्योत प्रतिष्ठान देहेन यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले होते.

# क्ले पेव्हर ब्लॉकचे खड्डेमय रस्ते दुरुस्तीला सुरुवात

**। माथेरान । प्रतिनिधी ।**

माथेरानमधील बहुतेक ठिकाणी ठेकेदाराकडून लावण्यात आलेल्या निकृष्ट क्ले पेव्हर ब्लॉकच्या रस्त्यांना खड्डे पडल्यामुळे त्यावरून पायी चालत जाणे पर्यटकांना त्रासदायक ठरत होते. विशेष म्हणजे या रस्त्यावरूनच सातत्याने ई-रिक्षा धावते त्यावेळी खड्डेमय रस्त्यांमुळे या पर्यावरण पूरक वाहनाचे पाटे तुटण्याचे प्रमाण वाढले होते. ही खर्चिक बाब सर्वसामान्य ई-रिक्षा चालकांना परवडणारी नव्हती. याकामी प्रभाग क्र. ३ मधील कस्तुरबा रोडवरील ज्या ज्या ठिकाणी रस्त्याला खड्डे पडले आहेत त्या जागी चांगल्या दर्जाचे क्ले पेव्हर ब्लॉक बसविण्यात येत आहेत.

गटनेते शिवाजी शिंदे यांच्या सूचनेनुसार ही महत्वपूर्ण कामे युद्धपातळीवर सुरू करण्यात आली आहेत. याच मार्गावरून नियमितपणे शालेय विद्यार्थ्यांना ई-रिक्षातून ने-आण केली जाते त्याचप्रमाणे शासकीय अधिकारी, कर्मचारी वर्ग याच सेवेचा लाभ घेताना दिसतात. परंतु आजवर कोणत्याही अधिकाऱ्यांनी ई-रिक्षाची मोफत सेवा प्राप्त करूनदेखील रस्ते सुस्थितीत असावे याबाबत चकार शब्द काढला नाही किंवा त्यासाठी आपल्या माध्यमातून प्रयत्न सुध्दा केलेले नाहीत असे नागरिक बोलत आहेत.

नगरसेवक शिवाजी शिंदे, रिझवाना शेख यांच्या प्रयत्नामुळे या भागात उत्तम प्रकारे रस्ते केले जात आहेत. दस्तुरी वरून येताना अनेक भागात क्ले पेव्हर ब्लॉकच्या रस्त्यांना खड्डे पडले आहेत ते सुद्धा लवकरच दुरुस्त करावेत.



वखारी नाका ते छत्रपती शिवाजी महाराज रोड पर्यंतचा अपूर्ण असणारा क्ले पेव्हर ब्लॉकचा रस्ता, गव्हाणकर शाळेपर्यंतचा रस्ता बनविण्यात यावा अशी मागणी होत आहे.

**अलिबाग नगरपरिषद**
**निविदा सूचना सन २०२५-२६**

अलिबाग नगरपरिषदेकरीता Air quality monitoring unit करीता wire/cable खरेदी करणेबाबत फेर निविदा (तिसरी वेळ) मागविण्यात येत आहेत. सविस्तर निविदा सुचना अलिबाग नगरपरिषद कार्यालयात दि. ०६/०३/२०२६ पासून उपलब्ध आहेत. सदर कामाच्या निविदा प्रक्रियेत कोणताही बदल/सुधारणा असल्यास प्रसिद्ध करणेत येईल.

सही/-
**मुख्याधिकारी**
**अलिबाग नगरपरिषद**

## निवडक



### विहिरीत पडलेल्या उंटाचा मृत्यू

**पनवेल :** खांदा कॉलनी सेक्टर १४ मधील हॉरेझन स्कूल परिसरातील एका विहिरीत गुरूवारी (दि.५) सकाळी उंट पडल्याची घटना घडली. याबाबत प्रथमेश भुजबळ यांनी नवीन पनवेल अग्निशमन केंद्राच्या कंट्रोल रूमला माहिती दिली. सकाळी ९.४० वाजता वर्दी मिळताच अग्निशमन दलाचे वाहन कर्मचाऱ्यांसह तात्काळ घटनास्थळी रवाना झाले. घटनास्थळी पोहोचल्यानंतर जमीनसपाटीवरील विहिरीमध्ये उंट पडल्याचे निदर्शनास आले. त्या उंटाला बाहेर काढण्यासाठी हायड्रा आणि जेसीबीच्या सहाय्याने प्रयत्न करण्यात आले. मात्र, तोपर्यंत उंटाचा मृत्यू झाल्याची माहिती पोलिस पंचनाम्यातून मिळाली. मृत उंटाचा मालक करण शिंदे असल्याची माहिती समोर आली आहे. या कारवाईदरम्यान उप अग्निशमन अधिकारी अतुल सपकाळ, प्रमुख अग्निशामक विमोचक विकास पालवे, मुख्य आरोग्य निरीक्षक अरुण कांबळे तसेच एएसआय ढोबळे आणि इतर कर्मचारी उपस्थित होते.



### पायी शिवज्योत आणण्याचा संकल्प

**पाली/बेणसे :** अलिबाग तालुक्यातील वादळ शिवज्योत शाहबाज मंडळ हे छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीचे औचित्य साधून त्यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या गडकिल्ल्यांवरून दरवर्षी पायी शिवज्योत आणत असतात. आत्तापर्यंत त्यांनी महाराष्ट्रातील २० गडकिल्ले व २०२४ साली ऐतिहासिक आग्र्याचा लाल किल्ला येथून सुमारे १३०० किलोमीटरचा पायी प्रवास यशस्वी केला. त्यानंतर यंदा तामिळनाडू येथील हिंदवी स्वराज्याची तिसरी राजधानी किल्ले जिंजी येथून सुमारे १२०० किलोमीटर शिवज्योत पायी प्रवास करून आणण्याचा संकल्प या मंडळाने केलेला आहे. तरुणांच्या या जिद्धीचे व महाराजांवरील भक्ती व प्रेमाचे विशेष कौतुक होत आहे. ही योजना तामिळनाडू, कर्नाटक, बेंगलोर, पुणे मार्गे रायगड-अलिबाग अशी आहे. त्यांनतर अलिबाग तालुक्यातील शहाबाज या गावी जाऊन तिथे या शिवज्योतीची स्थापना करून शुक्रवारी (दि.६) छत्रपती शिवाजी महाराजांना मानवंदना देऊन तिथीप्रमाणे शिवजयंतीचा कार्यक्रम पार पडणार आहे, अशी माहिती मंडळाच्या पदाधिकारी व सभासदांनी दिली.


प्राची विवेक देवळे | देविका देवेंद्र पाबेकर | प्रियांका अमोल घरत | वंदना विजय सुर्वे | सारा अभिजित वर्तक

### यंदाचे तेजस्विनी पुरस्कार जाहीर

**अलिबाग :** अलिबाग प्रेस असोसिएशनतर्फे विविध क्षेत्रात काम करणाऱ्या कर्तुत्ववान महिलांना तेजस्विनी पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. नुकतेच यंदाचे तेजस्विनी पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. त्यात वंदना सुर्वे, देविका पाबेकर, सारा वर्तक, प्राची देवळे व प्रियांका घरत यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. हा पुरस्कार शनिवारी (दि.७) सकाळी १०.०० वाजता अलिबाग येथील रायगड पोलीस मुख्यालयाच्या जंजिरा सभागृहात पार पडणाऱ्या समारंभात प्रदान करण्यात येणार आहे. यावेळी रायगड पोलीस अधीक्षक आंचल दलाल, रायगड जिल्हा शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ. पूर्वा पाटील, रायगड जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा प्रकल्प संचालक प्रियदर्शनी मोरे प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित राहणार आहेत.

# आंबेवाडी ते निवी कालव्यातील
# पाण्यासाठी प्रतीक्षा

- प्रशासनाचा बेजबादारपणा उघड
- गेली तीन वर्षे दुरूस्तीची कामे सुरूच



| धाटाव | प्रतिनिधी |

आंबेवाडी ते निवी कालव्यात गेली कित्येक वर्षे पाणी सोडण्यात आलेले नाही. त्यामुळे त्याचा परिणाम येथील शेती व पर्यावरणावर झाला आहे. या कालव्यात पाणी सोडण्यासाठी बळीराजा फांऊडेशनच्यावतीने सातत्यपूर्ण आक्रमक लढा देण्यात आला आहे. त्यांनतर संबंधित प्रशासनाकडून करोडोंचा निधी खर्चून कालव्याच्या दुरूस्तीचे काम सुरू करण्यात आले. परंतु, गेली तीन वर्षे या कालव्याच्या दुरूस्तीचे काम सुरू असून काही प्रमुख कामे पुर्ण झाली आहेत. तरी देखील आंबेवाडी ते निवी कालव्याच्या पाण्यासाठी प्रतिक्षा कायमच राहिली आहे. संबंधित प्रशासनाच्या बेजबादरपणामुळे बळीराजा फाऊंडेशन तर्फे संबंधित प्रशासनाला आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

आंबेवाडी ते निवी कालव्यात गेली कित्येक वर्षे पाणी सोडण्यात आलेले नाही. त्यामुळे येथील शेतकरी, लघु उद्योजक व पर्यावरणाची प्रचंड हानी होत आहे. दुरुस्तीच्या नावाखाली प्रशासनानेच बंद केलेल्या कालव्याची दुरुस्ती करावी, कालव्याला पूर्वापार पाणी सोडण्यात यावे यासाठी बळीराजा फांऊडेशने शर्तीचा लढा उभा केला. उपोषण, विविध आंदोलने केली. अखेर कालवा दुरुस्ती कामाला प्रारंभ झाले. कालव्याची दुरुस्ती कामे व्हावीत, कालवा पूर्ववत व्हावा यासाठी आजतागायत पाटबंधारे प्रशासनाला सामंजस वेळ दिला. तरीही तीन वर्षे लोटली तरी कालव्याची दुरुस्ती सुरूच आहे. या दुरुस्तीच्या कामांत महत्त्वाचे एस्कॅप, सायपन, साकाव व पोट कालव्यांची मोठी कामे झाली आहेत. तरीदेखील कालव्यात पाणी सोडण्याची प्रक्रिया सुरूच करण्यात आलेली नाही. वाशी, लांढर, तळाघर, निवी हद्दीतीलही कालव्याचीवपोटकालव्याचीकामे अक्षरशः धीम्यागतीने उरकण्यात आली. तळाघर, निवी व इतरत्र कालव्याची अजून साफसफाईच नाही. धीमे ठेकेदार व बेफीकीर अधिकाऱ्यांमुळे कालव्याला पाणी सोडण्यासाठी प्रचंड दिरंगाई झाली आहे. अशातच आता मार्च महिना उजाडला तरी कालव्यात पाणी सोडण्यात आलेले नाही. पावसाळा सुरू झाल्यावर पाणी सोडणार का, असा संतप्त प्रश्न शेतकरी व ग्रामस्थांमधून विचारला जात आहे.

पाटबंधारे विभाग प्रशासनाच्या निरर्थक नियोजनाचे पुन्हा ग्रामस्थांना दर्शन झाले आहे. यावर कार्य अभियंता मिलिंद पवार हे नेहमीप्रमाणे टोलवाटोलवी करण्यातच आघाडीवर राहिले आहेत. सूचना दिल्या आहेत, चर्चा करू हेच वाक्य त्यांच्या तोंडून ऐकायला मिळत आहे. ते कायम ठेकेदारांना सवलत देत आले आहेत. त्यामुळे बळीराजा फांऊडेशनसह शेतकरी व ग्रामस्थांमधून संताप व्यक्त केला जात आहे.

दरम्यान, फांऊडेशन तर्फे गुरूवारी कोलाडच्या पाटबंधारे विभाग कार्यालयावर धडक देऊन संबंधीतांना जाब विचारण्याचे जाहिर करताच एकच खळबळ उडाली होती. आता कालव्याला पाणी सोडण्याबाबत बळीराजा फाऊंडेशन काय पवित्रा घेतो. अधिकाऱ्यांना कितपत धारेवर धरतात? याकडे सबंध तालुक्याचे लक्ष लागले आहे.

#### आंदोलनाचा इशारा

कालव्याच्या कामावर आत्तापर्यंत करोडो रुपये निधी खर्च करण्यात आला आहे. त्याची जाणीव अधिकाऱ्यांना का नाही? पाणी सोडण्याचा उद्देश पूर्ण का केला जात नाही? असा सवाल करत पाणी सोडण्याची प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी अन्यथा पुन्हा आंदोलन उभे करू, असा इशारा बळीर-ाजा फांऊडेशनने पाठबंधारे प्रशासनाला दिला आहे.

> **आंबेवाडी ते निवी कालव्याची दुरुस्ती कामे अशंत: पूर्णत्वास गेली आहेत. तरीही पाणी सोडण्याच्या नियोजनातील अनेक ठिकाणी कालवा साफसफाईला अजून प्रारंभच नाही. अक्षरशः निरर्थक नियोजन आहे**
>
> **– विठ्ठल मोरे, अध्यक्ष, बळीराजा फाऊंडेशन**


● शेकापचे जिल्हा चिटणीस सुरेश खैरे यांनी स्व. ॲड. दत्ता पाटील यांच्या जयंतीनिमित्त शेतकरी भवन येथे त्यांच्या प्रतिमेला अभिवादन केले.

## तटबंदीतील भुयारी मार्ग अडगळीत

| रेवदंडा | प्रतिनिधी |

रेवदंडा समुद्रकिनारी पोर्तुगिज कालीन आगरकोट किल्ला आहे. या किल्लाच्या तिन्ही बाजूस समुद्र असल्याने या किल्ल्याला भली मोठी दगडी तटबंदी आहे. या तटबंदीच्या आत जाण्यासाठी दोन-तीन ठिकाणी भुयारी मार्ग आहेत. परंतु, सध्या या भुयारी मार्गावर झाडेझुडपे वाढल्याने ते बंद झाले आहेत. शिवाय पावसाळ्यात पाण्याचा निचरा होत नसल्याने आतमध्ये पाणी साचते. काही वर्षांपूर्वी स्थानिक युवकांनी त्यातील एका भुयारी मार्गाची साफ सफाई केली होती. त्यांनतर कोव्हीड काळात सर्वत्र संचारबंदी असल्याने हे काम थांबविले गेले. रेवदंडा दैवज्ञ ब्राम्हण समाजाचे ऐतिहासिक पांचाळेश्वर मंदिरात सुद्धा एक भुयारी मार्ग आढळतो. हा भुयारी मार्ग थेट आगरकोट



किल्लातील तटबंदीशी निगडीत असल्याचे सांगितले जाते. पुरातत्व खात्यासह स्थानिक राजकीय, सामाजीक क्षेत्रातील मंडळीने हे भुयारी मार्ग व पुढील दालनांच्या स्वच्छता मोहिमेसाठी पुढाकार घेतल्यास ते पर्यटकांसाठी आकर्षण ठरेल, अशी मागणी इतिहासप्रेमी मंडळी करत आहेत.

## ई-चलन प्रणालीविरोधात एल्गार

| पनवेल | प्रतिनिधी |




ई-चलन प्रणालीच्या कथित चुकीच्या अंमलबजावणीविरोधात महाराष्ट्र ट्रान्सपोर्टर्स ॲक्शन कमिटीच्यावतीने गुरुवारी (दि.५) कळंबोलीतील पुणे-मुंबई मार्गावर रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. सकाळी सुरू झालेल्या या आंदोलनामुळे काही काळ महामार्गावरील वाहतूक पूर्णपणे विस्कळीत झाली होती. ई-चलनद्वारे होत असलेल्या कथित अन्यायकारक दंडवसुलीला विरोध करण्यासाठी तसेच प्रणालीतील त्रुटी दूर करण्याच्या मागणीसाठी हे आंदोलन करण्यात आले. ठाणे, नवी मुंबई आणि आसपासच्या भागातील ट्रक चालक, बस चालक आणि इतर अवजड वाहन चालक मोठ्या संख्येने या आंदोलनात सहभागी झाले होते. पोलिसांनी आंदोलकांशी चर्चा करून परिस्थिती नियंत्रणात आणली व वाहतूक हळूहळू सुरळीत केली. दरम्यान, ई-चलन प्रणालीच्या अंमलबजावणीत अनेक त्रुटी असल्याचा आरोप करत वाहतूकदारांनी सरकारने प्रथम आवश्यक तांत्रिक सुविधा आणि स्पष्ट मार्गदर्शक तत्त्वे उपलब्ध करून द्यावीत, त्यानंतरच कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे.

## मेंढरांची पाणवठ्यावर धाव..


● दुपारच्या वेळी उष्मा वाढल्यामुळे मेंढरांनी अलिबाग जवळील गोकुळेश्वर तलावातील पाणवठ्यावर पाणी पिण्यासाठी धाव घेतली. **(छायाचित्रः समीर मालोदे)**

## दागिने चोरणाऱ्यांच्या मुसक्या आवळल्या

| रसायनी | प्रतिनिधी |

खैराट गावातील सॉल्ट रिसोर्ट ॲंड ओलियंडर फार्म येथून एकूण १८ लाख ७० हजार रुपये किमतीचे दागिने चोरट्यांनी लांबविले होते. खालापूर पोलिसांनी शिताफीने तपास करीत चोरट्यांच्या मुसक्या आवळल्या असून चोरीला गेलेला मुद्देमाल हस्तगत केला आहे. मयूर किसन आगिवले (२४), प्रविण कृष्णा सगणे (२५), ओमकार दत्ता सरोदे (२५) अशी त्यांची नावे आहेत.




मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदार हे एका विवाह सोहळ्याकरीता आले असता त्यांनी २५ फेब्रुवारी रोजी खैराट गावातील सॉल्ट रिसोर्ट ॲन्ड ओलियंडर फार्म येथे राहण्याकरीता रूम घेतला होता. या रूममध्ये त्यांना किंमती वस्तू, दागिने व रोख रक्कम ठेवण्यासाठी लॉकर दिला होता. त्या लॉकरमध्ये त्यांनी त्यांच्याकडील दागिने व रोख रक्कम लॉकरमध्ये ठेवून गेले होते. यादरम्यान आरोपींनी रूममध्ये प्रवेश करून मास्टर पासवर्डने लॉकर उघडून त्यातील १८ लाख ७० हजार रूपये किंमतीच्या सोन्याचे व हिऱ्यांच्या दागिन्यांसह ६ हजार ५०० रुपयांची रोखरक्कम चोरून नेली. याबाबत खालापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. खालापूर पोलिसांनी तांत्रिक तपास करून संबंधित रिसॉर्टमधील रेपीत क्र. १, २ सिक्युरिटी गार्ड आणि रूमबॉय यांची चौकशी केली. या तपासात त्यांनी गुन्ह्याची कबूली दिली.

### वैज्ञानिक दृष्टीकोनाचा जागर

**वावोशी :** लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट यांच्यावतीने आयोजित पालक मेळाव्यात महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती खोपोली शाखेच्या महिला सहभाग विभागामार्फत जागतिक महिला दिनाचे औचित्य साधत 'चमत्कारामागील विज्ञान' या विषयावर प्रबोधनपर कार्यक्रम घेण्यात आला. खोपोली शाखेच्या महिला सहभाग विभागाच्या कार्यवाह प्रतिभा मंडावळे या संवादक म्हणून या कार्यक्रमाला उपस्थित होत्या. त्यांनी आपल्या भाषणातून भोंदू बाबांकडून महिलांचे होणारे शारीरिक, मानसिक व आर्थिक शोषण तसेच समाजात महिलांना दुय्यम स्थान कसे दिले जाते यावर प्रभावीपणे प्रकाश टाकला.

## पाण्यासाठीचे आमरण उपोषण यशस्वी



| रसायनी | प्रतिनिधी |

जिल्ह्यातील जल जीवन मिशन अंतर्गत प्रलंबित असलेल्या पाणीपुरवठा योजनेच्या निषेधार्थ आमरण उपोषण सुरू होते. अखेर रायगड जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांच्या लेखी विनंतीनुसार उपोषणकर्त्यांनी आपले आमरण उपोषण तात्पुरते स्थगित केले आहे. मात्र, जिल्ह्यातील जलजीवन मिशन योजनेअंतर्गत १२०० कोटीच्या योजनांचे कार्यारंभ आदेश देऊन सुमारे २००हून अधिक आदिवासी वाड्या तहानलेल्याच असल्यामुळे जलजीवन मिशन योजनेच्या चौकशीवर आम्ही ठाम असल्याचे सामाजिक कार्यकर्ते संतोष ठाकूर यांनी सांगितले आहे.

कोरळवाडीसाठी मंजूर झालेली पाणी पुरवठा योजना गेली ३ वर्षे अपूर्णावस्थेत आहे. त्यामुळे संतप्त झालेल्या आदिवासी भगिनींनी ग्राम संवर्धन सामाजिक संस्थेचे अध्यक्ष संतोष ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली २६ फेब्रुवारीपासून अलिबाग येथील राजिप मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या कार्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषण सुरू केले होते. उपोषणाच्या तिसऱ्या दिवशी बेबी वाघे (४६) यांची प्रकृती खालावल्याने त्यांना जिल्हा सरकारी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. या घटनेनंतर आ. नितीन राऊत यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात रायगड जिल्ह्यातील जलजीवन मिशन योजनेबाबत तारांकित प्रश्न विचारले. त्यामुळे प्रशासनावर मोठा दबाव निर्माण झाला. त्यानंतर ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्या अभियंत्यांचे प्रतिनिधी वरिष्ठ सहाय्यक रवींद्र सोनारघरे, रुपेश राजगे, कनिष्ठ सहाय्यक संकिता पाटील व चैताली म्हात्रे यांनी उपोषण स्थळी जाऊन पाणीपुरवठा सुरू करून उर्वरित तांत्रिक कामेही लवकरात लवकर पूर्ण करण्यात येईल, अशा आशयाचे लेखी पत्र उपोषण कर्त्यांना दिले. त्यांनतर उपोषण मागे घेण्याची विनंती केल्याने उपोषणकर्त्यांनी आपले उपोषण तात्पुरते स्थगित केले. मात्र, उर्वरित तांत्रिक कामे पूर्ण करून योजना नियमित व सुरळीत चालू राहील याची खात्री प्रशासनाने द्यावी, अन्यथा पुन्हा आंदोलन छेडू, असा इशारा देण्यात आला आहे.

**सह्याद्रीच्या घाटमाथ्यावरून पायी प्रवास | अवघ्या २५ दिवसांत सह्याद्री केला सर**

# मुंबईकर तरुणांची ट्रान्स सह्याद्री मोहीम फत्ते

| रायगड | प्रतिनिधी |

मुंबईतील सुदेश परब आणि ज्ञानेश्वर नाईक या दोन तरुणांनी सह्याद्रीच्या अखंड घाटमाथ्यावरून पायी प्रवास करीत ट्रान्स सह्याद्री मोहीम पूर्ण केली. सह्याद्रीच्या मुख्य डोंगर रांगेवर असलेल्या २१ किल्ल्यांची चढाई करत त्यांनी तापी ते तिलारी ही सह्याद्री मोहीम फत्ते केली. त्यात त्यांनी केवळ २५ दिवसांच्या कालावधीत १२७९.३ किलोमीटरचा डोंगरवाटांचा प्रवास, ३६ हजार २४ मीटर उंचीची चढण व तितकीच उतरण असा रोजचा सरासरी ५१.१७ किलोमीटरचा पायी प्रवास केला.

सुदेश परब आणि ज्ञानेश्वर



नाईक या तरुण गिर्यारोहकांनी तापी ते तिलारी ही ट्रान्स सह्याद्री मोहीम पूर्ण केली. गुजरात सीमेवर नंदुरबार जवळील प्रकाशा येथे तापी नदीजवळून सुरू झालेल्या प्रवासाची कोकणातील पारगड किल्ला सर करून पुढे गोवा सीमेवरील दोडामार्ग येथील तिलारी नदीजवळ सांगता झाली. या प्रवासात दोघांनी १२७९.३ किलोमीटरचे अंतर २५ दिवसांच्या कालावधीत पूर्ण केले. विशेष म्हणजे, या प्रवासात कोणतेही वाहन, होडी तसेच रेल्वेस्थानकातील एस्केलेटरचा देखील त्यांनी वापर केला नाही. या मोहिमेत डोंगरवाटा, जुने जंगलातील मार्ग, पायवाटा, कच्च्या व पक्क्या रस्त्यांची त्यांनी निवड केली.

सुदेश परब व ज्ञानेश्वर नाईक यांनी बोलताना सांगितले की, ट्रान्स सह्याद्री मोहिमेअंतर्गत सह्याद्रीच्या अखंड घाटमाथ्यावरून पायी चालून आम्ही सुमारे १२०० किलोमीटरहून अधिक अंतर पार केले. मागील २ वर्षांपासून आम्ही या मोहिमेकरिता सराव केला. हजारो किलोमीटरची पायी रेकी व त्या दरम्यान परिसराचा अभ्यासही केला होता. त्यात गड आणि वाटांची माहिती घेणे, गावकऱ्यांशी संवाद साधून पायवाटा जाणून घेण्यापासून या मार्गावरील दुकाने, हॉटेल यांची नोंद ठेवत होतो.

#### २१ गड किल्ल्यांचा समावेश

या मोहिमेत रायकोट, सालोटा, साल्हेर, हातगड, भास्करगड, त्रिंगलवाडी, कुलंगगड, रतनगड, हरिश्चंद्रगड, जीवधन, दुर्ग-ढाकोबा, घनगड, कोकणदिवा, रायगड, मोहनगड, दातेगड, विशाळगड, मुडागड, नारायणगड, महादेवगड आणि पारगड या २१ गडांचा समावेश आहे. यासह अंधारबन, कोयना, सह्याद्री टायगर रिझर्व्ह (बफर झोन), आंबा घाट, बरकी सडा, मुडागड परिसर, मनबेट अशा घनदाट जंगलांतूनही प्रवास केला.

> **या मोहिमेत आम्ही डोंगरमाथ्यांवरून प्रवास केला. त्यामध्ये घाटवाटा, जंगलाचा मार्ग, गावांतील पायवाटांना प्राधान्य दिले. भर उन्हात डांबरी रस्त्यावरून चालताना फारच रटाळ व गर्मीचा त्रास झाला; परंतु, रेकी करताना, लहान मोठ्या मोहिमांदरम्यान शरीराला या सर्वाची सवय केल्यामुळे त्याचा फारसा त्रास झाला नाही. रस्ते पटपट चालत पूर्ण करीत आम्ही पुन्हा घाट किंवा गडांकडे जाणारी वाट निवडून प्रवास करायचो. पहाटे लवकर चालणे सुरू करून सायंकाळपर्यंत आम्ही चालत होतो. दररोज सुमारे ५० ते ६० किलोमीटर अंतर आम्ही पूर्ण करीत होतो.**
>
> **– सुदेश परब, गिर्यारोहक**

# विश्वगुरु होण्याची संधी

इराणवर हल्ला झाल्यापासून मोदींचा भारत गप्प आहे. आखाती प्रदेशातील परिस्थितीबाबत परराष्ट्र खात्याने चिंता व्यक्त केली आहे. पण न्यायाच्या बाजूने ठामपणे व धैर्याने उभे राहण्याचे मात्र टाळले आहे. खरे तर मोदींना खरोखरीचे विश्वगुरू होण्याची ही चांगली संधी आहे. अमेरिका व इराण या दोघांशीही असलेल्या चांगल्या संबंधांचा वापर करून त्यांना मध्यस्थीसाठी पुढाकार घेता येऊ शकतो. पण निव्वळ भारताकडे ४०-५० कोटी लोकांची बाजारपेठ आहे म्हणून जगातले देश सदासर्वकाळ आपल्याला आपोआप मान देतील असे मोदींना वाटते. सरशी तिथे पारशी अशी भूमिका घेणे ही त्यांना चतुराई वाटते. त्याने असे गुरुपद मिळत नसते. त्यासाठी कुठेही अन्याय झाला तर तसे म्हणणे व स्पष्ट निषेध करणे आवश्यक असते. अमेरिका व इस्रालयने इराणवर केलेला हल्ला हा कोणत्याच अर्थाने समर्थनीय नाही. इराणने कोणत्याही देशावर अलिकडे हल्ला केलेला नव्हता व तशी धमकी दिलेली नव्हती. उलट आपल्याबाबतच्या आक्षेपांसंदर्भात अमेरिका व इतर देशांशी चर्चा करण्याची तयारी त्याने दर्शवली होती व तशी चर्चा जीनिव्हा इथे चालूही होती. इराणकडे अण्वस्त्रे बनवता येईल अशा प्रकारचे युरेनियम साठवलेले आहे असे तुणतुणे अमेरिकेने अनेक वर्षांपासून लावलेले आहे. इराणला ते मान्य नाही. तरीही ओबामा यांच्या पुढाकाराने झालेल्या कराराला २०१५ मध्ये इराणने मान्यता दिली. अण्वस्त्रप्रसारबंदी कायद्यावरही सही केली. त्यानुसार देशातील अणुउर्जा निर्माण करणाऱ्या भट्ट्यांची जागतिक तपासणी पथकाला पाहणी करू देण्याची मुभा या सहीमुळे दिली गेली. म्हणजे इराणने आपला अणुकार्यक्रम जगापुढे उघडा केला. तरीही इराण छुप्या रीतीने अण्वस्त्रे बनवतो आहे असे इस्रायल व अमेरिकेचे म्हणणे होते. म्हणून गेल्या वर्षी जूनमध्ये इराणच्या अणुभट्ट्यांवर हल्ले करण्यात आले. त्यात इराणच्या भट्ट्यांचे प्रचंड नुकसान झाले असून आता इराणकडे अण्वस्त्रे बनवण्याची शक्ती नाही असे डोनाल्ड ट्रम्प यांनी जाहीर केले होते. इतके होऊनही पुन्हा २०२६ च्या आरंभापासून त्यांनी इराणविरुध्द तक्रारी करायला सुरूवात केली. अखेर इस्रायलने त्यांना भरीला घातले व दोघांनी मिळून पुन्हा हल्ले केले. हे हल्ले तमाम आंतरराष्ट्रीय कायदे व नियम यांच्या संकेतांचा भंग करणारे आहेत.

## वाघ्या म्हटले तरी खातोच...

इराण व खामेनी हे आपले जुने मित्र होते. इराणकडून आपण मुबलक प्रमाणात तेल घेत होतो व त्याचे पेमेंट आपण रुपयांमध्ये देऊ शकत होतो. त्या बदल्यात इराण आपल्याकडून तांदुळ, साखर, फळे इत्यादी मोठ्या प्रमाणात आयात करीत असे. अशा या मित्रदेशाच्या सर्वोच्च नेत्याची हत्या झाली असता त्याबद्दल श्रध्दांजली नाही तरी किमान खेद व्यक्त करणे आवश्यक होते. पण तसे केल्याने अमेरिका व ट्रम्प नाराज होतील असे मोदींना वाटत असावे. यापूर्वी कोणतेही दृश्य कारण नसताना ट्रम्प यांनी भारतावर सर्वाधिक ५० टक्के आयातशुल्क लावले होते. नंतर रशियाकडून तेल घेणे आपल्याला बंद करायला लावले होते. पाकिस्तानसोबतचे युध्द आपणच थांबवायला भाग पाडले असे ट्रम्प सांगत असतात. तो अपमान आपण रोज शांतपणे गिळत असतो. भारतासाठी ट्रम्प नावाचा लांडगा, वाघ म्हटले तरी खातो आणि वाघ्या म्हटले तरी खातो अशी स्थिती आहे. त्यामुळे भारताने नैतिक भूमिका घेणे गरजेचे होते. सध्याचा काळ हा युध्दाचा काळ नाही असे रशियाचे पुतीन यांना मोदी यांनी सांगितले होते. त्याबद्दल त्यांची बरीच प्रशंसा झाली होती. कदाचित पुतीन यांना तसे सांगणे सोपे होते. ते भारतावर निर्बंध लादण्याच्या स्थितीत नाही. त्यामुळे त्यांना युध्द बंद करण्याचा अप्रत्यक्ष उपदेश करणे मोदींना शक्य झाले. पण ट्रम्प यांच्या विरोधात मात्र चुकूनसुध्दा एक शब्दही उच्चारण्याची हिंमत मोदी दाखवू शकत नाहीत. एरवी हे मोदी १४० कोटी भारतीयांचा आपल्याला पाठिंबा आहे आणि भारत ही कशी चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था आहे वगैरे दावे करीत असतात. पण या ताकदीचा वापर करून मोदी ट्रम्प यांना तुमचे चुकले असे का सांगू शकत नाहीत असा प्रश्न पडतो.

## न्यायाची चाड हवी

हे असे होते कारण, मोदी व त्यांच्या पक्षाला न्याय नावाच्या गोष्टीची चाड नाही. देशातील मुस्लिमांच्या विरोधात भाजप परिवारातील लोक विष ओकत असताना मोदी व इतर नेते बाजूला बसून गंमत पाहत राहतात. निवडणूक प्रचारात स्वतःच या विष ओकण्यात सामील होतात. त्यामुळे इराणसारख्या मुस्लिम देशाच्या प्रमुखाची हत्या होत असेल तर निषेध करावा असे यांना वाटणारच नाही. त्यातून मुस्लिम जगात अरब विरुध्द इराण असा संघर्ष नव्याने भडकला आहे. इराणने दुबई, अबूधाबी, कतार सौदी इत्यादींवर हल्ले करून प्रत्त्युत्तर दिले आहे. त्यामुळे अरब देश अमेरिकेच्या बाजूला आहेत. सध्या या अरब देशांशी मोदींनीही मैत्री जुळवली आहे. त्यामुळे त्यादृष्टीनेही इराणवरच्या हल्ल्याचा निषेध न करणे त्यांच्यासाठी सोईचे आहे. मात्र उद्या समजा अमेरिकेने सौदी किंवा यूएईवर हल्ला केला तरीही भारत आपल्या या मित्रांसाठी उभा राहील याची खात्री उरलेली नाही असे या ताज्या घटनांवरून म्हणता येईल. भारताने नेहरूंच्या काळापासून अमेरिका व रशिया या दोघांपासूनही समान अंतर कायम राखले होते. त्यामुळे वेळोवेळी दोघांच्याही आततायी राजकारणाचा नेहमी निषेध केला होता. पण आता मात्र आपले धोरण निव्वळ अमेरिकेच्या बाजूने झुकलेले आहे असे नव्हे तर ट्रम्प यांच्यापुढे गोंडा घोळणारे झाले आहे. भारत नावाची महासत्ता आणि ५६ इंची छातीवाले मोदी या दोघांचेही ट्रम्प नावाच्या राक्षसी राजकारण्याने पुरते वस्त्रहरण केले आहे. खामेनी यांच्या हत्येचा निषेध न करता, किमान या मृत्यूबद्दल शोक व्यक्त करणे आपल्याला शक्य होते. पण तेवढेही करण्याचे धाडस आपण दाखवलेले नाही. आता होरमुझच्या खाडीतून व्यापार बंद होण्याचा मोठा फटका आपल्याला बसेल. आपले तेल, नैसर्गिक वायू येणे बंद होईल. तसेच अमेरिका व आखाती देशांकडची आपली निर्यातही ठप्प होईल. आपले कांदे, द्राक्षे, केळी इत्यादी आखातात जाणे थांबले आहे. ऐन रमजानच्या महिन्यात ही निर्यात थांबल्याने आपल्या शेतकऱ्यांना मोठा फटका बसणार आहे. म्हणजे मोदी सरकार गप्प बसले किंवा न बसले तरी त्याचा आर्थिक परिणाम व्हायचा तो होणार आहेच. येत्या काळात तेल व नैसर्गिक वायूचे भावही भडकणार आहेत. इतर वस्तूही महाग होऊ शकतात. युध्द अधिक काळ चालले तर परिणाम अधिक गंभीर होतील. अशा स्थितीत अमेरिका व इस्रायल यांना कळेल अशा शब्दात मार देणे आवश्यक आहे. या युध्दाची झळ बसणाऱ्या सर्व गरीब देशांच्या वतीने भारताने ही बाजू मांडायला हवी. चीन नेहमीप्रमाणे या बाबतीत अंगचोरपणा करील. पण भारताने हे करावे अशी सर्वांची अपेक्षा आहे.

विचार

# 'मोफत' संस्कृतीवर सर्वोच्च ताशेरे

***पंतप्रधानांनासह विविध नेते मोफतच्या 'रेवड्यां'वर (फ्रीब्रीज) टीका करत असले, तरी सोय आणि प्रदेशानुसार भाषा बदलते. मोफतच्या योजनांमुळे मतदार सत्ता देत असल्याने निकोप लोकशाही तत्त्वांना धोका निर्माण होतो. हा प्रश्न केवळ राजकारणाचा नाही, तर अर्थशास्त्र, सामाजिक न्याय आणि संघराज्यीय संतुलन यांचा आहे. सर्वोच्च न्यायालयाने व्यक्त केलेल्या चिंता या लोकशाहीच्या आरोग्यासाठी महत्त्वाच्या आहेत.***




**प्रा. अशोक ढगे**

निवडणुकीच्या तोंडावर जाहीर होणाऱ्या 'मोफत योजनां'ना लोकप्रिय भाषेत 'फ्रीबीज' म्हटले जाते. या प्रश्नावर देशातील सर्वोच्च न्यायालयाने पुन्हा एकदा ठाम भूमिका घेतली आहे. सर्वोच्च न्यायालयाने तमिळनाडू सरकारला सुनावताना अलिकडे एका राज्याला नाही, तर संपूर्ण देशातील राजकीय व्यवस्थेला आरसा दाखवला. सरन्यायाधीश सूर्य कांत यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने यावेळी 'आपण देशात नेमकी कोणती संस्कृती रुजवत आहोत?' असा मूलभूत प्रश्न विचारला. तमिळनाडू वीज वितरण महामंडळाने सर्व ग्राहकांना त्यांची आर्थिक स्थिती विचारात न घेता मोफत वीज देण्याचा प्रस्ताव मांडला. या पार्श्वभूमीवर न्यायालयाने स्पष्ट केले, की ज्यांना खरेच गरज आहे, त्यांना मदत करणे हे कल्याणकारी राज्याचे कर्तव्य आहे; मात्र आर्थिक ताकद असलेले आणि आर्थिक ताकद नसलेल्यांमध्ये फरक न करता सर्वांना मोफत सुविधा देणे ही अर्थकारणाच्या दृष्टीने धोकादायक बाब आहे. आधीच महसुली तुटीशी झुंजणारी राज्ये अशा योजनांमुळे विकासासाठी आवश्यक निधीपासून वंचित राहतात, असे न्यायालयाने अधोरेखित केले. अनेक राज्ये आपल्या उत्पन्नाचा मोठा भाग वेतन आणि मोफत योजनांवर खर्च करतात. परिणामी, पायाभूत सुविधा, उद्योग, रोजगारनिर्मिती यासारख्या दीर्घकालीन विकासात्मक क्षेत्रांकडे दुर्लक्ष होते. मोफत अन्न, मोफत सायकल, मोफत वीज अशी साखळी सुरू राहिल्यास काम करण्याची संस्कृती कशी टिकेल, असा प्रश्न सर्वोच्च न्यायालयाने विचारला. हा प्रश्न केवळ शब्दांचा नव्हता, तर आर्थिक शिस्तीचा आणि सामाजिक जबाबदारीचा मुद्दा होता.

यासंदर्भातील चर्चेप्रसंगी न्यायालयाने आणखी एक महत्त्वाचा मुद्दा उपस्थित केला. या योजनांसाठी पैसा येणार कुठून? शेवटी तो करदात्यांचाच पैसा आहे. मोठे जमीनदार आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम लोकदेखील मोफत सुविधांचा लाभ घेत असतील, तर ही 'तुष्टीकरणाची' पद्धत ठरत नाही का, असा सवाल करण्यात आला. निवडणुकीच्या आधीच अशा योजनांची घोषणा का केली जाते, असाही प्रश्न न्यायालयाने उपस्थित केला. ही टीका केवळ तमिळनाडूपुरती मर्यादित नसून देशभरातील राजकीय पक्षांनी आणि धोरणकर्त्यांनी आत्मपरीक्षण करण्याची वेळ आली आहे, असा स्पष्ट संदेश यातून मिळतो. कल्याणकारी योजना आणि आर्थिक शिस्त यांचा समतोल साधणे ही आजची गरज आहे. अन्यथा, अल्पकालीन लोकप्रियतेच्या मोहात दीर्घकालीन आर्थिक विकास धोक्यात येऊ शकतो. लोकशाहीत लोकहित सर्वोच्च असले, तरी लोकहिताचे भान आणि आर्थिक जबाबदारी यांची सांगड घालणे हीच शाश्वत राजकारणाची खरी कसोटी ठरते. भारतीय निवडणूक राजकारणात 'मोफत योजना' किंवा 'फ्रीबीज' हा शब्द केवळ प्रचारकी घोषणांपुरता मर्यादित राहिलेला नाही, तर तो आता देशाच्या आर्थिक आराखड्याशी, मतदारांच्या मानसिकतेशी आणि लोकशाहीच्या आरोग्याशी थेट जोडला गेला आहे. अलीकडील काळात सर्वोच्च न्यायालयाने चिंता व्यक्त केल्यानंतर हा मुद्दा अधिक गांभिर्याने चर्चिला जाऊ लागला आहे. केंद्र आणि अनेक राज्ये निवडणुकीच्या तोंडावर मोठ्या प्रमाणात रोख अनुदाने, वीज-पाणीमाफी, प्रवास सवलती, शेतकरी कर्जमाफी, महिलांसाठी किंवा युवकांसाठी थेट आर्थिक सहाय्य अशा योजना जाहीर करतात. काही योजना सामाजिक सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक असल्या, तरी त्यांचा आर्थिक भार प्रचंड असतो. राज्यांच्या अर्थसंकल्पातील मोठा हिस्सा या योजनांवर खर्च होऊ लागल्यास पायाभूत सुविधा, शिक्षण, आरोग्य, उद्योगविकास अशा दीर्घकालीन गुंतवणुकींवर परिणाम होतो. महसूल कमी आणि खर्च जास्त अशी परिस्थिती निर्माण झाली, की राज्ये कर्जावर अवलंबून राहतात. परिणामी, व्याजाचा बोजा वाढतो आणि पुढील पिढ्यांवर आर्थिक ओझे पडते. केंद्र सरकारलाही अशाच दबावांना सामोरे जावे लागते. राष्ट्रीय पातळीवर दिल्या जाणाऱ्या रोख सहाय्य योजनांचा परिणाम देशाच्या एकूण वित्तीय तुटीवर होतो. वित्तीय शिस्त बिघडल्यास महागाई, गुंतवणूक घट आणि आर्थिक अस्थिरता यासारखे दुष्परिणाम संभवतात. नीती आयोगाने या विषयावर गंभीर चिंता व्यक्त केली असली, तरी त्याची दखल घ्यायला कुणीही तयार नाही. 'लाडक्या बहिणीं'मुळे महाराष्ट्रासारख्या राज्याच्या आर्थिक स्थितीवर किती परिणाम झाला आहे, हे अन्य कल्याणकारी योजनांना लागलेली कात्री, ठेकेदाराची थकित बिले, शिवभोजन योजनेच्या चालकांचे थकलेले बील, लाडक्या बहिणींचे हप्ते वेळेवर मिळण्यात निर्माण झालेल्या अडचणी यावरून लक्षात येते.

मोफत योजनांचा सर्वात थेट परिणाम मतदारांच्या निर्णयप्रक्रियेवर होतो. निवडणुकीपूर्वी जाहीर होणाऱ्या आकर्षक घोषणांमुळे मतदार तात्कालिक लाभाच्या आधारावर मतदान करण्याची शक्यता वाढते. दीर्घकालीन विकास, शासनाची पारदर्शकता, रोजगारनिर्मिती, शिक्षण-आरोग्याची गुणवत्ता या मुद्द्यांपेक्षा 'तत्काळ मिळणारा फायदा' अधिक प्रभावी ठरतो. यामुळे मतदार आणि सत्ताधारी यांच्यात एक प्रकारचा व्यवहाराधारित संबंध निर्माण होतो. शासन हे विकासाचे साधन न राहता लाभवाटपाचे माध्यम बनते. अशा वातावरणात धोरणांची गुणवत्ता, प्रशासनातील कार्यक्षमता आणि उत्तरदायित्व या बाबी दुय्यम ठरतात. महाराष्ट्र, मध्य प्रदेश, कर्नाटक, हिमाचल प्रदेश, राजस्थान आदी राज्यांमध्ये मोफतच्या योजनांचा परिणाम झाला. लोकशाहीची खरी ताकद ही सुजाण मतदार आणि जबाबदार राजकारणात असते. निवडणुका केवळ 'कोण अधिक देतो' या स्पर्धेत रूपांतरित झाल्या, तर विचारप्रधान राजकारण मागे पडते. सार्वजनिक धोरणांवर सखोल चर्चा कमी होते आणि अल्पकालीन लोकप्रियतेला प्राधान्य दिले जाते. याचा आणखी एक गंभीर परिणाम म्हणजे आर्थिक असमतोल. समृद्ध राज्ये काही प्रमाणात अशा योजना टिकवू शकतात; परंतु आर्थिकदृष्ट्या कमकुवत राज्यांमध्ये या योजनांमुळे वित्तीय संकट उद्‌भवू शकते. परिणामी, विकासात असमानता वाढते. तसेच सततच्या मोफत योजनांमुळे 'हक्क' आणि 'सवलत' यामधील भेद अस्पष्ट होतो.

शिक्षण, आरोग्य, अन्नसुरक्षा हे मूलभूत हक्क आहेत; परंतु प्रत्येक निवडणुकीमध्ये नवीन मोफत सवलतींची अपेक्षा निर्माण झाल्यास शासनाची प्राधान्ये विस्कळीत होतात. या चर्चेतला एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे सामाजिक न्याय. गरीबी, बेरोजगारी, विषमता यासारख्या समस्यांवर मात करण्यासाठी काही थेट सहाय्य योजना आवश्यक असतात. प्रश्न असा आहे, की त्या योजनांचा उद्देश सक्षमीकरणाचा आहे की केवळ मतदारांना आकर्षित करण्याचा? योजना शिक्षण, कौशल्यविकास, उद्योजकता, आरोग्य यासारख्या क्षेत्रांमध्ये दीर्घकालीन परिणाम घडवत असल्यास समाजासाठी गुंतवणूक ठरतात; पण केवळ उपभोग वाढवणाऱ्या आणि निवडणूककेंद्रित असल्यास टिकाऊ विकासाला अडथळा ठरू शकतात. निवडणूक जाहीरनाम्यामधील आश्वासने वित्तीय जबाबदारीच्या चौकटीत असावीत. स्वतंत्र वित्तीय संस्थांकडून अशा घोषणांचे आर्थिक परिणाम विश्लेषित केले जावेत. मतदारांनीही केवळ तात्कालिक लाभ न पाहता दीर्घकालीन परिणामांचा विचार करणे गरजेचे आहे. राजकारणात कल्याणकारी धोरणे आवश्यक आहेत; पण ती शाश्वत आणि पारदर्शक असली पाहिजेत. अन्यथा, लोकशाहीचा पाया कमकुवत होण्याचा धोका आहे. मोफत योजनांचा प्रश्न हा केवळ आर्थिक नसून लोकशाहीच्या आरोग्याशी संबंधित आहे. निवडणुकीतील स्पर्धा लाभवाटपापुरती मर्यादित राहिल्यास विचारप्रधान आणि विकासाभिमुख राजकारण दुय्यम ठरेल.

केंद्र आणि राज्यांनी वित्तीय शिस्त, सामाजिक न्याय आणि दीर्घकालीन विकास या तिन्हींचा समतोल साधला, तरच लोकशाही मजबूत राहील. सर्वोच्च न्यायालयाने 'फ्रीबीज'बाबत केलेल्या टिप्पण्यांमुळे हा प्रश्न केवळ राजकीय न राहता आर्थिक शिस्त, लोकशाहीतील समतोल आणि राज्यांच्या दीर्घकालीन विकासाशी निगडित गंभीर धोरणात्मक मुद्दा ठरला आहे. लोककल्याणाच्या दृष्टीने आवश्यक सेवा, जसे की शिक्षण, आरोग्य, अन्नसुरक्षा ही राज्याची जबाबदारी आहे; परंतु निवडणुकीच्या तोंडावर जाहीर होणाऱ्या विनाअट सवलती राज्याच्या अर्थसंकल्पावर मोठा ताण आणू शकतात. न्यायालयाने हेही सूचित केले, की अशा योजनांचा दीर्घकालीन आर्थिक परिणाम विचारात घेतला गेला पाहिजे. मात्र थेट बंदी घालण्याऐवजी धोरणात्मक आणि संस्थात्मक मार्गदर्शनाची गरज अधोरेखित केली आहे. केंद्र सरकारच्या दृष्टीने हा मुद्दा दोन पातळ्यांवर महत्त्वाचा आहे. एक म्हणजे वित्तीय शिस्त. देशाचा एकूण राजकोषीय तुटीचा आकडा नियंत्रित ठेवणे, ही केंद्राची जबाबदारी आहे. राज्ये मोठ्या प्रमाणात कर्ज घेऊन मोफत योजना राबवत असतील, तर अखेरीस त्याचा परिणाम देशाच्या एकूण अर्थव्यवस्थेवर होतो. दुसरी बाब म्हणजे भारताची राज्यघटना संघराज्यीय आहे. प्रत्येक राज्याला स्वतंत्र आर्थिक धोरणे राबवण्याचा अधिकार आहे; परंतु केंद्राने कठोर निकष लावल्यास राज्यांच्या स्वायत्ततेपुढे प्रश्नचिन्ह निर्माण होऊ शकते. त्यामुळे केंद्र सरकारला संतुलित भूमिका घ्यावी लागणार आहे.

चर्चा आजची

# आखाती युद्ध नव्या संकटाची नांदी

**सुयोग आंग्रे**

इराण विरुद्ध इस्रायल-अमेरिकेची संयुक्त लष्करी कारवाई सध्या तरी कोणत्याही निकालापर्यंत पोहोचताना दिसत नाही. ना इस्त्रायल-अमेरिकेचे हल्ले थांबत आहेत ना इराणचा बदला. इराणने चर्चेसाठी सहमती दर्शवल्याचे ट्रम्प सांगत असले तरी इराणचे नेते मात्र याचा साफ इन्कार करत आहेत. हा लष्करी संघर्ष कधी आणि कसा संपेल हे सांगणे कठीण आहे, कारण इराणचे सर्वोच्च नेते खामेनी यांच्या निधनाने तेथे सत्तापरिवर्तन होण्याची शक्यता नाही. इराण या क्षणी नेतृत्वहीन दिसत आहे, परंतु त्याचे सैन्य आणि विशेषतः इस्लामिक रिव्होल्यूशनरी गार्ड्स कॉर्प्स मागे हटण्यास तयार नाहीत. इस्त्रायली आणि अमेरिकन लक्ष्यांना लक्ष्य करण्याबरोबरच ते आखाती देशांतील नागरी भागांवर ड्रोन आणि क्षेपणास्त्रेही डागत आहे. त्यामुळे या देशांमध्ये अराजकतेचे वातावरण आहे. इराण शेजारील देशांच्या नागरी लक्ष्यांना कोणत्या उद्देशाने लक्ष्य करत आहे हे माहीत नाही, कारण याद्वारे तो आपले विरोधक तर वाढवत आहेच पण पूर्वीपेक्षा अधिक एकटा पडत आहे.

सौदी अरेबिया, कतार, संयुक्त अरब अमिराती, बहरीन, कुवेत आणि ओमान या सर्व देशांवर इराणी क्षेपणास्त्रांनी किंवा ड्रोनने हल्ले केले, तर यापैकी एकाही देशाने इराणवर त्यांच्या हद्दीतून हल्ला केला नाही. अमेरिकेचे लष्करी तळ, विमानतळ, बंदरे आणि व्यावसायिक क्षेत्रांसह या देशांतील अनेक ठिकाणांना लक्ष्य करण्यात आले. हा लढा पुढे खेचला तर आखाती देशांसाठी तो खरा वळणाचा मुद्दा बनू शकतो. एक टर्निंग पॉइंट जो देशांची सुरक्षा, द्विपक्षीय सहकार्य आणि त्यांच्या दीर्घकालीन आर्थिक भविष्याबद्दल विचार करण्याची पद्धत बदलेल. इराणचा समावेश असलेल्या कोणत्याही प्रदीर्घ संघर्षाचा सागरी वाहतुकीवर परिणाम होईल, विशेषत: होर्मुझच्या समुद्रधुनीमध्ये, जगातील आर्थिक धमन्यांपैकी एक. अगदी किरकोळ



व्यत्ययांमुळे ऊर्जेच्या किमती वाढू शकतात, ज्यामुळे गुंतवणुकदारांसाठी नवीन चिंता निर्माण होऊ शकते. उच्च तेलाच्या किमती अल्पकालीन महसूल वाढवू शकतात, तरीही ऊर्जा बाजार असंतुलित होतील. ट्रम्प यांनाही तेलाच्या किमती वाढवण्याची इच्छा होती का? चीन आणि रशिया फार काळ गप्प बसणार नाहीत. मॉस्कोने थेट उडी घेतली नसली तरी या गदारोळाचा फायदा घेऊन तो शस्त्रविक्री वाढवू शकतो, प्रादेशिक विभाजनाचाही फायदा घेऊ शकतो.

इराण ज्या प्रकारे ऊर्जा पुरवठा मार्गांना आणि विशेषतः होर्मुझ समुद्रधुनीला धोका निर्माण करत आहे, त्यामुळे तेल आणि वायूच्या पुरवठ्यावर परिणाम होऊ लागला आहे. हा सागरी मार्ग अंदाजे २५ टक्के तेल आणि ३० टक्के एलएनजी पुरवठ्याचा मार्ग आहे, ज्यामुळे जागतिक ऊर्जा सुरक्षेसाठी ते अत्यंत महत्त्वाचे आहे. हा जलमार्ग अडवला म्हणजे तेल आणि वायूच्या किमती वाढल्या आणि आशिया आणि युरोपसह जगाच्या इतर भागांच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम होईल. लक्षात ठेवा तेलाच्या किमती वाढू लागल्या आहेत. दोन गोष्टी सध्या स्पष्ट नाहीत. एक म्हणजे किती काळ हा लढा सुरू राहणार आहे. दुसरे म्हणजे याव्यतिरिक्त, लेबनॉनमधील हिजबुल्ला आणि येमेनमधील हुथी बंडखोर इस्रायलवर हल्ले करतील का? तेहरानने मान्य केले की ते बॅलिस्टिक क्षेपणास्त्रांचा साठा कमी करेल. तेहरानने नागरी आण्विक युरेनियमवर प्रक्रिया करण्यावरील निर्बंधांच्या वाटाघाटीमध्ये लवचिकता दर्शविली आहे, परंतु त्याची क्षेपणास्त्रे पूर्णपणे काढून टाकण्यास सहमती दर्शविली नाही.

सर्वात दुर्दैवाची गोष्ट म्हणजे व्हिएन्नात बसलेले रणनीतीकार इस्रायलकडे अण्वस्त्रे आणि क्षेपणास्त्रे असल्याचा मुद्दा कधीच मांडत नाहीत. इस्रायलकडे नव्वद अण्वस्त्रे आहेत की दोनशे हे विचारले जात नाही! तो अशा शस्त्रांच्या अस्तित्वाची पुष्टी किंवा नाकारत नाही. क्षेपणास्त्रे, पाणबुडी आणि विमानातून अण्वस्त्रे डागण्यास सक्षम असल्याचे मानले जाते. २०२४ मध्ये, इस्रायलने त्याच्या अणुबॉम्बच्या बांधकाम आणि देखभालीवर ११ अब्ज खर्च केले होते. केवळ अणुहल्ल्याची धमकी देऊन इराणवर हल्ला होऊ शकतो, तर पाकिस्तानने तशा प्रकारची धमकी भारताला अनेकदा दिली आहे. पाकिस्तान आणि अफगाणिस्तानमध्ये बॉम्बस्फोट सुरू असताना इराणवर हा हल्ला झाला आहे. पाकिस्तानने या लष्करी कारवाईला ऑपरेशन 'गजब लिल-हक' असे नाव देऊन खुले युद्ध घोषित केले आहे. या हल्ल्यात १३० हून अधिक तालिबानी मारले गेल्याचा पाकिस्तानचा दावा आहे. पाकिस्तान आणि भारत यांच्यात युद्धबंदीचे खोटे दावे करणाऱ्या डोनाल्ड ट्रम्प यांच्या बारा महिन्यांत सात देशांवर हल्ले झाले आणि एका नेत्याला कैद करण्यात आले, हे विचित्र आहे. सर्वात दुःखाची गोष्ट म्हणजे आंतरराष्ट्रीय समुदाय ट्रम्प यांच्या एकतर्फी कारवाईकडे मूक प्रेक्षक आहे. हे लष्करी संघर्ष जितक्या लवकर थांबेल तितके पश्चिम आशियासह जगासाठी चांगले होईल, परंतु त्याचे स्वरूप तेव्हाच आकार घेतील जेव्हा दोन्ही बाजूंना हे समजेल की ते स्वबळावर चालू शकत नाहीत. इराण इस्त्रायल आणि अमेरिकेला धडा शिकवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत असेल, पण या दोन देशांच्या लष्करी सामर्थ्याला फार काळ तोंड देण्याच्या स्थितीत तो नाही. त्याचप्रमाणे इराणमध्ये अचानक सत्ता परिवर्तन घडवून आणणे अमेरिका आणि इस्रायलसाठी सोपे नाही.

लोकसंसद

## बोगस दिव्यांग प्रमाणपत्रांमुळे खरे दिव्यांग वंचित

राज्यात बनावट दिव्यांग प्रमाणपत्र सादर करून शासकीय सेवेत कार्यरत असलेल्या अनेक अधिकारी-कर्मचाऱ्यांवर कारवाईचा बडगा उगारण्यात आल्याची बातमी अलीकडेच समोर आली. विविध स्थानिक स्वराज्य संस्था आणि सरकारी यंत्रणांमध्ये अशा बोगस प्रमाणपत्रांच्या आधारे नोकरी मिळवलेल्या कर्मचाऱ्यांची छाननी करण्यात आली असून त्यातून अनेक धक्कादायक बाबी उघडकीस येत आहेत. दिव्यांगांसाठी असलेल्या आरक्षणाचा गैरफायदा घेतल्याचे हे प्रकार चिंताजनक आहेत. विशेष म्हणजे प्रशिक्षणार्थी आयएएस अधिकारी पूजा खेडकर प्रकरण गाजल्यानंतरच देशभरात अशा प्रमाणपत्रांची पडताळणी करण्याची प्रक्रिया अधिक गांभीर्याने सुरू करण्यात आली. दिव्यांग व्यक्तींना शिक्षण, नोकरी आणि समाजातील संधी समानपणे उपलब्ध व्हाव्यात म्हणून आरक्षण आणि विविध सवलती देण्यात आल्या आहेत. परंतु बनावट प्रमाणपत्रांच्या आधारे सक्षम व्यक्तींनी त्या जागा बळकावल्यास खऱ्या दिव्यांगांसाठी असलेले दरवाजेच बंद होतात. त्यामुळे हा प्रकार केवळ नियमभंग नसून सामाजिक अन्याय आहे. म्हणूनच अशा बनावट प्रमाणपत्रधारकांवर केवळ निलंबनाची कारवाई करून भागणार नाही. त्यांच्यावर कठोर फौजदारी कारवाई करून अशा गैरप्रकारांना कायमचा आळा घालण्याची गरज आहे. अन्यथा संधीसाधूंच्या लोभामुळे खरे दिव्यांगच पुन्हा संधीपासून वंचित राहतील.

**– दीपक काशिराम गुंडये, वरळी.**

दिनविशेष

# राष्ट्रीय बालहक्क संरक्षण आयोग

मानवी शरीर ही एक अतिशय गुंतागुंतीची रचना आहे. माणसाच्या सर्व अवयवांचे कार्य हे शरीराच्या एक-दुसऱ्यांच्या कार्यावर अवलंबून असते. त्यापैकीच तोंडातील दात हा देखील एक अवयव असून, त्याचे आरोग्य बिघडल्यास त्याचे परिणाम इतर अवयवांवरही होतात. आजारी दात आणि हिरड्या यांचा संबंध मधुमेह आणि हृदयविकार यांसारख्या दुर्दर आजारांशी आहे. यामुळे दातांचे आरोग्य सुदृढ राखणे गरजेचे आहे. दातांच्या व मौखिक आरोग्याबाबत जागृती करण्यासाठी दरवर्षी ६ मार्च हा राष्ट्रीय दंत दिवस म्हणून पाळला जातो. दिवसातून दोन वेळा (उठल्यानंतर आणि झोपण्यापूर्वी) फ्लोराईड टूथ पेस्टने दात घासावेत. तसेच फ्लॉस किंवा प्रॉक्साब्रश वापरून दातांच्यामधील स्वच्छता करणे, कडक किंवा द्रव पदार्थ खाल्ल्यानंतर योग्य प्रकारे स्वच्छता करणे आणि हिरड्यांचा मसाज करणे या मूलभूत स्वच्छता आवश्यक आहेत. दंतपोकळ्यांचे म्हणजेच कॅव्हिटीजचे निदान आणि उपचार सुरुवातीच्या टप्प्यावरच केल्यास दात आणि हिरड्यांमधील संक्रमण टाळले जाते. जर संसर्गामुळे तुमचे दात किडले असतील, तर रूट कॅनाल उपचार सहजपणे आणि निश्चितपणे बरे करू शकतात. त्याचप्रमाणे हिरड्यांच्या गंभीर स्वरूपाच्या संसर्गावरदेखील हिरड्यांच्या शस्त्रक्रिया आणि प्रगत उपचार केले जाऊ शकतात. वेदनामुक्त उपचारसध्या दंतशल्यचिकित्सांची वाढलेली कौशल्ये, साहित्य आणि तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे या सर्व प्रक्रिया तुलनेने वेदनामुक्त झाल्या आहेत. योग्य उपचार आणि काळजी घेऊन काढता येऊ शकणाऱ्या दातांशिवाय तुम्हाला जीवन जगणे शक्य आहे. मुलांच्या दातांकडे लक्ष द्यामुलांच्या दातांच्या समस्यांवर लक्ष ठेवले पाहिजे. पुढील आयुष्यातील गुंतागुंतीच्या समस्या टाळण्यासाठी त्यांना लहान वयातच दंतवैद्यांकडे नेले पाहिजे. गरज पडल्यास दुधाच्या दातांमध्ये फिलिंग आणि रूट कॅनॉल करून घ्यावे. जर ते वाकडे किंवा अयोग्य स्थितीत असतील तर क्लिप, ब्रेसेस किंवा अलाइनर उपाय देऊ शकतात. आजकाल प्रगत डिजिटल तंत्रज्ञान आणि मेटल फ्री सिरॅमिक व्हीनियर्स आणि क्राउन्सद्वारे स्माईल करेक्शन उपचार करता येतात. दर ६ महिन्यांनी दंतचिकित्सकाला भेट देणे किंवा वर्षातून किमान एकदा दातांची साफसफाई केल्याने तुम्ही रोगमुक्त राहू शकता. यामुळे दातांच्या समस्या लवकर समजल्याने त्यावर योग्य उपचार पुढील समस्या टळू शकतात. योग्य चावण्याच्या प्रक्रियेसह चांगली मौखिक स्वच्छता ही चांगल्या आरोग्याची गुरुकिल्ली आहे. राष्ट्रीय दंत चिकित्सक दिवस दरवर्षी ६ मार्च रोजी साजरा केला जातो. हा दिवस दंतचिकित्सकांच्या मेहनतीला आणि योगदानाला सन्मान देण्यासाठी साजरा केला जातो. दंतचिकित्सक केवळ दातांची देखभालच करत नाहीत, तर तोंडाच्या आरोग्याची संपूर्ण काळजी घेतात. तोंडाचे आरोग्य हे संपूर्ण शरीराच्या आरोग्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे.

राष्ट्रीय दंतवैद्य दिन हा महत्त्वाचा आहे कारण तो दंत स्वच्छता आणि आरोग्य किती महत्त्वाचे आहे यावर भर देतो. हा दिवस व्यक्तींना मौखिक आरोग्याला प्रोत्साहन देण्यासाठी दंतवैद्य करत असलेल्या कामाचे कौतुक करण्याची, त्यांच्या मौखिक आरोग्याला प्राधान्य देण्याची आणि गरज पडल्यास व्यावसायिक दंत उपचार घेण्याची आठवण करून देतो. हे जागरूकता वाढवते आणि दंतवैद्य आणि इतर दंत व्यावसायिकांच्या तोंडाच्या आजारांना प्रतिबंध करण्यासाठी आणि चांगले तोंडाचे आरोग्य वाढवण्यासाठी केलेल्या कार्याचा सन्मान करते. याव्यतिरिक्त, ते लोकांना नियमित दंत तपासणी आणि चांगल्या तोंडी स्वच्छतेच्या सवयींचे मूल्य शिकवते.

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

६ मार्च

१) श्री.वसंत चिंतू गुंजाळ
मु.बुरूमखाण वरसोली, अलिबाग
दि.०६-०३-१९४०

२)श्री.मधुकर चिंतामण नाईक
मु.बागमळा, ता.अलिबाग
दि.०६-०३-१९४१

३)श्री.विलास जयराम जगे
ठिकरूळ-नाका, अलिबाग
दि.०६-०३-१९५१

**कृषीवलच्या वाचकांना आवाहन**




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

# नेरळ-गुडवण रस्त्याकडे दुर्लक्ष

## • सिमेंटच्या बांधकामावर पाण्याचा कमी वापर; ठेकेदारांची मनमानी



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील नेरळ-गुडवण रस्त्यावर अनेक कामे सुरू आहेत. या कामांची पाहणी करायला एमएमआरडीएचे अभियंते येत नाहीत. त्यामुळे ठेकेदाराकडून मर्जीनुसार कामे सुरू आहेत. एमएमआरडीएकडून आपल्या मर्जीतील ठेकेदाराला करोडोंचे कामे दिली असल्याने ठेकेदाराला मालामाल करण्यासाठी अधिकारी वर्ग जाणीवपूर्वक या कामाकडे दुर्लक्ष करीत आहे, असा आरोप स्थानिक ग्रामस्थांनी केला आहे.

कर्जत-मुरबाड राष्ट्रीय महामार्गपासून सुगावे फाटा येथून गुडवण-नेरळ या राज्यमार्ग दर्जाच्या रस्त्याचे रुंदीकरणाचे काम सध्या सार्वजनिक बांधकाम खात्याने हाती घेतले आहे. या रस्त्यावर रुंदीकरण तसेच नवीन साकव पूल अशी कामे सुरू आहेत. ही सर्व काँक्रीटीकरणाची कामे असल्याने ती कामे होत असताना पाण्याचा वापर मोठ्या प्रमाणावर होणे आवश्यक बाब असते. मात्र पाण्याचा वापरच केला जात नसल्याने काँक्रीटीकरण किती टिकावू होणार, याबाबत प्रश्नचिन्ह आहे. नेरळ-गुढवण-सुगवे राज्यमार्ग रस्त्यावर सध्या मोठ्या प्रमाणावर विकास कामे सुरू आहेत. या रस्त्यामध्ये असलेले साकव पूल नव्याने बांधले जात असून संरक्षक भिंतीदेखील बांधल्या जात आहेत. या रस्त्यावरील सुरू असलेल्या साकव पुलाच्या ठिकाणी काँक्रीटीकरण झाल्यानंतर पाणी मारण्यात येत नाही.

कर्जत तालुक्यात अनेक ठिकाणी रस्त्याची कामे सुरू करण्यात आली आहेत. मात्र त्यातील नेरळ पिंपळोली, आंत्रड, गुढवण, सुगवे या मार्गावडील आंत्रड ते पिंपळोली या दरम्यान असलेल्या पुलाचे काम सुरू आहे. पुलाची निर्मिती हा रस्त्याचा महत्त्वाचा भाग असतो आणि त्या-त्या ठिकाणी सिमेंट काँक्रीटचे काम केल्यानंतर पाण्याचा वापर केल्यास ते बांधकाम मजबूत होत असते. कोणत्याही ठिकाणी सिमेंटचे बांधकाम झाल्यावर पाण्याचा वापर होत नाही आणि त्यामुळे रस्त्यावर सुरू असलेली काँक्रिटची कामे नित्कृष्ट होत आहेत. स्थानिक ग्रामस्थांनी या कामाबद्दल आवाज उठविला असता रस्त्याचे करोडींचे कामे सुरू असताना कुठेही अधिकारी वर्ग येऊन पाहणी करीत नाही. त्यामुळे रस्त्यावरील कामांचा दर्जा सुमार असल्याचे स्पष्ट दिसत आहे.

एमएमआरडीएचे निधीमधून नेरळ-गुडवण-सुगवे राज्यमार्ग रस्त्यावरील कामे केली जात आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा कोणताही अधिकारी कामाची पाहणी करायला फिरकत नाही. त्यामुळे ठेकेदार कंपनी मनमानी करीत असल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे. अधिकारी वर्गाचे नंबर शोधून स्थानिक त्यांना या कामाबद्दल विचारणा करीत आहेत, मात्र त्यांचे फोन आल्यानंतर स्थानिकांच्या प्रश्नांना उत्तर देण्याचे औदार्य देखील प्राधिकरणाचे अधिकारी दाखवत नाहीत. त्यामुळे नित्कृष्टपणे काम करणाऱ्या ठेकेदारांच्या कामाची चौकशी व्हावी, अशी मागणी स्थानिक करू लागले आहेत.

## पिकअप उलटून तरुणाचा मृत्यू

**रत्नागिरी :** गुहागर तालुक्यातील आबलोली-तवसाळ मार्गावर चालक मेहेरतेज दिवाकर गुडेला हा बोलेरो पिकअप अतिवेगाने चालवत होता. अचानक त्याचे स्टेअरिंगवरील नियंत्रण सुटल्याने गाडी रस्त्याच्या डाव्या बाजूला पलटी झाली. यात एका तरुणाचा मृत्यू झाला असून तीन जण जखमी झाले. सुनील संतराम वर्मा (वय २५, रा. उत्तर प्रदेश) असे मृत तरुणाचे नाव असून रवींद्र यादव, तलत अहमद खान आणि उपेंद्र यादव हे जखमी झाले आहेत. चालक मेहेरतेज यालाही किरकोळ दुखापत झाली असून, त्याच्या विरोधात गुहागर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## अंधश्रद्धेच्या जाळ्यातून मुक्त व्हा

### विविध शाळांमध्ये चमत्कारामागील विज्ञान कार्यक्रमाद्वारे प्रबोधन



**। पाली /बेणसे । प्रतिनिधी ।**

राष्ट्रीय विज्ञान दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, रायगड शाखेच्या वतीने जिल्ह्यातील विविध शाळांमध्ये चमत्कारामागील विज्ञान या विषयावर जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. प्रयोगांतून मांडलेले वास्तव आणि प्रभावी व्याख्यानांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोनाची कास धरण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

पाली येथील ग.बा. वडेर हायस्कूलमध्ये रायगड जिल्हा प्रधान सचिव अमित निंबाळकर यांनी 'चमत्कारामागील विज्ञान' या विषयावर सविस्तर व्याख्यान दिले. भोंदूगिरी कशी चालते आणि त्यामागे कोणते वैज्ञानिक नियम असतात, हे त्यांनी सहप्रयोग सोप्या भाषेत विद्यार्थ्यांना समजावून सांगितले.

दुसरीकडे, सार्वजनिक विद्यालय पेण येथील विज्ञान प्रदर्शनात पेण शाखा प्रधान सचिव जगदीश डंगर यांनी चक्क मांत्रिकाची वेशभूषा करून चमत्कारांचे सादरीकरण केले. हातचलाखी आणि विज्ञानाचा वापर करून भोंदू बाबा लोकांना कसे फसवतात, याचे जिवंत दर्शन त्यांनी विद्यार्थ्यांना घडवले.

यावेळी रायगड जिल्हा कार्याध्यक्ष संदेश गायकवाड यांनी 'चला वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवूया' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. ते म्हणाले की, ''जगात भूत, आत्मा किंवा जादूटोणा नावाचा कोणताही प्रकार अस्तित्वात नाही. जर जादूटोणा सत्य असता, तर देशाच्या सीमेवर सैन्य भरती करण्याची गरजच उरली नसती; मांत्रिकच सैन्य म्हणून काम करू शकले असते,'' असे त्यांनी सांगितले.

> **विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकी ज्ञान न घेता, प्रत्येक गोष्टीमागील कार्यकारणभाव शोधून वैज्ञानिक दृष्टिकोन अंगीकारला पाहिजे, तरच खऱ्या अर्थाने अंधश्रद्धा निर्मूलन होईल.**
>
> **– संदेश गायकवाड, कार्याध्यक्ष, महाराष्ट्र अंनिस, रायगड शाखा**

## शिवजयंतीनिमित्त मिरवणूकीचे आयोजन

**। नागोठणे । प्रतिनिधी ।**

अखंड हिंदुस्थानचे आराध्य दैवत, श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त नागोठणे शहरात शिवसेना शाखा नागोठणे यांच्या वतीने भव्य मिरवणूक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा जयंती सोहळा शुक्रवार दि.६ मार्च रोजी सोहळा मोठ्या उत्साहात व धूमधडाक्यात साजरा करण्यात येणार असल्याची माहिती शिवजयंती उत्सव समितीचे अध्यक्ष इमरान पानसरे यांनी दिली. जयंती सोहळ्यानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ९ वाजता किल्ले रायगड येथून नागोठण्याकडे शिवज्योतीचे आगमन छत्रपती शिवाजी महाराज चौकात होईल. सकाळी १० वाजता शिवप्रतिमेचे पूजन व महाशिवआरती होणार आहे. दुपारी ४ वाजता छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त नागोठणे शहरातून भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. रात्री ७.३० वाजता मिरवणुकीची सांगता व आभार प्रदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून ठाकरे शिवसेनेचे रायगड जिल्हा संपर्क प्रमुख प्रसाददादा भोईर तसेच जिल्हा परिषद सदस्य सुमितदादा काते प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. नागोठणे शहरात या जयंती सोहळ्याबाबत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## सार्वजनिक,खासगी सहभागातून डेपो विकसित होणार

### • परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची माहिती

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

राज्यातील २७१ परिवहन डेपो सार्वजनिक-खासगी सहभाग तत्त्वावर विकसित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या अंतर्गत चांगल्या उत्पन्नक्षम डेपोसोबत दोन ग्रामीण किंवा तालुका स्तरावरील डेपो अशा तीन डेपोचे एक पॅकेज तयार करण्यात येणार आहे. त्यामुळे शहरी आणि ग्रामीण भागाचा समतोल विकास साधण्यावर भर देण्यात येणार असल्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले.

याबाबत सदस्य विक्रम काळे यांनी प्रश्न उपस्थित केला. तर सदस्य सदाभाऊ खोत, भाई जगताप यांनी उपप्रश्न उपस्थित केला. यावेळी सरनाईक म्हणाले की, राज्यातील बसस्थानकांवरील स्वच्छतागृहे विनामूल्य व स्वच्छ ठेवण्यासाठी स्वतंत्र कंत्राटदार नेमण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. दोन महिन्यांत या योजनेची अंमलबजावणी होणार असून प्रवाशांकडून कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही.

## ॲड.सचिन चाळकेंची सामाजिक बांधिलकी

### • आदिवासीवाडीतील विद्यार्थ्यांना वृक्ष, खाऊचे वाटप

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

खालापूर बार असोसिएशनचे माजी अध्यक्ष ॲड.सचिन चाळके यांचा वाढदिवस रविवारी (दि.१) सामाजिक उपक्रमानी साजरा करण्यात आला. यामध्ये नढाळ आदिवासीवाडी येथील राजिप शाळेतील विद्यार्थ्यांना खाऊ, पेरूच्या वृक्षाचे वाटप केले. तसेच आदिवासी भजन मंडळास मृदुंग व टाळ असे भजन साहित्याचे वाटप केले. ॲड.सचिन चाळके यांच्या सामाजिक बांधिलकीचे कौतुक केले जात आहे.

यावेळी खालापूर पंचायत समितीचे नवनिर्वाचित सदस्य कृष्णा पारंगे, लोधीवली ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच तथा विदयमान सदस्य समीर दळवी, सदस्या भारती चाळके, माजी ग्रामपंचायत सदस्य प्रभाकर सावंत, सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र मोरे, सुहास शिंदे, कृष्णकांत चाळके, सुदाम वाघमारे, शिक्षिका भाग्यश्री अमित पिडगुळे तसेच आदिवासी ग्रामस्थ व विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमात पंचायत समिती सदस्य कृष्णा पारंगे यांनी अँड.सचिन चाळके यांच्या सामाजिक कार्याचे कौतुक करून विद्यार्थ्यांना वृक्ष लागवडीचे महत्व पटवून दिले. तर समीर दळवी यांनी आपले विचारात या शाळेमधुन आदर्श विद्यार्थी घडावे, अशी अपेक्षा शिक्षकांकडे व्यक्त केली. तसेच अँड.सचिन चाळके यांनी आपले विचार मांडताना म्हणाले की, आपण या समाजाचा घटक आहोत या समाजाप्रती आपण काही देणे लागतो या विचाराने विद्यार्थ्यांना वृक्ष व खाऊचे वाटप केले. तसेच आदिवासी भजनी मंडळास मृदुंग व टाळ यांचे वाटप केल्याचे म्हटले.

## महाआराध्य प्रतिष्ठानतर्फे उमरोली शाळेची रंगरंगोटी



**। माणगाव । प्रतिनिधी ।**

सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात रायगड जिल्ह्यात नावलौकिक कमाविलेल्या महाआराध्य प्रतिष्ठानतर्फे माणगाव तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद शाळा उमरोली-खरवली या शाळेची दहा हजार रुपये खर्च करून रंगरंगोटी करण्यात आली. त्यानिमित्ताने उमरोली शाळेत शनिवार दि.२८ फेब्रुवारी रोजी कृतज्ञता सोहळा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात आपले मनोगत व्यक्त करताना महाआराध्य प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष प्रसाद धारिया यांनी आजचे विद्यार्थी हे उद्याच्या भारताचे भावी नागरिक असल्याचे सांगितले.

महाआराध्य प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष प्रसाद धारिया, संचालिका अंकिता धारिया हे आपण समाजाचे काहीतरी देणेकरी लागतो, या उदात्त हेतूने आपल्या प्रतिष्ठानमार्फत विविध सामाजिक, शैक्षणीक उपक्रम सातत्याने राबवित असतात. राजिप उमरोली शाळेची रंगरंगोटी करण्याबाबत महाआराध्य प्रतिष्ठानला शिक्षकांकडून निवेदन देण्यात आले होते. या निवेदनाची दखल प्रतिष्ठानने घेऊन उमरोली शाळेची चांगल्याप्रकारे रंगरंगोटी केली. याचे उत्तरदायित्व म्हणून शाळेतर्फे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमात महाआराध्य प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष प्रसाद धारिया यांचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमास प्रतिष्ठित व्यापारी विक्रांत गांधी, चारिझेन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष कॅप्टन निर्मलसिंग रंधावा, किशोर झेमसे, शाळा व्यवस्थापन कमिटी, मुख्याध्यापक नीता काळोखे, शिक्षक प्रदीप आडीत, पालकवर्ग, विद्यार्थी, ग्रामस्थ बंध-भगिनी आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## प्रकाश म्हात्रे यांचे निधन

**उरण :** उरण केगाव येथील शेतकरी कामगार पक्षाचे पंचायत समिती सदस्य महेश म्हात्रे यांचे थोरले बंधू प्रकाश महादेव म्हात्रे यांचे शुक्रवार दि.२७ फेब्रुवारी रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या मनमिळाऊ स्वभावामुळे केगाव परिसरात परिचित होते. त्यांच्या अंत्ययात्रेस केगाव उरण परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने हजर होते. त्यांचे दहावे श्रीक्षेत्र माणकेश्वर येथे रविवार दि.८ मार्च रोजी होणार आहे, तर दिवसकार्य मंगळवार दि.१० मार्च रोजी केगाव येथे होणार असल्याची माहिती त्यांच्या कुटुंबीयांनी दिली.

**उत्पादनांना मॉलमध्ये जागा देण्याचा प्रयत्न** | **वन मंत्री गणेश नाईक यांची माहिती**

# आदिवासी बांधवांना बांबू निर्मितीसाठी प्रोत्साहन

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

प्लास्टिकच्या वाढत्या वापरामुळे पर्यावरणाचा समतोल बिघडत आहे. याला प्रभावी पर्याय म्हणून बांबू लागवडीला प्रोत्साहन देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. बांबू उत्पादन, प्रक्रिया आणि बाजारपेठ निर्मितीद्वारे ग्रामीण व आदिवासी भागात रोजगारनिर्मिती करण्यावर सरकारचा भर आहे. तसेच शेतकरी व आदिवासी बांधवांना बांबू निर्मितीसाठी प्रोत्साहन देणे व त्यांच्या उत्पादनांना मॉलमध्ये विक्रीसाठी जागा उपलब्ध करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे, अशी माहिती वन मंत्री गणेश नाईक यांनी दिली.



विधानसभेत प्लास्टिकमुळे पर्यावरणावर होणारा परिणाम कमी करणे व बांबू व्यवसायाला चालना देण्यासंदर्भात लक्षवेधी सूचना सदस्य चेतन तुपे, राजकुमार बडोले यांनी मांडली होती. त्यावर उत्तर देताना नाईक बोलत होते.

ते म्हणाले की, राज्यातील शेतकऱ्यांना व आदिवासी बांधवांना बांबू लागवडीसाठी जनजागृती करण्यात येईल. शेतकऱ्यांना मोफत बांबू रोपे देण्यासह तीन वर्षांपर्यंत आर्थिक सहाय्य देण्यात येत आहे. रोजगार हमी योजनेअंतर्गत प्रति हेक्टर ७ लाख रुपये मदत दिली जाणार असून एक हेक्टरसाठी ५०० रोपे व गॅप फिलिंगसाठी १०० रोपे दिली जातात. टिश्यू कल्चरची दर्जेदार रोपे उपलब्ध करून देण्यावर भर आहे.

### संयुक्त वन व्यवस्थापनाला बळ

**राज्यात सुमारे १२ हजार गावांमध्ये संयुक्त वन व्यवस्थापन योजना कार्यान्वित असून वनउपज विक्रीतून मिळणाऱ्या रकमेपैकी ५० टक्के हिस्सा गाव विकासासाठी वापरला जातो. ग्रामपंचायत, वन विभाग आणि स्वयंसेवी संस्थांच्या समन्वयातून बांबू लागवड वाढविण्याचा विचार आहे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.**

### पारंपरिक कलेला बाजारपेठ मिळवून देणार

**वनपट्ट्यांवरील ओसाड जमिनीवर बांबू लागवड करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. बुरूड समाजाला दर्जेदार रोपे देण्याबाबत शासन दक्ष राहील, तसेच कच्चा माल उपलब्ध न झाल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाईल, असे स्पष्ट करण्यात आले. बुरुड समाजातील तरुणांना तंत्रज्ञान व प्रशिक्षण देऊन त्यांच्या पारंपरिक कलेला बाजारपेठ मिळवून देणार असल्याचे सांगितले.**

बांबू बोर्ड आणि औद्योगिक विकास महामंडळामार्फत बांबू आधारित उद्योगांना चालना दिली जात आहे. एका युनिटसाठी सुमारे १० लाख रुपयांपर्यंत कर्जसहाय्य उपलब्ध आहे. खेळणी, फर्निचर, पत्रावळी, द्रोण यांसारख्या वस्तूंचे उत्पादन वाढविण्यासाठी प्रशिक्षण केंद्रे सुरू करण्यात येत आहेत. मॉल्समध्ये विक्रीसाठी जागा उपलब्ध करून देण्याचाही विचार असल्याचे नाईक यांनी सांगितले.

# निवडक

## राष्ट्रीय लाईनमन दिवस साजरा



**कल्याण :** महावितरण कंपनीच्या कल्याण परिमंडळात राष्ट्रीय लाईनमन दिन साजरा करण्यात आला. परिमंडळ कार्यालयात उपस्थित लाईनमन (जनमित्र) यांना मुख्य अभियंता चंद्रमणी मिश्रा यांनी संबोधित केले. ते म्हणाले, जनमित्र हा महावितरण कंपनीचा ग्राहक आणि अधिकारी यांच्यातील संपर्क साधणारा दुवा आहे. एका अर्थाने आपण महावितरणच्या व्यवस्थेतील मुख्य कणा आहे, असे उद्गार संबोधित करताना मुख्य अभियंता चंद्रमणी मिश्रा यांनी जनमित्रांचे कौतुक केले. यावेळी उपस्थित सर्व जनमित्रांना सुरक्षा उपकरणे वापरण्याचे आवाहन करण्यात आले. यानंतर काढण्यात आलेल्या बाईक रॅलीला मुख्य अभियंता चंद्रमणी मिश्रा यांनी हिरवा झेंडा दाखवला. ही रॅली संतोषी माता रोड, प्रेम ऑटो चौक, खडकपाडा सर्कल, साई चौक, वाणी विद्यालय, संदीप हॉटेल, बिर्ला कॉलेज, पौर्णिमा चौक मार्गे परिमंडळ कार्यालयात परत आली. तसेच कल्याण मंडळ १ व कल्याण मंडळ २ चा लाईनमन दिवस साजरा करण्यात आला. याप्रसंगी सुरक्षित कामाबाबत चित्रफीत दाखविण्यात आली व सुरक्षा शपथ घेण्यात आली. जनमित्रांसाठी पी. अशोक यांनी हसरी मैफिल हा हास्य विनोदी कार्यक्रम सादर करण्यात आला. यावेळी उपस्थित जनमित्रांनी आपले मनोगत व्यक्त केले.

## हेदवली येथील मंदिराचा कलशारोहण



**सुकेळी :** रोहा तालुक्यातील नागोठणेजवळच असलेल्या श्री क्षेत्र हेदवली या ठिकाणी गावदेवी मंदिराचा प्राणप्रतिष्ठा व कलशारोहण सोहोळा शनिवार दि.७ मार्च ते रविवार दि.८ मार्च २०२६ रोजी अशा दोन दिवसांमध्ये साजरा करण्यात येणार आहे. या सोहोळ्याची सुरुवात सकाळी ९ ते २ या वेळेत संपूर्ण हेदवली गावामध्ये पालखी मिरवणूक सोहळा पार पडेल. त्यानंतर सायंकाळी स्थळशुद्धीकरण, गणेशपूजन, पुण्याहवाचन, मातृकापूजन, नांदीस्मरण, जलाधिवास, धान्याधिवास, शय्याअधिवास असे कार्यक्रम पार पडणार आहेत. तसेच रविवार दि.८ रोजी पहाटे ४ वा. विष्णू सहस्त्र नामावली होईल. त्यानंतर सकाळी ७.३० वा. स्थळशुद्धीकरण, संकल्प, गणेशपूजन, पुष्प वाचन, प्रसादवास्तुशांत, वास्तुहवन, स्थाप्यदेवता हवन झाल्यानंतर दुपारी १२.३५ वा. श्री मूर्तीप्रतिष्ठापना, कळशारोहण, नैवेद्य तसेच आरती होईल. त्यानंतर उपस्थित भाविकांना महाप्रसाद देण्यात येईल. सायंकाळी ७ वा. सांप्रदायिक हरिपाठ ऐनघर पंचक्रोशी, सांप्रदायिक हरिपाठ किल्ला पंचक्रोशी, वारकरी संप्रदाय मेढा पंचक्रोशी यांचा हरिपाठ होईल. त्यानंतर रात्री ९.३० वा. श्री निवृत्तीनाथ संस्थान त्र्यंबकेश्वर येथिल सुप्रसिद्ध किर्तनकार हभप कांचनताई जगताप (सौजन्य -महिला मंडळ हेदवली) यांच्यातर्फे किर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे.

## स्नेहसंमेलनात चिमुकल्यांचा जल्लोष



**माणगाव :** रायगड जिल्हा परिषद शाळा, कोल्हाण येथे नुकतेच वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात आणि दिमाखदार वातावरणात पार पडले. शाळा व्यवस्थापन समिती आणि माजी विद्यार्थी संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या या सोहळ्याने उपस्थित ग्रामस्थ, महिला मंडळ आणि पालकांची मने जिंकली. कार्यक्रमाचे उद्घाटन राजेंद्र वाढवळ यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून व श्रीफळ वाढवून करण्यात आले. यानंतर शाळेतील बालकलाकारांनी एकापेक्षा एक सरस आणि वैविध्यपूर्ण सांस्कृतिक कार्यक्रम सादर करत उपस्थितांना अक्षरशः मंत्रमुग्ध केले. चिमुकल्यांच्या या कलाविष्काराचे कौतुक म्हणून सहभागी सर्व विद्यार्थ्यांना आकर्षक ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले. या सन्मानामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद पाहायला मिळाला. या संपूर्ण कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन विनायक वाढवळ, विश्वास सुतार आणि शाळेचे मुख्याध्यापक अशोक आव्हाड यांनी आपल्या ओघवत्या शैलीत केले. या स्नेहसंमेलनामुळे शाळा आणि समाज यांच्यातील भागीदारी वाढविण्यासाठी मोठी मदत झाली आहे, अशी कृतज्ञतापूर्वक भावना उपस्थित पालक वर्गातून व्यक्त करण्यात आली.

## विधवा महिलांना मायेची साडी

**पाली :** सुधागड तालुक्यातील साईनाथ क्रीडा मंडळ चेरफळवाडी या मंडळाकडून होळी सणाचे औचित्य साधून गावातील विधवा महिलांना मायेची भेट म्हणून साडीचे वाटप करण्यात आले. मंडळातील सर्व सदस्य विचार करून गावाची एकी टिकून राहण्यासाठी वेगवेगळे उपक्रम राबवण्याचे काम करीत आहे. वृक्षारोपण, विद्यार्थ्यांना प्रोत्साहन, खेळाडूंना प्रोत्साहन, गावातील अडीअडचणीत सापडलेल्या लोकांना मदत, साप चावलेल्या लोकांना दवाखान्यात नेणे, असे अनेक उपक्रम हे मंडळ राबवत असते. मंडळाचे अध्यक्ष वसंत शिद व इतर सर्व सदस्य हे सामाजिक काम करीत आहेत. विशेष म्हणजे या मंडळात शिक्षक, पोलीस, फार्म हाऊसवर काम करणारे, मोलमजुरी करणारे सदस्य आहे. गाव-वाडीतील गोरगरिबांसाठी सामाजिक उपक्रम राबविणाऱ्या या मंडळाचे तालुक्यात कौतुक होत आहे.

## ज्येष्ठ नागरीकांची फसवणूक

### दोन अनोळखी इसमांविरोधात गुन्हा दाखल

**गडब :** पेण तालुक्यातील गडब येथे प्रसाद देण्याच्या बहाण्याने दोन अनोळखी इसमांनी ज्येष्ठ नागरीकांची फसवणूक केल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी वडखळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपींचा शोध सुरू आहे. ही घटना ४ मार्च रोजी सकाळी सुमारे ११.२५ वाजता गडब गावाजवळ जांभेला गावाच्या वेशीजवळील रस्त्याच्या कडेला घडली. मिळालेल्या माहितीनुसार, गडब येथील गजानन बाळाराम पाटील (६६) हे रस्त्याच्या कडेला लाकडी बाकावर बसले असताना दोन अनोळखी इसम त्यांच्याकडे आले. त्यांनी पिशवीत बिस्किटांचे पुडे असल्याचे सांगत त्यामध्ये प्रसाद असल्याचे सांगितले. तसेच प्रसाद गावात वाटण्यासाठी चार हजार रुपये दिले व पिशवीत ठेवण्यास सांगितले. तसेच प्रसादासाठी सोन्याच्या अंगठ्या काढून पिशवीत ठेवण्यास सांगून बोलण्यात गुंतवून ठेवत त्यांनी फिर्यादींच्या दोन सोन्याच्या अंगठ्या घेऊन पसार झाले. या अंगठ्यांची एकूण किंमत सुमारे १ लाख ५० हजार रुपये असल्याचे सांगितले जात आहे. या प्रकरणी वडखळ पोलीस ठाण्यात दोन अज्ञातांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## निवडक



### पनवेलमध्ये भाविकांची गर्दी

**पनवेल :** संत तुकाराम बीजनिमित्त पनवेल येथील जुन्या भाजी मार्केटमधील संत तुकाराम स्मारक येथे गुरुवारी (दि.५) रोजी भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून दर्शन घेतले. पहाटेपासूनच भक्तांनी स्मारक परिसरात गर्दी केली होती. यावेळी हरिनामाचा गजर, भजन, कीर्तन करण्यात आले. परिसर भक्तिमय वातावरणाने दुमदुमून गेला होता. स्थानिकांच्या सांगण्यानुसार, पनवेलच्या जुन्या भाजी मार्केटमधील या झाडाखाली संत तुकाराम महाराज मिरचीचा व्यवसाय करत असताना पांडुरंगाच्या नामस्मरणात आणि ध्यानात रममाण होत असत, अशी श्रद्धा आहे. त्यामुळे या ठिकाणाला ऐतिहासिक व धार्मिक महत्त्व प्राप्त झाले आहे. संत तुकाराम बीज निमित्त येथे दरवर्षी भाविक मोठ्या श्रद्धेने दर्शनासाठी येतात आणि हरिनामाच्या गजरात संत तुकाराम महाराजांना अभिवादन करतात.

### दिनानाथ ठाकूर यांना पुरस्कार

**उरण :** उरण येथील आनंदनगर विकास संघटना व लक्ष्मी महिला मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने होळी उत्सवाच्या निमित्ताने प्रतिष्ठेचा



दिला जाणारा 'आनंद नगर भूषण' पुरस्कार भारत पेट्रोलियमचे कामगार नेते दिनानाथ ठाकूर यांना देण्यात आला. हा पुरस्कार ज्येष्ठ पत्रकार व आनंदनगर विकास संघटनेचे सेक्रेटरी शेखर पाटील यांच्या हस्ते देण्यात आला. ठाकूर यांना ट्रॉफी शाल व श्रीफळ देऊन गौरवण्यात आले. यावेळी प्रमुखातिथी म्हणून माजी नगरसेविका लता पाटील रवींद्र म्हात्रे आदी मान्यवर हजर होते. ठाकूर यांनी भारत पेट्रोलियममध्ये कामगारांचे प्रश्न सोडवले तसेच आनंद नगरमध्ये राहत असताना विविध सामाजिक समस्या व एकोपा ठेवण्याचे काम केले. याप्रसंगी लक्ष्मी महिला मंडळाचे अध्यक्ष दीपिका ठाकूर, कृष्णा म्हात्रे, सुनील नाईक, चंद्रविलास ठाकूर, नारायण ठाकूर आदी मान्यवर व आनंद रहिवासी मोठ्या संख्येने हजर होते.



### उसाच्या रसाला मागणी वाढली

**पनवेल :** मार्च महिन्याची उष्णता सुरू होताच शहरात उकाडा जाणवू लागला असून नागरिक उन्हापासून बचाव करण्यासाठी विविध उपाय करताना दिसत आहेत. दुपारच्या वेळेत तापमान वाढत असल्याने रस्त्यांवरील उसाच्या रसाच्या गाड्यांवर नागरिकांची गर्दी वाढली आहे. थंडगार उसाचा रस पिण्यासाठी अनेक जण थांबत असल्याचे चित्र दिसत आहे. विशेषत: महिला वर्ग उन्हापासून बचावासाठी स्कार्फ बांधून बाहेर पडताना दिसत आहेत. काहीजण टोपी, गॉगल तसेच रुमालाचा वापर करत आहेत. उन्हाचा तडाखा वाढल्याने अनेक नागरिक झाडांच्या सावलीचा आधार घेत थोडा विसावा घेताना दिसत आहेत. दुपारच्या वेळेत रस्ते काहीसे ओस पडत असले तरी थंड पेये व उसाच्या रसाच्या ठेल्यांवर मात्र चांगली वर्दळ पाहायला मिळत आहे. मार्चच्या सुरुवातीलाच उष्णतेची चाहूल लागल्याने एप्रिल-मे महिन्यात उकाडा आणखी वाढण्याची शक्यता नागरिक व्यक्त करत आहेत.

### पनवेल बाजारात लिंबांची आवक वाढली

**पनवेल :** मार्च महिन्याच्या सुरुवातीलाच तापमानात वाढ झाल्याने लिंबूला मोठी मागणी निर्माण झाली असून दर झपाट्याने वाढले आहेत. पनवेल कृषी उत्पन्न घाऊक बाजार समितीमध्ये दररोज होणारी लिंबांची आवक घटली आहे. महाराष्ट्रातील श्रीगोंदा परिसरातून येणारा लिंबू यंदा कमी प्रमाणात उपलब्ध असल्याने व्यापाऱ्यांची



अडचण वाढली आहे. या तुटवड्याची भरपाई करण्यासाठी मद्रास (तामिळनाडू) येथून लिंबू मागवले जात आहेत. मात्र स्थानिक महाराष्ट्रातील लिंबाचे कव्हर पातळ व रसदार असते, तर मद्रास लिंबाचे कव्हर जाड असून त्यामधील रसाचे प्रमाण कमी असल्याचे व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे हॉटेल, सरबत विक्रेते व रसवंत्यांना जादा लिंबू वापरावे लागत आहेत. घाऊक बाजारात दर वाढल्याने किरकोळ बाजारातही लिंबू महाग झाले असून सर्वसामान्य ग्राहकांच्या खिशावर भार पडत आहे. उन्हाळ्यात मोठ्या प्रमाणावर खपणारे लिंबू सरबत, लिंबू पाणी, शरबत व थंड पेयांचे दर वाढण्याची शक्यता आहे.


## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची** आवश्यकता आहे. रिसेप्शनिस्ट, किचन हेल्पर लेडीज, कॉन्टिनेंटल कुक, ब्रेकफास्ट कुक,मेन्टेनन्स पर्सन, वेटर,हाऊसकीपर, हाऊसकिपिंग सुपरवायझर,रिसॉर्ट मॅनेजर (क्वालिटी कंट्रोल), इच्छुक उमेदवारांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसअॅप वर मेसेज करावा. मोबाईल - ७५५९१८४६१२
- **ब्लॉक विकणे आहे.** चेंढरे ग्रामपंचायत हद्दीतील ६६० स्क्वे फूट संपर्क : ९०२८५६५९१७, ९८२२०३१०१७
- **बांधकाम साहित्य विक्री दुकानात अकाऊंटस** टॅलीचा अनुभव असलेली मुलगी पाहिजे. किमान २/३ वर्षाचा अनुभव संपर्क- ८८०६६८३२३२, ८००७८९३२३२
- कर्जतमधील एका नामांकित सोसायटीतील २ bhk बंगला विकणे आहे. एजंट क्षमस्व संपर्क- ९६०४१२३५५४/+९८२२४९९३२१

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


# ताडगोळ्यांना पर्यटकांची खास पसंती

## चौल परिसरात विपुल उत्पादन



**| रेवदंडा | प्रतिनिधी |**

वाढत्या उन्हाळ्यामुळे जिल्ह्यात ठिकठिकाणी ताडगोळ्यांना मागणी वाढत आहेत. अलिबाग तालुक्यातील चौल आणि सासवणे परिसरात मोठ्या प्रमाणात झाले आहेत. सध्या चौलमधील मताडगोळेफ पर्यटकांची खास पसंती असून मोठी मागणी ऐन उन्हाळयात असते. चौल परिसरात ताडाची असंख्य झाडे असून ताडगोळे विक्रीतून मोठे उत्पत्र स्थानिक साधतात.

ऐन उन्हाळ्याचे दिवसात ताडगोळे थंडावा म्हणून पसंतीचे असते. त्यामुळेच मुंबई, पुणे, ठाणे आदी शहरातून तसेच परिसरातून आलेले पर्यटक तसेच स्थानिकवर्ग ताडगोळे खरेदी करत असल्याचे चित्र रेवदंडा-चौल बाजारपेठेत दिसते. चौलमध्ये नारळ पोफळीच्या बागेसह ताडाची झाडे सुध्दा विपुल असून त्याला येणाऱ्या नारळासारख्या फळांना ताडगोळे म्हणतात. या फळांतला गर पाणीदार व चवदार असून उंच उंच ताडाच्या झाडावर चढून काढण्याचा व फळांतील गर काढण्यास कस लागतो.

उन्हाळयात येत असलेल्या ताडगोळयांना बाजारात चांगली मागणी असते. उन्हाळयाचे दिवसात अंगाची लाही लाही होत असताना नैसर्गिक थंडावा देणारे ताडगोळे शरिरातील पाण्याचे प्रमाण टिकवून धरतात. अंगातील उष्णता कमी करणाऱ्या ताडगोळयांचे आयुर्वेदातही अनेक औषधी उपयोग सांगितले आहेत. ताडगोळे हे फळ ठराविक ऋतूमध्ये म्हणजे उन्हाळयात उपलब्ध असणारे फळ आहे. यांची चव काहीशी शाहळ्यांतील मलईसारखी लागत असून चवीला हे फळ फारच मधूर असते. इंग्रजी भाषेत आईस ॲपल म्हणून ओळखले जाणारे फळ आरोग्याच्या दृष्टीने अतिशय गुणकारी असल्याचे म्हटले जाते. या फळाच्या सेवनाने शरिराला आवश्यक असलेले क्षार व इतर पोषक तत्वे संतुलित मात्रेमध्ये मिळत असतात.

ज्यांना त्वचेवर उन्हाळयात सतत पुरळ येत असेल, तसेच ज्यांना या दिवसात चेहऱ्यावर मुरूमे येत असतील त्यांच्यासाठी या फळाचे सेवन उत्तम आहे. या फळामध्ये कर्करोगारी प्रतिरोधी तत्वे असून विशेषतः महिलांमध्ये आढळणाऱ्या स्तनाचा कर्करोग टाळण्यासाठी या फळाचे सेवन उत्तम मानले जाते. आरोग्यासाठी या फळाचे फायदे मिळविण्यासाठी उन्हाळयाच्या दिवसामध्ये या फळाचे भरपूर सेवन करावे, वाढत्या उकाडयात सध्या सारेच हैराण झाले असतात. घश्याला पडणाऱ्या कोरडवर उपाय म्हणून बाजारातील शितपेय किंवा बर्फाचे गोळयांवर ताव मारतात, परंतु कृत्रिक थंडाव्यापेक्षा ताडगोळयांसारखा नैसर्गिक उपाय केव्हाही आरोग्यासाठी चांगलाच परिणामकारक ठरतो. ज्याना वजन घटवायचे असेल त्याच्यासाठी या फळाचे सेवन उत्तम आहे. या फळाच्या गरामुळे तसेच फळातील रसामुळे भुक शमविण्यास मदत होते. त्यामुळे वारंवार खाण्याची इच्छा होत नाही. ज्याना लिव्हरच्या संबंधीत काही विकार असतील त्याचेसाठी ताडगोळयांचे सेवन उपयुक्त आहे. या फळामध्ये पोटॅशियम मुबक मात्रेमध्ये असून लिव्हरमध्ये साठलेले घातक, विषारी पदार्थ बाहेर पडण्यास मदत होते. या फळाच्या सेवनाने शरिराला श्रम करण्याची आवश्यक ताकद व उर्जा मिळते. या फळाच्या सेवनाने शरिरातील ग्लुकोजची पातळी वाढत असल्याने दिवसभरासाठी लागण-ताकद या फळाच्या सेवनातून मिळत असते.

अशा या गुणकारी ताडगोळे फळांची फार मोठी मागणी उन्हाळयात पर्यटक व स्थानिक वर्ग करत असतो. चौल परिसरात आर्थिक उत्पन्न देणारे ताडवृक्ष असंख्य संख्येने असून या ताडाच्या वृक्षाच्या लागवड करणे दिवसेंदिवस गरजेचे आहे.

### आरोग्यास लाभदायी

कृत्रिक थंडाव्यापेक्षा ताडगोळ्यांसारखा नैसर्गिक उपाय केव्हाही आरोग्यासाठी चांगलाच परिणामकारक ठरतो. ज्यांना वजन घटवायचे असेल त्यांच्यासाठी या फळाचे सेवन उत्तम आहे. या फळाच्या गरामुळे तसेच फळातील रसामुळे भूक शमविण्यास मदत होते. त्यामुळे वारंवार खाण्याची इच्छा होत नाही. ज्यांना लिव्हरच्या संबंधित काही विकार असतील त्यांचेसाठी ताडगोळ्यांचे सेवन उपयुक्त आहे.

## 'पैशाने तुटली नाती'चा नाट्यप्रयोग

**| चिरनेर | प्रतिनिधी |**

उरण तालुक्यातील चिर्ले येथील श्रीराम मंदिराच्या प्रांगणात धुलीवंदनाचे औचित्य साधून, येथील तरुणाईच्या पुढाकाराने अष्टगंध कलामंच निर्मित पैशाने तुटली नाती हा सामाजिक नाट्यप्रयोग मंगळवारी (दि.३) मार्च रोजी रात्री सादर करण्यात आला. नाट्यप्रयोगाला रसिक प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद लाभला. नाटकाचे लेखन हासूराम पाटील तर दिग्दर्शन धनेश्वर म्हात्रे यांचे आहे. जमिनीच्या पैशांमुळे कुटुंबातील माणसा-माणसांमध्ये अंतर पडू लागले आहे. भावा- बहिणींची रक्ताची नाती तुटत चालली आहेत. ही नाती कायम टिकून राहावी, यातून सामाजिक एकोपा टिकून राहावा ही लेखकाची तळमळ आहे. हे या नाटकाच्या सादरीकरणातून दिसून येत आहे.

नाट्य प्रयोगाचे उद्घाटन दत्तात्रेय म्हात्रे, बळीराम घरत, अशोक म्हात्रे, हासुराम पाटील, धनेश्वर म्हात्रे, जीवन डाकी, मनोहर, यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आले. तर प्रज्योत पाटील, जयकिसन मोकल अनमोल कोळी या पडद्यामागील कलाकारांनी विशेष मेहनत घेतली.

नाटकात हसुराम पाटील, सुमित कुंभार, अशोक म्हात्रे, कृष्णकांत म्हात्रे, वैशाली मोहिते, परीशा सरोदे, निकिता म्हात्रे, प्रफुल्ला चव्हाण, चेतन पाटील, रोशन घरत, दिगंबर कोळी, नवनीत माळी, अलंकार कडू, अनमोल कोळी आदी कलाकारांनी नाटकाची उंची वाढविली.

## मराठी साहित्य संमेलन

**| पनवेल | ग्रामीण, प्रतिनिधी।**

पनवेल येथे सलग चौथ्या वर्षी आयोजित करण्यात आलेले राज्यव्यापी एकदिवसीय मराठी साहित्य संमेलन येत्या १५ मार्च रोजी आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात पार पडणार आहे. कांतीलाल प्रतिष्ठान रायगड व विश्वव्यापी मराठी साहित्य सांस्कृतिक परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने या संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. संमेलनाच्या अध्यक्षपदी डॉ. दीपक पवार, उद्घाटक म्हणून डॉ. बी. जी. शेखर पाटील, तर स्वागताध्यक्ष म्हणून ज्येष्ठ संपादक कांतीलाल कडू काम पाहणार आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून गजलकार दिलीप पांढरपट्टे उपस्थित राहणार आहेत.

## नवी मुंबईत वाहन सुरक्षा अभियान



**| पनवेल ग्रामीण | प्रतिनिधी।**

वाहतुकीचे नियम केवळ कागदावर न राहता प्रत्यक्षात अंगीकारले जावेत, या उद्देशाने राबविण्यात आलेले 'वाहतूक पोलीस वाहन सुरक्षा अभियान २०२६' नवी मुंबईत उत्साहात पार पडले. या उपक्रमात नवी मुंबई पोलीसांना भावना ग्रुपची मोलाची साथ लाभली.

दरवर्षीप्रमाणे यंदाही शहरातील विविध भागात जाऊन नागरिकांना वाहतूक सुरक्षेबाबत मार्गदर्शन करण्यात आले. भावना ग्रुपचे राजेश शहा, अपर्णा शहा यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यालयातील कर्मचाऱ्यांना वाहतूक नियमांची सखोल माहिती देण्यात आली. त्यानंतर पोलिसांसोबत कर्मचाऱ्यांनीही जनजागृती मोहिमेत सक्रिय सहभाग घेतला.

नवी मुंबईतील विविध शाळा आणि कंपन्यांमध्ये जाऊन वाहतूक नियमांचे महत्त्व, हेल्मेट आणि सीटबेल्टचा वापर, वेगमर्यादा पाळणे तसेच सिग्नलचे काटेकोर पालन करण्याबाबत नागरिकांना जागरूक करण्यात आले. वाढत्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर नियमांचे पालन हीच सुरक्षिततेची गुरुकिल्ली असल्याचा संदेश देण्यात आला.

यावर्षी अभियानासाठी रोड सुरक्षा, हीच जीवन रक्षा हे प्रभावी ब्रीदवाक्य देण्यात आले. नागरिकांनीही या मोहिमेला सकारात्मक प्रतिसाद देत सुरक्षित वाहतुकीची सवय अंगीकारण्याचा संकल्प व्यक्त केला.

## पर्यावरण संवर्धनाची कार्यशाळा



**| तळा | प्रतिनिधी |**

तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे द.ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालयातील भूगोल विभाग आणि गो.म. वेदक सायन्स कॉलेजमधील झूलॉजी विभाग, तळा यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवसीय राज्यस्तरीय पर्यावरण संवर्धन कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक भूगोल विभाग प्रमुख डॉ. प्रा. राजाराम थोरात यांनी केले. या कार्यशाळेच्या प्रमुख पाहुण्या व संसाधन व्यक्ती डॉ. रश्मी जोशी यांचा परिचय प्रा. सोनम पवार यांनी करून दिला. तसेच कार्यक्रमाचे निवेदन आय क्यू ए सी समन्वयक डॉ. तृप्ती थोरात यांनी केले. डॉ. रश्मी जोशी यांनी आपल्या पर्यावरण संवर्धन कार्यशाळेच्या माध्यमातून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना जैवविविधता संवर्धन, शाश्वत विकास, पर्यावरण प्रदूषण, पर्यावरणीय समस्या व उपायोजना, विविध प्रकारचे देशी बियाणे व त्यांची लागवड, नैसर्गिक साधन संपत्तीचे जतन तसेच अपारंपारिक ऊर्जा साधनांचा वापर याविषयी महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. कार्यशाळेमध्ये ५१ विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला होता.

## गजानन चौलकर यांना पुरस्कार

**चिरनेर :** उरण तालुक्यातील चिरनेर येथील, कुंभार समाजातील सामाजिक कार्यात अग्रेसर असणारे ज्येष्ठ कार्यकर्ते, प्रसिद्ध मूर्तिकार, निवृत्त कलाशिक्षक व नाट्य कलाकार गजानन चौलकरांना नवी मुंबई कुंभार समाज मंडळाच्या वतीने, देण्यात येणारा यंदाचा जीवन गौरव पुरस्कार संजीवजी नाईक यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. त्यांच्यावर सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. संस्थेच्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमात त्यांना मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला.

## उरण तालुक्यात 'महाराजस्व समाधान शिबीर'

**| उरण | प्रतिनिधी |**

हिंदवी स्वराज्याचे प्रणिते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रेरणेने महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागामार्फत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान उरण तालुक्यात राबविण्यात येणार आहे. या शिबिरांमधून नागरिकांना महसूल विभागाच्या विविध सेवा थेट उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. जन्मापासून मृत्यूपर्यंत, तसेच शेतकरी, विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक, अपंग, अनाथ अशा सर्वच घटकांचा महसूल विभागाशी संबंध येत असतो. विविध नियम व प्रक्रियांमुळे नागरिकांची कामे अनेकदा प्रलंबित राहतात. ही बाब लक्षात घेऊन मंत्री बावनकुळे यांच्या संकल्पनेतून हे अभियान राबविण्यात येत आहे.

अभियानांतर्गत मंडळ स्तरावर शिबीरे घेऊन शासनाच्या विविध निर्णयांची माहिती पोहोचविणे, सातबारा, विविध दाखले व महसूल विभागाच्या इतर सुविधा नागरिकांना त्यांच्या गावातच उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात येणार आहे. सदर अभियानांतर्गत मार्च ते मे या कालावधीत उरण तालुक्यात एकूण सहा शिबीरे आयोजित करण्यात येणार आहेत.

## महिलांसाठी आरोग्य शिबिराचे आयोजन

**| आगरदांडा | प्रतिनिधी |**

जागतिक महिला दिनानिमित्त लायन्स क्लब मुरूड जंजिरा कोकण उन्नती मित्र मंडळाचे वसंतराव नाईक कला व वाणिज्य महाविद्यालय बॅरिस्टर ए.आर. अंतुले संकुल मुरूड जंजिरा यांच्या संयुक्त विद्यमाने महिलांसाठी मोफत आरोग्य व नेत्र तपासणी शस्त्रक्रिया आणि औषध वाटप शिबिराचे आयोजन शनिवार (दि. ७) मार्च रोजी सकाळी ९ ते दुपारी १ वाजेपर्यंत वसंतराव नाईक महाविद्यालयातील सभागृहात आयोजित करण्यात आले आहे. यामध्ये ब्लड प्रेशर, शुगर, तज्ञ डॉक्टरांच्या सल्ल्याने हृदयाची ईसीजी तपासणी, फुफ्फुसांची तपासणी, नेत्र तपासणी मोफत औषधे वाटप होणार आहे. तसेच महात्मा ज्योतिराव फुले आयुष्यमान भारत योजना व तेरणा चॅरिटेबल ट्रस्ट मार्फत उपचार, शस्त्रक्रिया मोफत किंवा अल्प दरात होणार आहे. तरी येताना रुग्णांनी आपले जुने रिपोर्ट, औषधे, फोन नंबर, रेशनकार्ड, ओळखपत्र आणि नातेवाईकांना सोबत घेऊन या असे आवाहन स्पेशालिस्ट हॉस्पीटल आणि रिसर्च सेंटर, नेरुळ नवी मुंबई लायसन्स हेल्थ फाऊंडेशन अलिबाग व महाविद्यालय विकास समिती वसंतराव नाईक महाविद्यालय मुरुडच्या वतीने प्राचार्य डॉ. जनार्दन कांबळे व सनी सोगावकर यांनी केले आहे.

## आंबिवली आळीत रस्त्याचे उद्घाटन

**आंबिवली आळी :** नवीन वसाहत येथील रस्त्याचे उद्घाटन संदीप मुंढे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी केदार भोईर, प्रमोद रायकर, रुपेश जाधव, विजय शिंदे, प्रदीप माळी, शुक्लेश्वर दिघे, राजू राठोड, मोहन चव्हाण, अनिल चव्हाण, गणेश मोरे, पिंटू मोठे, सिताराम शाहू, सोमू राठोड, अयान शेख, शोकत अली शेख, इजाज खान, अनिता माळी, विजय चव्हाण, हेमंत चव्हाण आदीच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला. स्थानिक नागरिकांनी मुंढे यांचे कौतुक केले.

## वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात




**| तळा | प्रतिनिधी |**

तळा येथील श्री गोपिनाथ महादेव वेदक महाविद्यालयामध्ये शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न झाले. यावेळी जेसन कंपनीचे डायरेक्टर लक्षमण जाधव सिने अभिनेते देवेंद्र सरदार आणि अक्षय कटके, महाविद्यालयाचे डॉ. दिलीप जयस्वाल, पुरुषोत्तम मुळे यांच्या हस्ते श्रीफळ वाढविण्यात आले.

याप्रसंगी संजय गवळी, सांस्कृतिक विभाग प्रमुख अक्षय घाडगे, क्रीडा विभाग प्रमुख संजय जाधव आणि सर्व विभागप्रमुख, शिक्षक वृंद आणि शिक्षककेंतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येनं उपस्थित होते. वैभवी म्हात्रे, यश खंडारे, सांस्कृतिक विभाग विद्यार्थी प्रतिनिधी चेतन वाघ, क्रीडा विभाग विद्यार्थी प्रतिनिधी उल्केश शामा आणि विद्यार्थिनी प्रतिनिधी सलोनी म्हात्रे देखील मंचकावर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या आयोजनासाठी महाविद्यालयातील शिक्षकवृंद, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहकार्य केले. संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन अत्यंत शिस्तबद्ध आणि आकर्षक पद्धतीने करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या शेवटी सांस्कृतिक विभाग प्रमुख अक्षय घाडगे यांनी सर्वांचे आभार, तसेच सूत्र संचलन जितेश भगत यांनी केले. हे सर्व कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे सर्वे सर्वा डॉ नंदकूमार वेदक आणि उन्मेष वेदक यांचे मोलाचे सहकार्य व मार्गदर्शन लाभते.

श्रमदानातून साकारला जलसंधारणाचा आदर्श | प्राण्यांसाठी ठरणार उपयुक्त उपक्रम

# ग्रामस्थांच्या सहभागातून वनराईची उभारणी

**| श्रीवर्धन | प्रतिनिधी |**

श्रीवर्धन तालुक्यातील वडवली ग्रामपंचायतीत एक ऐतिहासिक क्षण अनुभवायला मिळाला. मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत गावातील शेकडो ग्रामस्थांनी स्वयंस्फूर्तीने श्रमदान करत भव्य वनराई बंधाऱ्याची उभारणी केली. ग्रामस्थांच्या एकजुटीचा आणि सामाजिक जबाबदारीचा हा अनोखा नमुना परिसरासाठी प्रेरणादायी ठरला आहे.

दरवर्षी उन्हाळ्यात तीव्र पाणीटंचाईचा सामना करणाऱ्या वडवली गावासाठी हा वनराई बंधारा मोठा दिलासा देणारा ठरणार आहे.



पावसाचे वाहून जाणारे पाणी अडवून ते जमिनीत मुरवणे, भूजल पातळी वाढवणे, विहिरींना पाणीपुरवठा सुधारणे आणि शेतीसाठी शाश्वत जलस्रोत निर्माण करणे हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे. तज्ज्ञांच्या मते, अशा प्रकारचे बंधारे ग्रामीण भागात कमी खर्चात प्रभावी जलव्यवस्थापनाचे उत्तम साधन ठरतात.

या श्रमदान मोहिमेत युवक, महिला बचत गट, शेतकरी, ज्येष्ठ नागरिक तसेच विविध सामाजिक संस्थांचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले. सकाळपासूनच ग्रामस्थांनी प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली. पोती भरणे, रचणे, पाण्याचा प्रवाह नियंत्रीत करणे अशा विविध कामांमध्ये सर्वांनी खांद्याला खांदा लावून सहभाग नोंदविला. गावात उत्साहाचे आणि एकात्मतेचे वातावरण निर्माण झाले होते.पंचायत समिती श्रीवर्धनचे विस्तार अधिकारी किशोर नागे यांनी उपस्थित राहून उपक्रमाचे मार्गदर्शन केले.

वनराई बंधारा हा केवळ पाणी अडवण्याचा उपाय नसून भविष्यातील पाणी सुरक्षेची हमी आहे. ग्रामस्थांनी दाखविलेली एकजूट इतर गावांसाठी आदर्श ठरेल, असे त्यांनी सांगितले.

### गावाच्या विकासाची साक्ष

ग्रामस्थांच्या सामूहिक प्रयत्नातून साकारलेला हा वनराई बंधारा केवळ जलसंधारणाचा प्रकल्प नसून गावाच्या विकासाची, एकतेची आणि स्वयंस्फूर्तीची जिवंत साक्ष ठरला आहे. वडवलीतून सुरू झालेली ही जलक्रांती परिसरातील इतर गावांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.

# वणव्यात माथेरान डोंगर होरपळला

## ● वनविभागाचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष? ● स्थानिकांचे प्रयत्न कुचकामी

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

माथेरान डोंगर भागात धुळवड साजरी होत असताना सायंकाळच्या सुमारास त्या ठिकाणी वणवा लागण्याची घटना घडली होती. या वणव्याची माहिती वन विभागाला देऊन सुद्धा वन कर्मचारी त्या ठिकाणी पोहचले नाहीत. त्या वणव्याची व्याप्ती कमी करण्यासाठी स्थानिक आदिवासी लोकांनी प्रयत्न केले; मात्र, अपुऱ्या साधन सामुग्री मुळे वणवा विझविण्यात त्यांना यश आले नाही. परिणामी वणवा रात्रभर पेटत राहिला आणि माथेरान डोंगर होरपळून निघाला.



जिल्ह्यात मंगळवारी (दि.३) धुळवड सण साजरा होत असताना माथेरानच्या डोंगर रांगेत असलेल्या आदिवासी वाड्यांच्या वरच्या भागात वणवा लागला. संध्याकाळच्या वेळी लागलेल्या वणव्याची माहिती समाज माध्यमांवर पसरल्यानंतर वन विभागाच्या कर्मचाऱ्यांची शोधाशोध झाली. काहींनी वन अधिकारी, कर्मचारी यांना संपर्क देखील केला. मात्र, त्यांच्यापैकी कोणीही वणवा विझवण्यासाठी घटनास्थळी पोहचले नाही. हा वणवा विझविण्यासाठी स्थानिक पातळीवर बेकरे वाडी, आसल वाडी तसेच धनगर वाड्यांमधील आदिवासी लोकांनी झाडाच्या फांद्या तोडून आग विझवण्याचा प्रयत्न केला. मात्र, डोंगराळ भागात सुकलेले गवत अधिक प्रमाणात असल्याने आगीचे लोळ वाढत होते आणि त्यामुळे वणवा विझवण्यात त्यांना अपयश आले. तसेच, वन कर्मचारी यांच्याकडून जंगल भागात जाळपट्टे मारण्यात आले नव्हते. त्यामुळे हा वणवा वाढत गेला.

यादरम्यान, समाज माध्यमांवर वन अधिकारी, कर्मचारी यांची मदत होईल, असे मेसेज फिरत होते. मात्र, वन विभागाने कोणतेही सहकार्य केले नाही. तसेच, वन विभागाकडे असलेले आग विझवण्याचे मशीन देखील उपलब्ध झाले नाही. त्यामुळे माथेरान डोंगरावरील वणवा विझवता आली नाही, असा आरोप स्थानिकांनी केला आहे. त्यामुळे बेकरे वाडी भागात सुरुवातीला लागलेला वणव्याचा भडका पुढे आसल वाडीपासून चिंच वाडी, सागाची वाडी असा पुढे पुढे गेला.

# शिवणकाम व्यावसायिक प्रशिक्षण



**। रसायनी । प्रतिनिधी ।**

अल्काईल अमाइन्स केमिकल्स लिमिटेड पाताळगंगा यांच्या सौजन्याने सीएसआर निधीमार्फत शिवनगर येथील रहिवाशांसाठी १२ मीटर उंच सोलर लाईट पोल उपलब्ध करून देण्यात आला. याप्रसंगी मा. सरपंच संदीप मुंढे, सरपंच उमाताई मुंढे यांनी अल्काईल अमाइन्सचे सीएचआरओ उदय घाग, सिनियर मॅनेजर एचआर मॅथ्यू डी कुन्हा, पाताळगंगा युनिट एचआर अर्चना माने, सिनियर ऑफिसर, सीएसआर निकिता म्हात्रे, सीएसआर कन्सल्टंट रवी ओंकार, प्रोजेक्ट को ऑर्डिनेटर सचिन आंबरे यांच्या मिळालेल्या सहकार्याबद्दल आभार व्यक्त केले. या प्रोजेक्टसाठी मोहोपाडा ग्रामपंचायत यांचे विशेष सहकार्य लाभले.

तसेच, महिला सक्षमीकरण धोरणाद्वारे मोहोपाडा ग्रामपंचायत येथे शिवणकामाच्या व्यावसायिक प्रशिक्षण कार्यक्रम (राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळ प्रमाणपत्र) उपक्रमासाठी सहा अत्याधुनिक व्यासायिक डिजिटल शिलाई मशीन उपलब्ध करून देण्यात आली. शिवणकामाची माहिती असलेल्या ६० महिलांना हे प्रशिक्षण १६ मार्चपासून व्यावसायिक प्रशिक्षकांतर्फे देण्यात येणार आहे. हे प्रशिक्षण पूर्ण केलेल्या महिलाना राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळ प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहे. या प्रोजेक्टसाठी मोहोपाडा ग्रामपंचायत यांचे विशेष सहकार्य लाभले.

# छ. शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याचे भूमीपूजन

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

कोप्रोली येथे महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य अश्वारूढ पुतळा उभारण्याच्या कामाचा शुभारंभ गुरुवारी (दि.५) अत्यंत उत्साहात संपन्न झाला. स्थानिक गावकऱ्यांसह हजारो शिवप्रेमी या सोहळ्याला उपस्थित होते. सकाळी ११ वाजता पुरोहितांच्या मंत्रोच्चारात विधिवत पूजन आणि पारंपारिक वाद्यांच्या गजरात भूमीपूजन विधी पार पडला. यावेळी 'जय भवानी, जय शिवाजी' आणि 'छत्रपती शिवाजी महाराज की जय' अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. यावेळी पुतळ्याच्या जागेची विधिवत पूजा करून पायाभरणी करण्यात आली.

उभारण्यात येणारा हा पुतळा अत्यंत भव्य आणि आकर्षक असणार असून, तो शिवरायांच्या जाज्वल्य इतिहासाची साक्ष देणारा ठरेल. पुतळ्याचा चबूतरा आकर्षक दगडी कोरीव कामात असेल. पुतळ्याच्या सभोवताली सुशोभीकरण आणि शिवकालीन इतिहासाची माहिती देणारे फलक लावण्यात येणार आहेत. 'हा पुतळा केवळ एक स्मारक नसून येणाऱ्या पिढ्यांसाठी प्रेरणेचा स्रोत ठरेल', असे गौरउद्गार मान्यवरांनी काढले. याप्रसंगी माजी आमदार मनोहर भोईर, पंचायत समिती सदस्या कविता रूपेश पाटील, कोप्रोली, पंचायत समिती सदस्य दिपक भोईर, नवघर नवोदित उत्कर्ष मंडळाचे अध्यक्ष विश्वनाथ पाटील, शिवसेना शाखाप्रमुख तथा निवृत्त ग्रामविकास अधिकारी रवि म्हात्रे यांच्यासह अनेक शिवसैनिक, कार्यकर्ते व ग्रामस्थ आदी उपस्थित होते.

# गणेश दहिंबेकर यांचे निधन

**कोलाड :** रोहा तालुक्यातील गोवे गावातील रहिवाशी गणेश महादेव दहिंबेकर यांचे गुरुवार दि.२६ फेब्रुवारी रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ६० वर्षाचे होते. त्यांच्या मृत्यूची वार्ता समजताच त्यांच्या अंत्यविधीसाठी त्यांचे नातेवाईक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, क्षेत्रातील असंख्य नागरिक तसेच समस्त गोवे ग्रामस्थ उपस्थित होते. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, दोन मुली, दोन बहिणी, पुतणे, जावई, नातवंडे व मोठा दहिंबेकर परिवार आहे. त्यांचे दशक्रिया विधी व उत्तरकार्य विधी दोन्ही एकाच दिवशी शनिवार दि.७ मार्च रोजी त्यांच्या गोवे येथील त्यांच्या राहत्या निवासस्थानी होणार आहेत.

## जाहिर नोटीस

सर्व जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे वरसोली, ता. अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक संचित जयहिंद म्हात्रे यांचे मालकीचे अविभाज्य हिश्श्याचे क्षेत्र विकत घेण्याचे ठरविलेले आहे. सदरची मिळकतीतील त्यांचे अविभाज्य हिश्श्याचे क्षेत्र हे निर्वेध व बोजा विरहीत असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलास दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| वरसोली ता.अलिबाग जि. रायगड | १६३/१ | क्षेत्र ०.१६.०० पो.ख. ०.०२.०० एकूण ०.१८.०० | २.५० |

सदरहू मिळकतींतील विद्यमान मालकांचे असलेले अविभाज्य हिश्श्याचे क्षेत्र

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लिज, फरोक्त, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्यूपत्र, अखत्यारपत्र, भागिदारी, वहिवाट, पोटगी, करार-मदार, विसार पावती, वारसा हक्क, वहिवाटीचा जाण्या-येण्याचा मार्ग, आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे लेखी कळवावे. येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग.
दिनांक : ०५/०३/२०२६

**ॲड. विजय अनंत पेढवी**
श्रीकृपा, मु.नांदाईपाडा, पो.झिराड,
ता.अलिबाग, जि.रायगड.
मो.नं. ९८२२१८६७४०

## जाहिर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे - भाल, ता. अलिबाग, जिल्हा रायगड, येथील पुढील वर्णनाची मिळकत, मिळकतीचे विद्यमान मालक मिनल नितीन पाटील, रा. अलिबाग, यांचेकडुन आमचे आशिलांनी खरेदी घेणेचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन -:**

| गाव | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| मौजे भाल, ता. अलिबाग, जि. रायगड | ६/२ | ०-१०-६० पो.ख. ०-०१-१० एकुण ०-११-७० | २.७५ |

तरी वरील जमिन मिळकतीबद्दल कुणाचाही ताबा, बयाणापावती, साठेकरार, गहाण, बोजा अथवा लिज इतर कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत खाली सही करणार यांचेकडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी स्वरूपात दाखल कराव्यात, सदर मुदतीत हरकती न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहे, इतर कोणाचाही कायदेशीर हक्क व हितसंबंध नाहीत असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत, तक्रार माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची या नोटीसद्वारे नोंद घ्यावी.

अलिबाग
दि. ०६/०३/२०२६

सही /-
**ॲड. सौ.गौरी गिरीश म्हात्रे**
डी-२ हिराबाग मोदकम हॉटेलच्या वर
जिल्हा न्यायालयासमोर अलिबाग रायगड
मो नं.९२७१७७५२७७

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E–TENDER NOTICE**

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification. Tender fees Rs.500/- + GST**

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFxNo :- 7000038785** **Tender No.: EE/EHV(O&M)/DN/PNL/e-Tender-30/ 2025-2026.** RFx e-tender for Supply of 02 Nos. of 5kV Insulation Tester with accessories and Lead set HV 3x10M large clips at 220kV Ulwe GIS & 220kV Timber Market GIS under EHV O&M Division Panvel.... **2nd call.** **Tender amount Rs. 19,14,446/-, EMD amount Rs. 19,144/-** |
| 2 | Online Downloading the RFx . | **05.03.2026, 18:00 Hrs. to 15.03.2026, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 15.03.2026 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **16.03.2026 at 11:00 hrs. (if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The Dy. Executive Engineer, (O): Mobile No. 9769894505.
**Note :** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**SD/-**
**Executive Engineer**
**E.H.V.(O&M) Dn. Panvel**

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E–TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification. **Tender fees Rs.500/- + GST**

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFxNo :-7000038348** **Tender No.: EE/EHV(O&M)/DN/PNL/e-Tender-29/ 2025-2026.** RFx e-tender for supply of manpower with two wheeler for ground patrolling of underground cable route of 220kV Timbermart-Khandeshwar I & II line for finding of any digging/ excavation/ construction activity by various utilities and providing & fixing of mute marker at 50 meters on underground cable route of 220kV Timbermart Khandeshwar I & II line under EHV Lines S/Dn. Panvel -1 under EHV O&M Division Panvel.... **3rd call.** **Tender amount Rs. 11,41,126/-, EMD amount Rs. 11,411/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **06.03.2026, 18:00 Hrs. to 16.03.2026, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 16.03.2026 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **17.03.2026 at 11:00 hrs. (if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The Dy. Executive Engineer, (O): Mobile No. 9769894505.
**Note :** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**SD/-**
**Executive Engineer**
**E.H.V.(O&M) Dn. Panvel**

## जाहीर नोटीस

**मे.तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो.माणगाव यांचे न्यायालयात**

ज.नों प्रस्ताव क्र.६६/२०२६

१. शाझिया अब्दुल वकील काझी, — अर्जदार
रा.गोरेगाव, ता.माणगाव, जि.रायगड

विरुद्ध

१. निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी
गोरेगाव, ग्रामपंचायत गोरेगाव,
ता. माणगाव, जि. रायगड
२. गटविकास अधिकारी, पंचायत समिती, — सामनेवाले
माणगाव जि. रायगड

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये कळविण्यात येते की, निबंधक जन्म-मृत्यू-विवाह नोंदणी अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत गोरेगाव, ता. माणगाव यांचेकडील जन्म मृत्यू अधिनियम, १९६९ चे कलम १३ (३) व सुधारित अधिनियम, २०२३ अन्वये या कार्यालयाकडे विलंबाने जन्म नोंद होणेकामी प्रस्ताव जा.क्र. २३/२०२६, दि. ०७/०१/२०२६ दाखल झाला आहे. त्यान्वये त्यांनी शाझिया अब्दुल वकील काझी, रा. गोरेगाव, ता. माणगाव, जि. रायगड यांचा जन्म दि. १८/०६/१९८३ रोजी मौजे गोरेगाव, ता. माणगाव, जि. रायगड येथे झाला असल्याचे नमूद केले आहे.

शाझिया अब्दुल वकील काझी, रा. गोरेगाव, ता. माणगाव, जि. रायगड यांचा जन्म दि. १८/०६/१९८३ रोजी मौजे गोरेगाव, ता. माणगाव, जि. रायगड येथे झाला असून त्यांना जन्म प्रमाणपत्र आवश्यक होते. परंतु सदर नोंद ग्रुप ग्रामपंचायत गोरेगाव, ता. माणगाव, जि. रायगड यांचे अभिलेखामध्ये आढळून आलेली नाही. त्यामुळे निबंधक जन्म-मृत्यू- विवाह नोंदणी अधिकारी, ग्रुप ग्राम पंचायत गोरेगाव, ता. माणगाव यांनी त्यांच्या जन्माची विलंबाने नोंद होणेकामी आदेश मिळणेबाबत प्रस्ताव दाखल केला आहे.

तसेच शाझिया अब्दुल वकील काझी, रा. गोरेगाव, ता. माणगाव, जि. रायगड यांच्या जन्माची विलंबाने नोंद होणेकामी निबंधक जन्म-मृत्यू नोंदणी, ग्रामपंचायत गोरेगाव यांचेकडील प्रस्तावही या कार्यालयास प्राप्त झाला आहे. तरी सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे? हे तपासण्याकरिता सदरची जाहीर नोटीस अर्जदार यांचेमार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरिता पंधरा दिवसांचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहित मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास शाझिया अब्दुल वकील काझी, रा. गोरेगाव, ता. माणगाव, जि. रायगड यांचा जन्म दि. १८/०६/१९८३ रोजी मौजे गोरेगाव, ता. माणगाव, जि. रायगड येथे झाला असे गृहीत धरून त्यांच्या जन्माची नोंद होणेबाबत आदेश देण्यात येईल.

ठिकाण: माणगाव
दिनांक : ०४/०३/२०२६

सही/-
**(विपीन लोकरे)**
**कार्यकारी दंडाधिकारी,**
**माणगाव, जि. रायगड**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकतीचे विद्यमान मालक श्री. विलास पांडुरंग पाटील यांच्या कडुन कायम विकत घेण्याचे ठरविले आहे व तशी बोलणी केलेली आहेत. विकत घेणाऱ्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे :

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | ग.नं. | क्षेत्र हे. आर | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| तळाशेत ता.अलिबाग | १२४ | ०-९७-०० पो.ख. ०-१५-०० एकुण १-१२-०० | १.५३ |

**वरील तपशिलात नमुद केलेली मिळकत ही या जाहिर नोटीसीचा विषय आहे.**

वर वर्णन केलेली मिळकत ही निर्वेध व बोजारहीत असल्याचा दावा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांना केलेला आहे.

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचाही कसलाही ताबा, कुळवहिवाट, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोजा, बक्षिस, दान, जप्ती, लिज, वहिवाट अथवा अन्य प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ (सात) दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती कागदोपत्री पुराव्यासह सादर कराव्यात. अन्यथा मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे गृहित धरुन सदरचा व्यवहार आमचे अशिल पुर्ण करतील व मागाहून आलेली हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

कळावे.
अलिबाग.
दिनांक : ०५/०३/२०२६

सही/-
ॲडव्होकेट
**ॲड. प्राजक्ता धिरज म्हात्रे**
ऑफिस. ॲकॉन क्लासिक, फ्लॅट नं.१०६,
जिल्हा न्यायालय रायगड समोर
अलिबाग, रायगड ४०२२०१
मो. ८८०६६९३५१५

## जाहीर सुचना

सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, मोजे धोकवडे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खाली नमुद केलेल्या वर्णनाची बिनशेती जमिन मिळकत व त्याअंतर्गत असणाऱ्या घर मिळकती सौ. मनिषा मिलिंद कोरडे व श्री.मिलिंद अनंत कोरडे, राहणार वसंत विहार, ठाणे, यांच्या मालकीच्या असून, सदरील बिनशेती जमिन मिळकती व त्याअंतर्गत असणाऱ्या घर मिळकतीसह सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून माझे अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाची बोलणी सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान झाली आहेत. सदर बिनशेती जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतींमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिन, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. हे सर्वांस कळावे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (आर.चौ.मी.) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| धोकवडे, ता.अलिबाग. | १०३/२/१ | २०-००-०० एकूण | २००-०० |

सदर बिनशेती जमिन मिळकत व त्या अंतर्गत असणाऱ्या ग्रुप ग्रामपंचायत धोकवडे कडील मालमत्ता क्र.१२५२, क्षेत्र २३५२ चौ. फूट, मालमत्ता क्र.१२५३, क्षेत्र १५६ चौ.फूट, मालमत्ता क्र.१२५४, क्षेत्र ४९ चौ.फूट व मालमत्ता क्र.१२५५, क्षेत्र ३६ चौ.फूट ह्या घर मिळकतीसह.

अलिबाग,
दिनांक : ०५/०३/२०२६.

सही/
**(ॲड.निवास ना.पाटील)**
मोतीबाग, जिल्हा न्यायालयासमोर
ता.अलिबाग, जि.रायगड.
खरेदीदारांचे वकील

दिनांक : ०६/०३/२०२६

**नोटीस**

सर्व जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद मौजे चौल, ता. अलिबाग, जि. रायगड येथील मिळकत आमचे अशिल यांनी विद्यमान मालक शशिकांत शांताराम गोरेगावकर व इतर यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी, या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत, दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण इ. स्वरूपाचे हक्क व हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील व तद्नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे.

**मौजे चौल, ता. अलिबाग, जि. रायगड**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्रफळ (हे.आर.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| चौल ता.अलिबाग | १४५/२ | बागायत ०-३१-७१ पो.ख. ०-०३-२९ एकुण ०-३५-०० | १८.८८ |

वर नमुद जमिन मिळकतीपैकी क्षेत्र ०-१७-५० हे.आर., या बागायत मिळकतीबाबतचे.

दिनांक : ०६/०३/२०२६
अशिलांची सही

**ॲड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफिस पत्ता : फ्लॅट नं.१०३, पहिला मजला,
बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट
जे.एस.एम कॉलेज जवळ, अलिबाग-रायगड
मोबा. ९७६७०१०९०२

## जाहीर नोटीस

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, श्री. प्रसन्न यशवंत सुर्वे व आमचे अशिल श्री. मधुकर काशिनाथ मसुरकर रा. हनुमान मंदिराजवळ, सातिर्जे, कातळपाडा, पो. मापगाव, ता. अलिबाग, जि. रायगड यांचे सहमालकीची मौजे सातिर्जे, ता. अलिबाग, जि. रायगड येथे मिळकत असून तिचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मौजे सातिर्जे, ता. अलिबाग, जि. रायगड**

| गट नं. | क्षेत्र (हे. आर.) | आकार रु.पै |
|---|---|---|
| १४९ | ०-३१-२० | ५.०१ |

तरी वर नमूद मिळकतींपैकी उत्तरेकडील ११.२० गुंठे क्षेत्र हे आमचे अशिल श्री. मधुकर काशिनाथ मसुरकर यांचे मालकी व ताबेकब्जा वहिवाटीमध्ये असून दक्षिणेकडील २० गुंठे क्षेत्र हे श्री. प्रसन्न यशवंत सुर्वे यांचे मालकी व ताबेकब्जा वहिवाटीमध्ये आहे. सदरची मिळकत ही आमचे अशिलांनी दि. १०/११/२००९ रोजी दस्त क्र. ३२७१/२००९ कडे नोंदविलेल्या खरेदीखताने विकत घेतली होती व आहे. त्यानंतर आमचे अशिलांनी सदर मिळकतींपैकी दक्षिणेकडील २० गुंठे क्षेत्र हे दि. २९/०७/२०१० रोजीच्या दस्त क्र. २९८७/२०१० कडे नोंदविलेल्या बक्षिसपत्राने स्वतःचा पुतण्या श्री. मनोज जयवंत मसुरकर रा. सातिर्जे, पो. मापगाव, ता. अलिबाग याचे नावे केली. त्यानंतर श्री. मनोज जयवंत मसुरकर याने सदरचे २० गुंठे क्षेत्र दि. ०९/०३/२०२३ रोजीच्या दस्त क्र. ९४६/२०२३ कडे नोंदविलेल्या खरेदीखताने श्री. प्रसन्न यशवंत सुर्वे यांचे नावे केली.

आमचे अशिलांनी श्री. मनोज जयवंत मसुरकर यांचे लाभात बक्षिसपत्र करताना जो वहिवाटीचा रस्ता बक्षिसपत्राने मनोज याला दिला तो रस्ता सदर मिळकतीच्या म्हणजेच गट नं. १४९ च्या पश्चिमेकडून दिला होता व आहे. सदर बक्षिसपत्रामध्ये गट नं. १७०/१ मधून व पश्चिमेकडून श्री बहिरीदेवाच्या वहिवाटीच्या जागेमधून रस्ता दिला होता असे बक्षिसपत्रामध्ये स्पष्ट नमुद आहे.

अशी परिस्थिती असताना व बक्षिसपत्रातील व खरेदीखतातील तरतुदींचा चुकीचा अर्थ लावून आणि आमची फसवणूक करुन श्री. प्रसन्न यशवंत सुर्वे हे आता गट नं. १४९ मधील ११.२० गुंठे क्षेत्रामध्ये २.२९ मी. रुंद व ३५ मी. लांबी च्या मिळकतीचा वापर वहिवाटीचा मार्ग म्हणून करीत आहेत. यापूर्वीही श्री. मधुकर काशिनाथ मसुरकर यांनी वकीलामार्फत १४ मे २०२५ मध्ये नोटीस श्री. प्रसन्न यशवंत सुर्वे यांना दिली असता श्री प्रसन्न यशवंत सुर्वे यांनी त्या नोटीसीचे उत्तर दिले नाही. आमचे अशिल, श्री. मधुकर काशिनाथ मसुरकर यांनी गट नं. १४९ या मिळकतीची शासकीय मोजणी केलेली असून, श्री प्रसन्न यशवंत सुर्वे यांनी आमचे अशिल श्री. मधुकर काशिनाथ मसुरकर यांची कोणतीही परवानगी न घेता परस्पर आमचे अशिलांची ताबेकब्जा, मालकी व वहीवाटीतील ११.२० गुंठ्यांमधून पुर्वेकडून २.२९ मी. रुंद व ३५ मी. लांब रस्त्याचा त्रयस्थ इसमांना देवून बेकायदेशीर रस्त्याचा वापर करीत आहेत. गट नं. १४९ च्या पुर्वेकडून कधीही कोणताही रस्ता अथवा पायवाट नव्हती व नाही याची नोंद घ्यावी व सदर मिळकतीसंदर्भात इतर कोणीही कोणताही खरेदी विक्री, साठेखत, गहाण दान इत्यादी वगैरे हस्तांतरणाचा व्यवहार करु नये. तरी मौजे सातिर्जे गट नं. १४३/२ व गट नं. १४८/५ या मालकांवर सुध्दा बेकारदेशीर रस्त्याचा वापर करत असल्याने कायदेशीर कारवाई करण्यात येईल. तसेच मौजे मापगाव विभाग गट नं. १५०, गट नं. १५१ व गट नं. १५२/२ या मालकांवर सुध्दा बेकारदेशीर रस्त्याचा वापर करत असल्याने कायदेशीर कारवाई करण्यात येईल. वर उल्लेख केल्याप्रमाणे सदर मिळकतीमधील आमच्या अशिलांचा मालकीहक्क डावलून कोणीही कुठलाही व्यवहार केल्यास तो आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. तसेच अशाप्रकारचा कुठलाही व्यवहार केल्यास खरेदीदारास अथवा मिळकतीचे हस्तांतरण करन घेणाऱ्यांविरुद्ध योग्य ती कायदेशीर कारवाई केली जाईल व त्याकरीता होणाऱ्या सर्व खर्चास व परिणामास जबाबदार धरले जाईल याची या जाहीर नोटीशीद्वारे सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग,
ता. ०५/०३/२०२६

सही/-
**MAHESH S. MHATRE**
ADVOCATE
ENROLLMENT No. MAH/5773/2006
Rituraj Plaza, Ground Floor,
Flat No. 1. Ch. Shivaji Chouk,
Near Gawade Optics, Alibag Raigad


**वाचकांसाठी निवेदन**

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागि -नविन डिझाइन्स



**मोत्याचे दागिने– तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने– मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड– कुंदन– पोलकी– सेट– मॅचिंग बांगड्या– कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.**

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

## निवडक



### ‘लाईट ऑफ लाईफ’तर्फे पालक मेळावा

**वावोशी :** महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती खोपोली शाखेच्या वतीने ‘लाईट ऑफ लाईफ’ संस्थेच्या पालक मेळाव्यात बुवाबाजी, अंगात येणे आणि चमत्कारामागील विज्ञान या विषयावर प्रबोधनपर कार्यक्रम घेण्यात आला. समाजात वाढत चाललेल्या तथाकथित आध्यात्मिक बुवाबाजीच्या पार्श्वभूमीवर या विषयाची चिकित्सक मांडणी करण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला बुवाबाजी व आध्यात्मिक बुवाबाजी यामधील फसवणुकीचे स्वरूप स्पष्ट करत काही चर्चित बाबांच्या उदाहरणांच्या माध्यमातून अशा व्यक्ती लोकांचे शारीरिक, मानसिक आणि आर्थिक शोषण कशाप्रकारे करतात याचे विश्लेषण करण्यात आले. अंधश्रद्धेच्या आडून निर्माण होणारी भीती, श्रद्धेचा गैरवापर आणि भावनिक कमकुवतपणाचा कसा फायदा घेतला जातो यावर प्रकाश टाकण्यात आला. अंगात येणे या समजुतीमागील मानसशास्त्रीय आणि सामाजिक कारणमीमांसा काय आहे, याचे उदाहरणांसह स्पष्टीकरण करण्यात आले. विशेषतः अंगात येण्याच्या घटना स्त्रियांमध्येच अधिक का आढळतात, त्यामागील सामाजिक दबाव, दडपण आणि भावनिक अभिव्यक्तीची कमतरता यांचा संबंध स्पष्ट करण्यात आला. काही प्रत्यक्ष घडलेल्या घटनांचा संदर्भ देत या प्रकारांकडे वैज्ञानिक व समजूतदार दृष्टिकोनातून पाहण्याची गरज अधोरेखित करण्यात आली. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व समस्यांवर मूलभूत उपाय म्हणून परस्परांवर प्रेम, संवाद आणि सहकार्याची भावना जोपासणे हाच प्रभावी मार्ग असल्याचा संदेश देण्यात आला. या उपक्रमामुळे उपस्थित पालकांमध्ये जागृती निर्माण झाली.



### राज्यस्तरीय पत्रकार अधिवेशन उत्साहात

**पोलादपूर :** महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई व महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने वाशिम येथील सोमाणी परिसर, वाटाणे लॉन येथे राज्यस्तरीय पत्रकार अधिवेशन व पुरस्कार वितरण व पदाधिकारी सन्मान सोहळा उत्साहात पार पडला. उद्घाटन केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमास दिनकरराव वाटाणे, रमाकांत व्यास, गजानंद माऊली, डॉ. विश्वासराव आरोटे, शैलेश पालकर, नयन मोंढे, राजेंद्र कोर्टे पाटील, वैभव स्वामी, नवनाथ जाधव, यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. प्रारंभी आद्यपत्रकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर व मातोश्री स्नेहलता सोमाणी यांच्या प्रतिमांचे पूजन करून दीपप्रज्वलन कोकण विभागीय अध्यक्ष शैलेश पालकर यांच्याहस्ते करण्यात आले. अधिवेशनात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांना महाराष्ट्र भूषण सन्मान देण्यात आला. डॉ. रमाकांत व्यास यांना संत सेवाश्री, दिनकरराव वाटाणे यांना वारकरी सेवा, हेमराज लाहोटी, हरीश बाहेती, सरोज बाहेती यांना मविदर्भ भूषणफ, शिला राठी व माधवराव अंभोरे यांना मजीवन गौरवफ पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

### ट्रान्सफॉर्मरला अचानक आग

**महाड :** रायगड जिल्ह्यातील महाड शहरातील प्रांत कार्यालयांच्या शेजारी असणाऱ्या ट्रान्सफॉर्मर सायंकाळच्या सुमारास अचानक पेट घेतल्याने आजूबाजूच्या परिसरात भिंतीचे वातावरण निर्माण झाले. प्रांत कार्यालयाच्या शेजारी असलेल्या हाराच्या दुकान गाळा मालकाने



आपल्या दुकानाच्या समोर दुकानात असलेला कचरा जाळल्याने ही आग लागली असे सहाय्याने अभियंता ए.एल.भोयंलकर यांनी सांगितले परंतु आगीची ठिणगी लगतच्या ट्रान्सफॉर्मर वर पडल्याने ऑइलने अचानक पेट घेतल्याने आगीने रुद्र रूप धारण केल्याने बाजूला असलेल्या दुकानदारांच्या गाळ्यामुळे हि आग विझवण्यासाठी अडथळा निर्माण झाला होता. घटनास्थळी ट्रान्सफॉर्मरमध्ये ऑइल असल्यामुळे आगीवर फोमचा मारा करून आग विझवण्यासाठी महाड अग्निशामक दलांच्या जवानांना काही वेळातच ही आग विझवण्यास यश आले. परंतु घटनास्थळी असलेल्या दुकानदारांच्या हलगर्जीपणामुळे ही आग लागली असे ही घटनास्थळी असलेल्या नागरिकांमध्ये बोलले जात होते. या आगीमुळे आजूबाजूला असलेल्या दुकानाचे कोणतेही नुकसान झाले नाही. ट्रान्सफॉर्मर मात्र जळून राख झाली असे एमएसईबीचे अधिकारी यांनी सांगितले. परंतु काही काळासाठी महाड शहरातील विद्युत प्रवाह बंद करण्यात आले होते. परंतु विद्युत प्रवाह खंडित केलेला सुरळीत सुरू करण्यात आला आहे. घटनास्थळी महाड शहर पोलीस ठाण्याचे पोलीस हजर झाल्याने पुढील तपास करीत आहेत.

# वाढत्या उष्णतेचा जबर फटका

## बागायतदारांचे कोट्यवधींचे नुकसान; मोहर जळल्यामुळे बागायतदार हवालदिल

**| श्रीवर्धन | प्रतिनिधी |**

श्रीवर्धन तालुक्यात गेल्या काही आठवड्यांपासून वाढलेल्या तापमानामुळे आंबा व इतर फळबागांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. हिवाळा संपताच अचानक वाढलेल्या उष्णतेमुळे आंब्याचा मोहोर जळणे, फळगळ वाढणे आणि लहान फळे करपून गळणे अशा प्रकारांचे प्रमाण वाढले आहे. परिणामी यंदाच्या हंगामातील उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

डिसेंबर- जानेवारीमध्ये थंडीचे प्रमाण समाधानकारक होते. त्यामुळे आंबा बागांमध्ये मोहोर चांगला आला होता आणि बागायतदारांना विक्रमी उत्पादनाची



अपेक्षा होती. मात्र फेब्रुवारीपासून तापमानात झालेल्या झपाट्याने वाढीमुळे परिस्थिती पूर्णपणे बदलली. अनेक ठिकाणी तापमान ४० अंश सेल्सिअसच्या पुढे गेले. या उष्णतेचा थेट परिणाम मोहोरावर आणि नव्याने लागलेल्या फळांवर झाला. याशिवाय उष्ण हवामानामुळे कीड व रोगांचा प्रादुर्भाव वाढला आहे. थ्रिप्स, मिलीबग यांसारख्या किडींमुळे फळांच्या गुणवत्तेवर परिणाम झाला आहे. त्यामुळे बागायतदारांना वारंवार औषध फवारणी करावी लागत आहे. औषधे, खत, मजुरी, पाणी व्यवस्थापन आणि वीज यासाठीचा खर्च वाढत असताना उत्पादन घटल्याने आर्थिक ताण अधिकच वाढला आहे.

**आर्थिक गणित कोलमडले**

यंदा चांगल्या दराची अपेक्षा ठेवून अनेक बागायतदारांनी मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक केली होती. काहींनी कर्ज काढून बागांची देखभाल केली. मात्र, उत्पादन घटल्यास कर्जफेड करणे कठीण होणार आहे. बाजारात कमी उत्पादन आल्यास दर वाढण्याची शक्यता असली तरी प्रत्यक्षात शेतकऱ्यांच्या हातात किती पैसा येईल, याबाबत अनिश्चितता आहे. सध्याची नुकसानभरपाई अत्यंत अपुरी आहे. शासनाने तात्काळ पंचनामे करून वास्तव स्थिती पाहावी आणि अधिक व आक्रमक नुकसानभरपाई जाहीर करावी. बागायतदार आधीच कर्जाच्या ओझ्याखाली आहेत. वेळेत मदत मिळाली नाही तर अनेकांना गंभीर आर्थिक संकटाला सामोरे जावे लागेल. प्रशासनाने त्वरित निर्णय घेऊन आम्हाला दिलासा द्यावा, ही आमची ठाम मागणी आहे.

**उत्पादनात मोठी घट होण्याची भीती**

आंबा पिकाला फुलोऱ्याच्या व फळधारणेच्या टप्प्यावर मध्यम तापमानाची आवश्यकता असते. मात्र सतत वाढणाऱ्या उष्णतेमुळे परागीकरणावर परिणाम झाला असून फळधारणा कमी झाली आहे. काही भागांत ४० ते ५० टक्क्यांपर्यंत नुकसान झाल्याचा अंदाज बागायतदारांनी व्यक्त केला आहे.

> यंदा सुरुवातीला मोहोर अतिशय चांगला आला होता. आम्हाला चांगल्या उत्पादनाची अपेक्षा होती. पण अचानक वाढलेल्या उष्णतेमुळे संपूर्ण चित्र बदलले. मोहोर जळाला, फळगळ मोठ्या प्रमाणावर झाली आणि उत्पादन अर्ध्यावर आले.
>
> – संकेत हुमणे
> बांगणगा कोंडी



मुरूड समुद्रकिनारी सायंकाळी सूर्यास्त अतिशय सुंदर दिसतो, निळे आकाश आणि लालबुंद सूर्य पाहण्यासाठी पर्यटक खास येथे येत असतात. (छायाचित्र : सुधीर नाझरे)

### चांभार्ली ग्रामपंचायत राज्यात प्रथम

**| रसायनी | प्रतिनिधी |**

रसायनीतील ग्रुप ग्रामपंचायत चांभार्ली यांनी केंद्र शासनाच्या पंचायत विकास निर्देशांक अंतर्गत ९ संकल्पनांपैकी सामाजिक दृष्ट्या सुरक्षित गाव या थीममध्ये राज्यात सर्वाधिक गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला आहे. या उल्लेखनीय यशाची दखल घेत पंचायतराज मंत्रालयांच्या वतीने देण्यात येणाऱ्या राष्ट्रीय पंचायत पुरस्कारासाठी महाराष्ट्र शासनाकडून ग्रामपंचायतीचे अधिकृत नामांकन करण्यात आले आहे.

राज्य शासनाच्या समितीमार्फत केंद्राकडे प्रस्ताव सादर करताना ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, यशदाचे उपमहासंचालक डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी, श्रीधर कुलकर्णी, अमीर शेख यांनी मोलाचे सहकार्य केले. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, उपमुख्य कार्यकारी अधिकारी विशाल तनपुरे, खालापूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी संदीप कराड, विस्तार अधिकारी विनोद चांदोरकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही कामगिरी यशस्वी झाली. प्रदिप पाटील व ग्रामपंचायत अधिकारी सीमा राठोड यांच्या नेतृत्वाखाली ग्रामपंचायत सदस्य, सर्व शासकीय कर्मचारी, ग्रामस्थांच्या सहकार्याने सामाजिक दृष्ट्या सुरक्षित गाव संकल्पनेतील सर्व उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी प्रभावी कामकाज करण्यात आले.



### साखर येथे मार्केट डे साजरा

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

रायगड जिल्हा परिषद शाळा साखर येथे मार्केट डे उत्साहात साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रम गटशिक्षणाधिकारी कृष्णा पिंगळा, वरिष्ठ विस्तार अधिकारी सुनिल गवळी यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांना व्यवहार ज्ञान आत्मसात व्हावे यासाठी आयोजित करण्यात आला होता. यामध्ये विद्यार्थ्यांनी विविध प्रकारच्या खाद्यपदार्थांची मांडणी केली होती. विद्यार्थी आणि पालक यांनी मनमुराद आनंद लुटला.

सदर कार्यक्रमासाठी आक्षी ग्रामपंचायत उपसरपंच आनंद बुरांडे, सदस्य निरजा नाईक, मनोज हारे, निलेश चौलकर, तेजस तांडेल, रेश्मा भूकवार, देवदत्त मुंढे, हरेश्वर गोतकर, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, ग्रामस्थ जयराम आंबेरकर, ,जय बुरांडे, किरण बुरांडे, राकेश गण, दत्तात्रय गण, दिपा फाळके, दिलीप फाळके, ज्योती घरत, सुनिता राठोड, दर्शना म्हात्रे रिमा गुरव, संजना नर्बेकर, मनिषा गुरव, कमळा तांडेल, मुख्याध्यापक राजेंद्र पाटील, स्मिता चिखले, जान्हवी गण, प्रियंका ठाकूर तसेच सर्व पालक, विद्यार्थी उपस्थित होते. सदर कार्यक्रम मंडप उभारणी मोहन गण यांनी केली होती.

### चंदू कापसे यांचे निधन

**कोलाड :** रोहा तालुक्यातील मुठवली बुद्रुक येथील तुरे नाच मंडळाचे शाहीर चंदू महादेव कापसे यांची वयाच्या ७८ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले आहे. त्यांच्या जाण्याने



कापसे परिवारावर शोककळा पसरली असून नाच मंडळात त्यांच्या कलेची पोकळी निर्माण झाली आहे. कापसे यांचे आकस्मित निधन झाल्याने त्यांच्या अंत विधीसाठी सामाजिक, शैक्षणिक, कला क्रीडा सांस्कृतिक क्षेत्रातील असंख्ये मित्र परिवार, नातलग उपस्थित होते. यांच्या पश्च्छात त्यांची पत्नी, तीन मुले,एक भाऊ, सुना, पुतणे, नातवंडे असा मोठा कापसे परिवार आहे.

### ‘पशुधन विमा संरक्षणचा लाभ घ्या’

**| आगरदांडा | प्रतिनिधी |**



रायगड जिल्ह्यात शेतकऱ्यांना अचानक होणाऱ्या पशुधन नुकसानीपासून आर्थिक आधार देण्यासाठी भारतीय कृषी विमा कंपनीमार्फत पशुधन विमा योजना प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. विविध शासकीय योजना व वैयक्तिक पशुधन विमा प्रस्तावांअंतर्गत जिल्ह्यात आतापर्यंत एकूण १०७ जणांनी पशुधन कवच पूर्ण करण्यात आले आहेत. तरी जास्तीत जास्त जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी भारतीय कृषी कंपनी मार्फत पशुधन विमाचा लाभ घ्यावा असे आवाहन कोकण विभागीय समन्वयक आकाश हवालदार यांनी केले.

भारतीय कृषी विमा कंपनी मार्फत शेतकऱ्यांना आर्थिक संरक्षण आसुन बँक कर्ज योजनेअंतर्गत माणगाव तालुक्यात ९ व श्रीवर्धन तालुक्यात ५ असे एकूण १४ प्रस्ताव, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम अंतर्गत २० प्रस्ताव, तर प्रधानमंत्री राष्ट्रीय कृषी विकास योजना अंतर्गत कोरडवाहू क्षेत्र विकास योजनेअंतर्गत महाड १९, माणगाव ६ व खालापूर ११ असे एकूण ३६ प्रस्ताव पूर्ण झाले आहेत. याशिवाय वैयक्तिक पशुधन विमा अंतर्गत ३७ प्रस्ताव पूर्ण करण्यात आले आहेत. तसेच एमएच बंडल केलेले (शेळी व मेंढी) अंतर्गत एकूण ३२ प्रस्तावांचा समावेश आहे. जिल्ह्यातील पशुपालक शेतकऱ्यांना आता विमा संरक्षण लाभ घेऊन त्यांचा आर्थिक धोका कमी होण्यास मोठी मदत होत आहे. शेतकऱ्यांनी भविष्यातही अधिकाधिक शेतकऱ्यांपर्यंत पशुधन विमा पोहोचवून त्यांना सुरक्षितता देण्यासाठी प्रयत्न सुरू ठेवण्यात येणार असल्याचे हवालदार व राहुल लाडगे यांनी सांगितले.

यावेळी सतीश इंद्रे, जय धारिया, गणेश सुरते, स्वप्नील पवार, अनिल तांडेल, पल्लवी कदम, प्रद्युम्न ढोबळे, आप्पासाहेब घोडके, रोहन सरकटे, आकांशा माळी, अनुज पाटील, संग्राम ओंबळे, आदिंसह मान्यवर उपस्थित होते.

## अलिबागमध्ये राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, शाखा अलिबागतर्फे शनिवारी (दि.२८) फेब्रुवारी रोजी राष्ट्रीय विज्ञान दिन तरे सभागृहात संपन्न झाला. कार्यक्रमासाठी अलिबाग तालुक्यातील विविध शाळांतील, विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. विविध वयोगटातील विद्यार्थ्यांनी भित्तिपत्रक, चित्रकला, पथनाट्य, समूहगीत या विविध स्पर्धांमध्ये आपला सहभाग नोंदविला. खुल्या गटासाठी निबंध स्पर्धा होती. गणितज्ज्ञ श्रीनिवास रामानुजन, अन्नाची नासाडी, फटाक्यांचे दुष्परिणाम, वृक्ष




वाचवा, अमली पदार्थ सेवन टाळा, व्यायामाचे महत्त्व विषय स्पर्धांसाठी देण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी विविध चित्रांतून या विविध विषयांचे महत्त्व व्यक्त केले.

बक्षीस समारंभ भारतीय प्रशासकीय सेवेतील निवृत्त अधिकारी दिलीप पांढरपट्टे उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. शाम जोगळेकर होते. शुभांगी जोगळेकर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. दिलीप पांढरपट्टे यांनी विविध विषयांचे महत्त्व उलगडून सांगितले. प्रा. शाम जोगळेकर यांनी वैज्ञानिक दृष्टिकोनाचे आणि वाचनाचे महत्त्व सांगितले. मोबाईलच्या अतिरेकी वापरामुळे होणारे दुष्परिणाम टाळण्यासाठी सर्वांनीच प्रयत्न करण्याचे आवाहन केले. पाहुण्यांच्या हस्ते यशस्वी स्पर्धकांना प्रमाणपत्रे देण्यात आले. खुल्या गटातील, निबंध स्पर्धेतील यशस्वी स्पर्धकांचाही सत्कार करण्यात आला. पीएनपी माध्यमिक आणि प्राथमिक शाळा, वेश्वी-गोंधळपाडा, पीएनपी माध्यमिक शाळा, वायशेत, नागाव हायस्कूल, कुरूळ हायस्कूलांनी आपला सहभाग नोंदविला होता.

### चिमुकल्याने पाळला रोजा

**रोहा :** रोहा शहरातील सामाजिक कार्यकर्ते मुझफ्फर मुल्ला यांचे चिरंजीव अहमद मुल्ला या ५ वर्षीय चिमुकल्याने आपल्या आयुष्यातील आणि इस्लाम धर्मातील पवित्र रमजान महिन्यातील एक रोजा ठेऊन



नावलौकिक मिळविले आहे. याबद्दल कु. अहमद मुल्ला याचे आई, वडील व काका असिफ कर्जिकर, साहिर महमद डबीर, इम्तियाज महमूद नाडकर व अन्य नातेवाईक व समाज बांधवांकडून कौतुक करण्यात येत आहे.

**एकाच रात्री तीन वासरांचा फडशा | ग्रामस्थांकडून बंदोबस्त करण्याची मागणी**

## तुंगी गावावर बिबट्याची दहशत

**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्यातील अतिदुर्गम डोंगराळ भागात वसलेल्या तुंगी गावामध्ये गेल्या काही दिवसांपासून वन्यजीवांच्या हल्ल्यांचे सत्र सुरूच आहे. बुधवारी (दि.४) मार्च रोजी मध्यरात्री बिबट्याने मानवी वस्तीत शिरून हनुमान शिवाजी सुपे यांच्या गोठ्यातील तीन वासरांचा एकामागून एक फडशा पाडला. या हल्ल्यामुळे पशुपालक हवालदिल झाले असून, संपूर्ण तुंगी परिसरात कमालीची दहशत पसरली आहे. बिबट्याच्या या वाढत्या उपद्रवामुळे भविष्यात जीवितहानी होण्याची दाट शक्यता निर्माण झाली असून, वनविभागाने तातडीने पिंजरा लावून नरभक्षक बिबट्याचा



बंदोबस्त करावा, अशी मागणी ग्रामस्थ करीत आहेत.

दरम्यान, तुंगी गावातील ग्रामस्थांचा मुख्य उदरनिर्वाह शेती आणि पशुपालनावर अवलंबून आहे. बुधवारी रात्री गाव शांत झोपलेले असताना बिबट्याने सुपे यांच्या घराशेजारील गोठ्यात प्रवेश केला. एकाच वेळी तीन लहान वासरांवर हल्ला चढवला. सकाळी जेव्हा सुपे कुटुंब गोठ्यात गेले, तेव्हा त्यांना रक्ताच्या थारोळ्यात पडलेली वासरे दिसून आली. या हल्ल्यात सुपे यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून, त्यांच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. घटनेची माहिती मिळताच वनविभाग आणि पशुसंवर्धन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला आहे.

गेल्या ४ ते ५ वर्षांपासून बिबट्याच्या वावरामुळे हे गाव डेंजर झोन बनले आहे. हा भाग डोंगराळ आणि झाडीझुडपांचा असल्याने बिबट्याला लपण्यासाठी सुरक्षित जागा मिळते. यापूर्वीही अनेक शेतकऱ्यांच्या शेळ्या, मेंढ्या आणि गायी-म्हशींवर बिबट्याने हल्ले केले आहेत. मात्र, आता बिबट्या थेट घरांच्या उंबरठ्यापर्यंत पोहोचल्याने ग्रामस्थ भयभीत झाले आहेत.

दरम्यान गावाचा विकास झाला असला तरी बिबट्याच्या दहशतीमुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. डोंगरदऱ्यातून शाळेत जाणाऱ्या मुलांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. सकाळी लवकर आणि संध्याकाळी अंधार पडल्यानंतर घराबाहेर पडणे कठीण झाले आहे. महिलांना शेतीकामासाठी किंवा सरपण गोळा करण्यासाठी जंगलात जाताना जीव मुठीत धरून जावे लागत आहे.

जर वेळीच बिबट्याचा बंदोबस्त झाला नाही, तर एखाद्या दिवशी मानवावर हल्ला होण्याची शक्यता नाकारता येत नाही, अशी भीती स्थानिक ग्रामस्थ व्यक्त करत आहेत. वनविभागाने केवळ पंचनामे करून कागदी घोडे नाचवू नये, तर प्रत्यक्ष कृती करावी अशी मागणी जोर धरू लागली आहे. गावात तातडीने सौर दिवे वाढवणे आणि बिबट्याला जेरबंद करण्यासाठी पिंजरा लावण्याची मागणी करण्यात आली आहे.

### रेवदंडा बायपासला कुत्र्यांचा उपद्रव

**| रेवदंडा | प्रतिनिधी |**

रेवदंडा बायपास रस्तावर कुत्र्यांचा उपद्रव फारच वाढला असून येथून पायी प्रवास करणे धोक्याचे बनले आहे. रेवदंडा बायपासला कचरांचे डंपिग ग्राउंड सलग रस्तावर अनेक ठिकाणी ग्रामस्थांच्या हलगर्जीने तयार झाले आहेत, या बायपास रस्तालगत ग्रामस्थांनी कचरा टाकून केलेल्या डंपिग ग्राऊंडने येथे कुत्रांचा वावर वाढला आहे. डंपिग ग्राऊंडच्या कचरामध्ये बॉयलर कोंबडीचे अवयव आदी कचरा असल्याने येथे परिसरातील असंख्य कुत्री जमा होतात, शिवाय या कुत्रांनी परिसर वाटून घेतल्यान, एखादा अनोळखी कुत्रा येथे आल्यावर वारंवार कुत्रांचे ऐकमेकांवरील



हल्ले सुरू असतात.

रस्त्याला कुत्रांचे अनेक ग्रुप असल्याने येथून प्रवास करत असलेल्या दोन चाकी, चारचाकी वाहनांच्या पाठीमागे कुत्री भुंकत धावत असतात, तर पायी चालत जात असताना, ही कुत्री अंगावर येत असल्याने धोकेदायक आहेत. येथून एकटयादुकटयाने पायी प्रवास करणे जीकीरीचे बनले आहे. संबधीतानी त्वरीत रेवदंडा बायपास वरील कुत्रांचा बदोबस्त करावा अशी मागणी सर्व स्तरातून करण्यात येत आहे.




## राशीभविष्य

- **मेष** : कामाचं चांगलं फळ मिळेल. निर्णय घेण्यासाठी विलंब करु नका. व्यापारात चांगला दिवस.
- **वृषभ** : आपण दिलेला सल्ला शुभफलदायी ठरेल. आत्मविश्वास वाढेल. व्यापारात प्रगतीचे योग आहेत.
- **मिथुन** : कार्यकुशलता वाढणार आहे. परिश्रमाचा योग्य मोबदला मिळेल. स्थावर संपत्तीबाबत शुभ घटना.
- **कर्क** : कार्यक्षेत्रात उत्साह वाढेल. शासकीय कामं मनासारखी होतील. गृहसौख्य लाभेल.
- **सिंह** : व्यावसायिक करार फायदेशीर ठरतील. खरेदी-विक्रीच्या व्यवहारात अनुकूलता राहील.
- **कन्या** : कार्यक्षेत्रात अडचणी येतील. नोकरीत जबाबदारीने रहावं. सामाजिक कार्य घडेल.
- **तूळ** : ध्येय समोर ठेवून वाटचाल करा. अपेक्षित यश मिळेल. प्रकृतीत सुधारणा होईल.
- **वृश्चिक** : मोठ्या लोकांच्या भेटी लाभप्रद ठरतील. कार्यकुशलता वाढेल. घरात वातावरण चांगलं राहील.
- **धनु** : कामाला गती मिळून ती वेळेत पूर्ण होतील. जोडीदाराशी वैचारिक मतभेट टाळा. कलेत प्रगती.
- **मकर** : व्यवसायात अनुकूलता वाढेल. आर्थिक कामं मनासारखी होतील. कोर्टप्रकरणं टाळावी.
- **कुंभ** : मानसिक अस्थिरता टाळावी. महत्त्वाचे निर्णय वेळीच घ्यावे. व्यापारात अडचणी संभवतात.
- **मीन** : आपले स्वप्न पूर्ण होईल. जुन्या ओळखीतून कार्यसिद्धी होईल. प्रवास घडेल.

## दिनविशेष

### ६ मार्च

१९९२ : सुप्रसिद्ध लेखक रणजित देसाई यांचे निधन.
२०१४ : राजीव गांधी यांच्या मारेकऱ्यांच्या सुटकेची सुनावणी २६ मार्चपर्यंत पुढे ढकलली.
२०१६ : दिल्ली-गुजरातमध्ये हल्ले घडवून आणण्यासाठी देशात दहा दहशतवादी घुसले असल्याची शक्यता व्यक्त. कच्छमध्ये छापे.
२०१८ :पंजाब नॅशनल बँकेतील १२ हजार ७०० कोटी रुपयांच्या गैरव्यवहारप्रकरणी ३१ बँकांच्या प्रमुख चौकशीच्या फेऱ्यात.

## आरोग्यमंत्र

### तोंडाने शोषून विष उतरते?

सापाच्या विषाचा प्रभाव कमी करण्यासाठी शरीरातील त्याचे प्रमाण जमेल त्या प्रकारे कमी करणे हिताचे ठरते. यात हात व पायाला हृदयाच्या बाजूला आवळपट्टी बांधणे, व्यक्तीस हालचाल करू न देणे, दंशाच्या जानी निर्जंतुक केलेल्या ब्लेडने छेद घेऊन तेथील रक्त काढणे व जखम साफ करणे अशा उपायांचा समावेश होतो. विष यांत्रिक पंपाच्या साहाय्याने शोषून घेता येते किंवा तोंडात जखम वा व्रण नसतील, तर तोंडानेही शोषून घेता येते, पण शोषून घेतल्याने केवळ २०% इतकेच विष शरीराच्या बाहेर येते. ते सुद्धा सर्पदंशानंतर ३० मिनिटांत विष शोषून घेतले तरच! शोषून घेण्यापूर्वी सर्पदंशाच्या जागी ब्लेडने छेद देणे अत्यंत आवश्यक असते. नुसत्या सर्पदंशाच्या जखमेतून विष तोंडाने शोषून घेता येत नाही. शरीराच्या ज्या भागावर आवळपट्टी बांधता येत नाही, तेथील विष काढून टाकण्यासाठी जखमेवर छेद घेऊन शोषण्याचा उपयोग होतो.



विष शोषून घेणाऱ्या व्यक्तीने त्याच्या तोंडाला जखम झालेली नाही, याची खात्री करून घ्यावी; नाहीतर त्याला विषबाधा होऊ शकेल. साप चावल्यानंतर सर्वोत्तम उपाय म्हणजे सर्पासाठीचे प्रतिविष देणे. बाकीचे उपाय करण्यात जास्त वेळ न दवडता तात्काळ अशा रुग्णाला दवाखान्यात न्यायला हवे.

## सफर देशांची

### सुंदर किर्गिझस्तान

किर्गिझस्तान हा मध्य आशियातला एक देश. चीन, कझाकिस्तानसह तजिकिस्तान आणि उझबेकिस्तान हे किर्गिझस्तानचे शेजारी आहेत. 'किर्गिझ रिपब्लिक' किंवा 'किर्गिझिया' या नावांनीही तो ओळखला जायचा. 'बिश्केक' ही या देशाची राजधानी. एके काळी हा सोव्हिएत रशियाचा भाग होता. १९९१ मध्ये तो स्वतंत्र देश म्हणून उदयाला आला. किर्गिझस्तान जगातल्या कोणत्याही देशापेक्षा महासागरापासून सर्वाधिक लांब असून देशातला ८० टक्के भाग डोंगराळ आहे. इथला 'इसिक कुल' हा आशिया खंडातल्या तर 'टिटिकाका' हा जगातल्या पर्वतरांगांमधला सर्वात मोठा तलाव आहे. किर्गिझस्तान मध्य आशियातला दुसऱ्या क्रमांकाचा गरीब देश आहे. शेती हा इथला प्रमुख व्यवसाय. इथे शेतात घोडे राबताना दिसतात. गहू, बटाटे, कापूस, तंबाखू, भाज्या, फळं इथं पिकवली जातात. इथं खनिजसंपत्तीही आहे. या देशात कोळसा, सोनं, युरेनियमच्या खाणी आहेत. किर्गिज आणि रशियन या इथल्या अधिकृत भाषा आहेत. वेगवेगळ्या जमातींचे लोक या देशात राहतात.

## स्टाईल स्टेटमेंट

### मेकओव्हर उन्हाळ्यातला

ऋतू बदलला की अनेकजणी वॉर्डरोब अपडेट करतात. थंडीत स्वेटर, स्टोल्स, स्वेट कुर्ता असे कपडे घातल्यानंतर आता उन्हाळा सुरू होताना कॉटन, लिननचे मोकळेढाकळे, ढगळ कपडे घालावे लागणार. नवी खरेदी करायचा विचार असेल तर यंदाचे ट्रेंड लक्षात घ्या. या वर्षात इन असलेल्या फॅशनविषयी.

* मधल्या काळात घट्ट, स्कीनी जीन्सचा ट्रेंड होता. तुमच्याकडेही अशा जीन्स असतील तर सध्या त्या जरा बाजूला ठेवा. त्याऐवजी थोड्या ढगळ जीन्स विकत घ्या. या वर्षी अशा जीन्सचा ट्रेंड असेल. उन्हाळ्याच्या दृष्टीने अशा जीन्स आरामदायी असतील तसंच रेट्रो लूकही मिळेल.

* लोफर्समध्ये सातत्याने नवे ट्रेंड्स येत असतात. या वर्षात हिल्सवाल्या लोफर्स आणि म्युल्स अशा पादत्राणांची चलती असेल. ही पादत्राणं कोणत्याही पेहरावावर शोभून दिसतात. त्यामुळे लोफर्स आणि म्युल्सची एखादी जोडी खरेदी करायला हरकत नाही. **(क्रमशः)**

## पंचांग

**शुक्रवार, ६ मार्च २०२६**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७, फाल्गुन कृ. ३ , चंद्रराशी : कन्या, नक्षत्र : हस्त, योग : गंड/वृद्धि, सूर्योदय ६.५६, सूर्यास्त ६.४४

## फॉरवर्ड्स

**एक़ ही चौख़ट पर सिर झुकें तो सुक़ून मिलतां हैं...**

**भटक जातें हैं वो लोग़ जिनकें हज़ारों ख़ुदा होतें हैं...!**

## स्टायलिंग फंडे

उगाचच काहीतरी घालून डेटवर जाऊ नका. डेटला जाताना फॅशनच्या कोणत्या चुका टाळायच्या याविषयी...


* अशावेळी जीमचे कपडे अजिबात घालू नका. ते फक्त जीममध्येच घालायचे असतात हे लक्षात ठेवा. तुमची मैत्रिण खूप छान तयारी करून आलेली असेल. या प्रसंगी तुमची जोडी शोभून दिसायला हवी. त्यामुळे जीमचे कपडे कितीही लाडके असले तरी ते बाजूला ठेवा.

* शर्टचं बटण उघडं ठेऊ नका. लो नेकवाले टी शर्ट टाळा. बटण खूप खाली असलेले शर्टही नकोच. **(क्रमशः)**

## करिअरवाटा

### वाचाल तर वाचाल...

वाचनाची आवड असेल तर वाचनाच्या क्षेत्रातच करीअर करणं कोणाला आवडणार नाही! कारण आवडीचं काम करताना खूप मजा येते. वाचनाची आवड असणाऱ्यांसाठी काही चांगले पर्याय आहेत. त्याविषयी...



* तुम्हाला प्रकाशनाच्या क्षेत्रात पाऊल टाकता येईल. प्रकाशन या नात्याने विविध हस्तलिखितं वाचण्याची संधी मिळेल. पुस्तकात काही बदल सुचवता येतील. यानिमित्ताने नव्या तसंच जाणत्या लेखकांचे विचार जाणून घेण्याची संधी मिळेल. * तुम्ही ग्रंथपाल म्हणूनही काम करू शकता. हे काम करताना दिवसभर वाचता आलं नाही तरी विविध वाचनप्रिय लोकांशी संवाद साधता येईल. समविचारी लोकांशी संपर्क वाढवता येईल. * वाचताना आपलं विश्व समृद्ध होत जातं. वैचारिक क्षमता वाढते. नव्या कल्पना सुचतात. या कल्पना तुम्ही शब्दबद्ध करु शकता. स्वत:चं पुस्तक काढू शकता. कादंबरी लिहू शकता. * संपादनाच्या क्षेत्रातही करीअर करता येईल. इथेही तुम्ही भरपूर वाचू शकता. * वाचनाची आवड असेल तर पत्रकारितेचं क्षेत्रंही चांगलं आहे. इथे लिहिण्याची संधीही मिळेल.

## खेचाखेची

### ज्योती तयार होईल का?

**कुलकर्णी** : अहो जोशी हल्ली रोज संध्याकाळी मी त्राटक करतो. तुम्हीसुद्धा करत जा. डोळ्यांना अगदी छान वाटतं.
**जोशी** : त्राटक? ते काय असतं?
**कुलकर्णी** : अहो अगदी सोपं आहे. संध्याकाळच्या वेळी खोलीमध्ये अंधार करायचा, समई किंवा मेणबत्ती लावायची आणि ज्योतीकडे पापण्या न मिटता एक-टक बघायचं. डोळ्यांना छान वाटतं!
**जोशी** : डोळ्याला छान वाटेल हो. पण ज्योती तयार होईल का घरी यायला?

## वेगळं काही

फ्रान्सच्या एडविन वॅन रूबेम्बे या एरोनॉटिकल इंजिनिअरने किड्यासारखा दिसणारा रोबो तयार केला आहे. 'मेटाफ्लाय' नामक हा रोबो हुबेहुब उडत्या किड्यासारखा दिसतो. 'बायोमिमेटिक्स' नावाच्या सिंथेटिक प्रक्रियेमुळे 'मेटाफ्लाय' हवेत उडू शकतो. हा रोबो आहे हे सांगूनही खरं वाटणार नाही, इतका तो नैसर्गिक वाटतो. 'मेटाफ्लाय' हवेत जलद आणि धीम्या गतीने उडू शकतो. अवघं दहा ग्रॅम वजन असलेल्या मेटाफ्लायची लांबी ७.५ इंच आहे. पंख पसरवल्यानंतर त्याची लांबी ११.४ इंच होते. 'मेटाफ्लाय' १०० मीटरपर्यंत उंच उडू शकतो. प्रति तास १८ किलोमीटर एवढा वेग तो घेऊ शकतो. रिमोट कंट्रोलच्या माध्यमातून 'मेटाफ्लाय'वर नियंत्रण ठेवता येतं.

## रुचिरा

### चमचमीत आलू टिक्की

चहासोबत काहीतरी चटपटीत खावं असं वाटत असतं. चला तर मग, आलू-दाल टिक्की ट्राय करून बघू या.



**साहित्य:** अर्धी वाटी हरभरा डाळ, दोन वाट्या उकडून मॅश केलेले बटाटे, चार ब्रेड स्लाईस, दोन टेबलस्पून लिंबाचा रस, बारीक चिरलेली कोथिंबीर, दोन किंवा तीन हिरव्या मिरच्या (बारीक चिरुन), एक टीस्पून तिखट, एक टीस्पून गरम मसाला, जिरे पावडर, एक टीस्पून धने पावडर, तळण्यासाठी तेल, चवीला मीठ इत्यादी.

**कृती:** सर्वप्रथम डाळ दोन ते तीन तास भिजत ठेवावी. त्यानंतर शिजवून घ्यावी आणि पाणी काढून बाजूला ठेवावी. नंतर मॅश केलेला बटाटा, डाळ, बारीकचुरलेला ब्रेड, कोथिंबीर, लिंबाचा रस, मिरच्या ही सामग्री एकत्र करावी. या मिश्रणात तिखट, गरम मसाला, धने-जिरे पावडर, मोहन मिसळून घ्यावं. हलक्या हाताने मळावं. टिक्की थापून घ्यावी. आता तव्यावर थोडं तेल घालून त्यावर टिक्की ठेवावी आणि सोनेरी रंगावर फ्राय करून घ्यावी. आवडत्या चटणीसोबत गरमा गरम खायला द्यावी.

## सुडोकू ७३


| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | ८ | ६ |
| ७ | ६ | | ४ | | ३ | १ | | ९ |
| | | | १ | ६ | ८ | ३ | ७ | २ |
| ९ | ४ | | | | ६ | | | ८ |
| ६ | | | | ३ | | | | ४ |
| ८ | | | ९ | | | | ३ | १ |
| १ | २ | ६ | ३ | ९ | ७ | | | |
| ३ | | ४ | २ | | १ | | ६ | ७ |
| ५ | ७ | | | | | | | |

टीप -
* या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह्न ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
* आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
* अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू ७२चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ७ | ५ | ८ | ९ | ३ | २ | ४ | १ | ६ |
| ३ | १ | ४ | ६ | ८ | ५ | ९ | २ | ७ |
| २ | ९ | ६ | ७ | १ | ४ | ५ | ३ | ८ |
| ५ | २ | ७ | ८ | ६ | ३ | १ | ४ | ९ |
| ८ | ४ | ३ | ५ | ९ | १ | ६ | ७ | २ |
| ९ | ६ | १ | २ | ४ | ७ | ३ | ८ | ५ |
| १ | ७ | ५ | ३ | २ | ६ | ८ | ९ | ४ |
| ४ | ८ | २ | १ | ५ | ९ | ७ | ६ | ३ |
| ६ | ३ | ९ | ४ | ७ | ८ | २ | ५ | १ |

## शब्दकोडे क्रमांक ७३



**आडवे शब्द :-**
२) रात्रीचा पाऊस
४) सन्मान, मान ****
७) श्रेष्ठ धनुर्धारी
९) उलटा लटकणारा पक्षी
११) पदर
१२) राजा किंवा पैगंबर यांच्या नावापुढचा आदरणीय शब्द
१४) वक्र
१६) एक शब्दालंकार
१७) राजवाडा
२१) बारीक झणझण
२४) मडके
२५) सूट
२६) वर्ष
२८) बसण्याची फळी
२९) बापसे बेटा *** , वरचढ
३०) उत्कर्षाचा काळ
३२) द्वेष, मत्सर
३३) मोठे खोलगट ताट
३५) वाळवंट
३६) स्वयंपाकी
३८) कट्टा, चबुतरा, झाडाभोवतीचा ओटा
३९)कामातील कौशल्य
४०) नाकाला खड्डा असलेला
४२) डोळ्यातील बाहुली
४४) छोटी ताटली
४६) देवाचे देहधारी रुप
४७) कमळ
४९) प्रज्वलित, तापलेले
५२) संगीतातील एक रास
५४) सहेतुक, इच्छा धरुन केलेले
५५) आत्मस्तुती, स्वत:चा मोठेपणा सांगणे
५६) व्योम, नभ
५७) अकारण
५९)साह्य,एखाद्याची बाजू घेणे
६१) देवीचा एक वार
६३) बट्टा, डाग
६४) भाकरीचे एक धान्य
६६) जोखीम, जिम्मेदारी
६७) केसांची बट

**उभे शब्द :-**
१) शंकराने पचविलेले विष
२) मीठ
३) संधी, मोका
४) पिकांवरील एक रोग
५) बोलणारा पक्षी
६) पायाचा खालचा भाग
७) इंद्रिय, घटक
८) मीठ * हिं.)
१०) धडक
११) पराभव, हार.
१३)भाता आणि धनुष्य
१५) हाताचा तळवा
१८) तुरुंगवास
१९) गंध
२०) डावरा
२२) उन्हाची भयानक तीव्रता
२३) अभिनेता
२६) सहजगत्या
२७) पुरुष
२८) दूर गेलेला
३१) शंकराचे एक नाव
३२) अशा प्रकारचा
३३) पंख
३४) तल्लीनता
३७) नेत्रसुखद डोळ्याला सुखविणारे दृष्य
३८) वरवंटचाचा जोडीदार
४१) छोटी घागर
४२) आश्चर्याची गोष्ट
४३) अलौकिक गोष्ट
४५) तत्वांश
४७) एक गुजराती नृत्यप्रकार
४८) रंग
५०) समुद्र
५१) पूजा साहित्याचे ताट
५३) केसांचा भांग पडण्याचे एक साधन
५४) सामान्य
५७) अंतराळातील, आकाशातील
५८) चाकरी
५९) भरत राजाची आई
६०) धोबी
६१) पांढरा, धवल
६२) भोळा माणूस
६५) पाणी

(उत्तर उद्याच्या अंकात)

## मागील शब्दकोड्याचे उत्तर



## निवडक

### यंगस्टार देवकान्हे संघाची बाजी



**खांब :** रोहा तालुक्यातील गावदेवी क्रीडा मंडळ बाहे यांच्यावतीने बाहे क्रीडा नगरीत विभागीय क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेच्या अंतिम सामन्यात यंगस्टार देवकान्हे संघाने सर्वोत्तम कामगिरी करून गावदेवी चषकावर आपले नाव कोरले आहे. या क्रिकेट स्पर्धेत विभागातून मोठ्या संख्येने क्रिकेट संघांनी सहभाग नोंदविला होता. या स्पर्धेचे उद्घाटन माजी सरपंच मंगेश भोईर, नारायण कान्हेकर, सुनील थिटे, श्याम लोखंडे, गणेश पवार, संजय जाधव व रूपेश बामुगडे यांच्या हस्ते करण्यात आले. या स्पर्धेत यंगस्टार देवकान्हे संघाने प्रथम क्रमांक पटकावून गावदेवी चषकावर आपले नाव कोरले आहे. तर, धाकेश्वर देवकान्हे संघाने द्वितीय आणि सुखकर्ता वॉरिअर्स खांब या संघाने तृतीय क्रमांक पटकावला आहे. तसेच, स्पर्धेतील उत्कृष्ट फलंदाज योगेश टवळे, उत्कृष्ट गोलंदाज आदित्य जवरत व मालिकावीर म्हणून स्वप्नील भोईर यांचा गौरव करण्यात आला. या स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी गावदेवी क्रीडा मंडळ बाहे येथील सर्व क्रिकेट खेळाडू सदस्य व मंडळाच्या अन्य सभासदांनी मोलाचे सहकार्य केले.

### ओम म्हसोबा चषकाचे आयोजन

**पाली/गोमाशी :** श्री म्हसोबा ११ दिघेवाडी ग्रामस्थांच्यावतीने मर्यादित ओव्हर आर्म क्रिकेट सामने दि.७ व ८ मार्च रोजी दिघेवाडी येथे आयोजित करण्यात आले आहेत. या स्पर्धेचे उद्घाटन रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे उपाध्यक्ष सुरेश खैरे यांच्या हस्ते होणार आहे. या स्पर्धेसाठी विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या स्पर्धेचा थरार निमंत्रित २४ संघात प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहे. या स्पर्धेदरम्यान नामवंत खेळाडू हजेरी लावणार आहेत. या स्पर्धेचे दिमाखदार नियोजन मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे. तसेच, या स्पर्धेसाठी आकर्षक बक्षिसे मंडळाच्यावतीने तसेच उदार देणगीदारांकडून निश्चित करण्यात आली आहेत. यावेळी आकर्षक चषकासह प्रथम क्रमांकास रोख रक्कम ५५,५५५ रुपये, द्वितीय क्रमांकास रोख रक्कम ३३,३३३ रुपये, तृतीय क्रमांकास रोख रक्कम १५ हजार रुपये चतुर्थ क्रमांकास रोख रक्कम ११ हजार रुपये देऊन गौरविण्यात येणार आहे. तर, या स्पर्धेतील सामनावीर, उत्कृष्ट फलंदाज, उत्कृष्ट गोलंदाज, उत्कृष्ट क्षेत्ररक्षक यांना देखील सन्मानित करण्यात येणार आहेत.



### आगरी बॉईजचा भव्य विजय

**रेवदंडा :** मुरुड-जंजिरा तालुक्यातील सातीर्डे येथील श्री गणेश क्रीडा मंडळाने दि.१ ते ३ मार्च दरम्यान क्रिकेट स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेत विविध संघांनी उत्साही प्रतिस्पर्धा करत मैदान गाजवले. मात्र, अंतिम लढतीत आगरी बॉईज दिव-रोहा संघाने अप्रतिम प्रदर्शन करून पहिल्या क्रमांकाचा मानकरी पदाचा सन्मान मिळवला. या विजयाने संघातील प्रत्येक खेळाडूला प्रेरणा मिळाली असून, स्थानिक क्रिकेटप्रेमींमध्ये उत्साहाची लहर उसळली आहे. कर्णधार मानव पांढरी कोटकर यांच्या शिस्तबद्ध नेतृत्वाने संघाला विजयाकडे नेले. उपकर्णधार शाहिद म्हात्रे यांनी गोलंदाजी आणि फलंदाजी दोन्हीमध्ये मोलाची भूमिका बजावली. ऑल राऊंडर युवराज पाटील यांनी प्रत्येक साखळीतील जबरदस्त अष्टपैलू खेळीने प्रतिस्पर्धी संघांना नामोहरम केले. दिव एक्सप्रेस मिलिंद जांभळे यांच्या वेगवान फलंदाजीने धावफलक फोडला, तर षटकार किंग प्रणय पाटील यांच्या षटकाराने प्रेक्षकांना झूमबा झडला. याशिवाय संकुल वाडकर, प्रांजल जमादार आणि प्रियांश पाटील यांनीही जबरदस्त फलंदाजी आणि गोलंदाजीने संघाला मजबूत आधार दिला. सर्व खेळाडूंनी एकजूटीने खेळत मनाचा विजय मिळवला. त्यामुळे हा चषक त्यांच्याच ताब्यात गेला. या विजयासोबतच आगरी बॉईज दिव संघाने २०२५-२६ या एका वर्षात एकूण ९ चषक जिंकण्याचा कमाल विक्रम केला आहे.

# दक्षिण अफ्रिका पुन्हा ‘चोकर्स’

## न्युझीलंडची अंतिम सामन्यात धडक

**| कोलकाता | वृत्तसंस्था |**

टी-२० विश्वचषकातील पहिला उपांत्य फेरीचा सामना बुधवारी (दि.४) दक्षिण अफ्रिका व न्यूझीलंड यांच्यात कोलकाता येथील ईडन गार्डन्सवर पार पडला. यावेळी टी-२० विश्वचषक स्पर्धेत अपराजित राहिलेला एकमेव संघ असलेला आफ्रिकेचा संघ मोक्याच्या सामन्यात पुन्हा एकदा चोकर्स ठरला आहे. न्यूझीलंडने दक्षिण आफ्रिकेचा सहज पराभूत केला असून टी-२० विश्वचषक स्पर्धेतील न्यूझीलंडचा हा आफ्रिकेवरील पहिलाच विजय ठरला आहे. यापूर्वी पाच सामन्यांत आफ्रिकेने बाजी मारली होती. परंतु, आयसीसी स्पर्धेच्या बाद फेरीच्या इतिहासात न्यूझीलंडने आफ्रिकेला नेहमी पराभूत केले आहे. तिच परंपरा कायम राखताना न्यूझीलंडने अंतिम फेरीत प्रवेश केला.



टी-२० विश्वचषकाच्या पहिल्या उपांत्य फेरीत न्यूझीलंडने नाणेफेक जिंकून दक्षिण अफ्रिकेला पहिली फलंदाजी करण्याचे आमंत्रण दिले. यावेळी आफ्रिकेचे सलामीवीर सपशेल अपयशी ठरले. दुसऱ्याच षटकात सलग २ चेंडूंवर क्विंटन डी कॉक (१०) व रायन रिकेल्टन (०) स्वस्त्यात बाद झाले. त्यानंतर मार्करम (१८) झेलबाद झाला. लगेच डेव्हिड मिलरही (६) बाद झाला. यादरम्यान किवींकडून दोन झेल सुटले; परंतु, त्याचा फार मोठा फटका त्यांना बसला नाही. आफ्रिकेचे अवघ्या ७७ धावांवर ५ फलंदाज माघारी परतले होते. मात्र, त्रिस्तान स्तब्स व मार्को यान्सेन या जोडीने धुमाकुळ घातला. त्यांनी सहाव्या बळीसाठी ७८ धावा जोडल्या. तत्पूर्वी डेवॉल्ड ब्रेव्हिसने ३४ धावांची खेळी केली होती. त्यानंतर स्टब्स् २९ धावांवर माघारी परतला अन् पुन्हा न्यूझीलंडने पुनरागमन केले. यावेळी यान्सेनने ३० चेंडूंत ५५ धावांची नाबाद खेळी केली. टी-२० विश्वचषकाच्या बाद फेरीतील हे त्याचे पाचवे आणि आफ्रिकेकडून दुसरे वेगवान अर्धशतक ठरले. यान्सेनच्या फटकेबाजीमुळे आफ्रिकेला ८ बाद १६९ धावांपर्यंत मजल मारता आली. किवींकडून कोल मॅकोंची, मॅट हेन्री व रचिन रविंद्र यांनी प्रत्येकी दोन बळी घेतले. तर, ल्युकी फर्ग्युसन आणि जिमी निर्शम यांनी प्रत्येकी एक बळी घेतला.

लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी उतरलेले फिन ॲलन व टीम सेइफर्ट या सलामिवीरांनी न्यूझीलंडला आक्रमक सुरूवात करून दिली. त्यांनी ४.१ षटकांत ५० धावा फलकावर चढवल्या. त्यानंतर या जोडीने ७.५ षटकांत १०० धावा फलकावर चढवल्या. सेइफर्टने २८ चेंडूत अर्धशतकही पूर्ण केले. परंतु, ११७ धावांवर न्यूझीलंडला पहिला धक्का बसला. सेइफर्ट ३३ चेंडूत ५८ धावांवर कागिसो रबाडाच्या चेंडूवर त्रिफळाचीत झाला. मात्र, ॲलन मैदानावर उभा राहिला आणि त्याने संघाला १२.५ व्या षटकांत विजय मिळवून दिला. ॲलनने ३३ चेंडूत १०० धावांची नाबाद खेळी केली. रचिन रविंद्र १३ धावांवर नाबाद राहिला. त्यामळे न्यूझीलंडने ९ गडी राखून दक्षिण अफ्रिकेवर सहज विजय मिळवत अंतिम सामन्यात प्रवेश केला आहे.

### फिन ॲलेनची विश्वविक्रमांना गवसणी



न्यूझीलंडच्या विजयात टीम सिफर्ट आणि फिन ॲलेन यांनी मोलाचा वाटा उचलला. त्यांनी ११७ धावांनी सलामी भागीदारी केली. फिन ॲलेनने तर अफलातून फटकेबाजी करताना अवघ्या ३३ चेंडूत शतक झळकावत अनेक विश्वविक्रमांना गवसणी घातली. त्याने युवराज सिंगचा १९ वर्षे जुना विक्रमही मोडला. शतक झळकवण्याआधी ॲलेनने १९ चेंडूतच अर्धशतक पूर्ण केले होते. त्यानंतर पुढच्या १४ चेंडूत त्याने त्याचे शतक पूर्ण केले. त्यामुळे ॲलेन आता टी-२० विश्वचषक स्पर्धेच्या बाद फेरीत सर्वात वेगवान अर्धशतक करणारा खेळाडू ठरला आहे. यापूर्वी हा विक्रम युवराज सिंगच्या नावावर होता. युवराज सिंगने २००७ च्या विश्वचषकात ऑस्ट्रेलियाविरुद्ध डर्बनला झालेल्या उपांत्य सामन्यात २० चेंडूत अर्धशतक केले होते. तसेच, ॲलेन टी-२० विश्वचषकाच्याा बाद फेरीत शतक करणारा पहिलाच खेळाडू ठरला आहे. त्याचसोबत तो सर्वात जलद शतक करणारा खेळाडू देखील ठरला आहे.

## १६ वर्षीय दीयाचे द्विशतक

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

बीसीसीआयतर्फे आयोजित २३ वर्षांखालील महिलांच्या एकदिवसीय चषकातील एलिट सामन्यात हरयाणाच्या १६ वर्षीय दीया यादवने द्विशतक झळकावले. ती महिला प्रीमिअर लीगमध्ये दिल्ली कॅपिटल्स संघाची सदस्य असून या सामान्यात हरयाणा संघाचे प्रतिनिधित्व करत आहे. हरयाणाने प्रथम फलंदाजी करताना ३ बाद ३५६ धावा केल्या. तनिष्का शर्मा व दीया यादव यांनी १८१ धावांची भागीदारी केली. त्यामध्ये दीयाने ९७ धावांचा वाटा उचलला. तनिष्काने ७९ धावा केल्या. त्यानंतर दीया व कर्णधार सोनिया मेंढिया यांनी १६० धावा जोडल्या. त्यात दीयाच्या ९८ धावा होत्या. त्यानंतर दीयाने १४७ चेंडूंत २०६ धावांची नाबाद खेळी केली.



लक्ष्याचा पाठलाग करणाऱ्या त्रिपुराला रागिणी लाथवालने ९व्या षटकात धक्का देत अनुष्का शील हिला ९ धावांवर बाद केले. त्यानंतर अमनदीप कौर व गुलशन अली यांनी प्रत्येकी २ बळी घेत त्रिपुराची अवस्था बिकट केली. रितू देवीच्या ३ बळींनी त्रिपुराला पूर्णपणे बॅकफूटवर फेकले. त्रिपुराने ५० षटकांत ९ बाद १०९ धावा केल्या आणि हरयाणाने हा सामना २४७ धावांनी जिंकला.

## वानखेडे स्टेडीयमवर दिवंगत पत्रकारांचा सन्मान

**| मुंबई | क्रीडा प्रतिनिधी |**

मुंबईतील दिवंगत क्रीडापत्रकारांचा गौरव म्हणून मुंबई क्रिकेट असोसिएशनने वानखेडे स्टेडियमच्या पत्रकार पक्षातील भिंतीवर दिवंगत क्रीडा पत्रकारांच्या नावाची मानगौरव यादीचे अनावरण कले आहे. मुंबई क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अजिंक्य नाईक आणि त्यांचे सहकारी यांनी बुधवारी (दि.४) एका समारंभात भिंतीवरील या मानगौरव यादीचे अनावरण केले.

इंग्लंड, ऑस्ट्रेलिया आणि अन्य काही देशांमध्ये, क्रिकेट स्टेडियममधील पत्रकार कक्षात येथील दिवंगत क्रीडासमालोचक आणि पत्रकारांच्या नावाची यादी कायम झळकत असते. आता मुंबई क्रिकेट असोसिएशनने देखील वानखेडे स्टेडियमच्या पत्रकार पक्षातील भिंतीवर दिवंगत क्रीडा पत्रकारांच्या नावाची यादीचे अनावरण करून त्यांना सन्मानित केली आहे. त्यांच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत असून, भारतातील अन्य क्रिकेट स्टेडियममध्ये देखील तेथील दिवंगत क्रीडापत्रकारांची नावे लावण्यात येतील, अशी शक्यता वर्तविली जात आहे.





वानखेडे स्टेडियमच्या पत्रकार पक्षातील दिवंगत क्रीडा पत्रकारांच्या यादीत टाइम्स ऑफ इंडियाचे के.एन. प्रभू, सुंदर राजन, जी. के. मेनन, प्रदीप के. विजयकर, गिरीश दीक्षित, विल्यम कुटो, महाराष्ट्र टाईम्सचे व्ही. करमरकर, चंद्रशेखर पी. संत, नवभारत टाईम्सचे शिवशंकर सिंग, इंडियन एक्सप्रेसचे रॉन हेंड्रिक्स, ए.टी.पी. सारथी, राजन बाला, सबी फर्नांडिस, लोकसत्ताचे सूर्यकांत फातर्फेकर, आत्माराम मोरे, फ्री प्रेस जर्नलचे एस. के. शाम, थॉमस रोचा, प्रेस ट्रस्ट ऑफ इंडिया (पीटीआय) चे एस.व्ही. शेषाद्री, युनायटेड न्यूज ऑफ इंडियाचे सुहास के. आगाशे, गौतम साठे, मुंबई समाचारचे दारा पोचखानवाला जन्मभूमी/प्रवासीचे सुरेंद्र मोदी, क्रीडाविश्वचे हरेश मुनवाणी, हिंदूचे विवेक बेंद्रे, स्पोर्ट्स वीक/मिड-डेचे शरद कोटणीस, इलस्ट्रेटेड वीकली ऑफ इंडियाचे राजू भारतन, दैनिकचे जावेद अख्तर, यांच्यासह मुक्त क्रीडा पत्रकार डिकी रत्नागर, ए.एफ. सी. तल्यारखान, अनंत सेटलवाड, सुरेश सरैया, द्वारकानाथ सांझगिरी, जयंत नेने, विनोद वासुदेव, अल्बर्ट डिसोझा व गोपाळ भट यांचा समावेश आहे.

## गांधीनगरमध्ये रंगणार खेळाडूंची कसोटी

### महाराष्ट्रच्या गोविंद शर्मांची निवड समितीवर वर्णी

**| मुंबई | क्रीडा प्रतिनिधी |**

भारतीय मातीतील अस्सल आणि वेगवान खेळ असलेल्या खो-खोचा आंतरराष्ट्रीय थरार पुन्हा एकदा रंगणार आहे. भारत, नेपाळ खो-खो कसोटी मालिका २येत्या मार्च महिन्यात खेळविण्यात येणार असून त्यासाठी भारतीय संघाची निवड करण्यासाठी भारतीय खो-खो महासंघाने जोरदार तयारी सुरू केली आहे. मैदानावर घाम गाळणाऱ्या आणि चपळाईने खेळणाऱ्या खेळाडूंनाच संधी मिळावी, या उद्देशाने महासंघाने अत्यंत अनुभवी आणि प्रभावी निवड समितीची घोषणा केली आहे. महासंघाचे सरचिटणीस उपकार सिंग विर्क यांनी सांगितले की, खेळाडूंची निवड ही केवळ नावावर नव्हे तर मैदानावरील प्रत्यक्ष कामगिरी, तांत्रिक कौशल्य आणि शारीरिक क्षमता यावर आधारित असेल.

भारतीय संघाच्या निवडीसाठी महासंघाने देशभरातील अनुभवी आणि नामांकित व्यक्तींना एकत्र आणत दिग्गजांची भक्कम फळी उभी केली आहे. या समितीचे नेतृत्व सुधांशू मित्तल हे चेअरमन म्हणून करणार आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली उपकार सिंग विर्क, गोविंद शर्मा, संजीव शर्मा, विकास हुडा, संजीव कुमार, सुनिता राणी, नीतू राणी, सुषमा सारोलकर, एम. नटराजन आणि नेताई कर हे सदस्य म्हणून काम पाहणार आहेत. या अनुभवी तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय संघाची निवड अत्यंत काटेकोर पद्धतीने केली जाणार आहे. या निवड प्रक्रियेचे केंद्रबिंदू गुजरात-गांधीनगर येथील स्पोर्ट्स अथॉरिटी ऑफ इंडिया प्रादेशिक केंद्र हे ठरणार आहे. निवड समिती गुरूवारी (दि.५) सायंकाळी येथे दाखल झाली असून दि.६ आणि ७ मार्च रोजी खेळाडूंच्या कौशल्याची सखोल चाचणी घेतली जाईल. या चाचण्यांमध्ये आक्रमण, संरक्षण, वेग, तांत्रिक कौशल्य, सहनशक्ती आणि निर्णयक्षमता यांचा बारकाईने आढावा घेतला जाणार आहे. राष्ट्रीय प्रशिक्षण शिबिरात सराव करणाऱ्या खेळाडूंना या निवड प्रक्रियेत आपली क्षमता सिद्ध करण्याची सुवर्णसंधी मिळणार आहे.

## रूद्रज् वॉरिअर्स ठरला मानकरी



• (छायाचित्रः नंदकुमार मरवडे)

**| खांब| प्रतिनिधी |**

रोहा तालुक्यातील नडवली येथे होळी व धुळवड सणाचे औचित्य साधून नडवली प्रिमियम लिगचे आयोजन करण्यात आले होते. या लिगमध्ये एकूण ६ संघ सहभागी झाले होते. या स्पर्धेचा मानकरी रूद्रज् वॉरिअर्स हा संघ ठरला आहे.

या स्पर्धेचे उद्घाटन माजी सरपंच मनोज शिर्के यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सर्वश्री जाधव, श्रीपत शिर्के, केशव मोहिते, किशोर जाधव, प्रकाश जाधव, अशोक शिर्के, नितीन मोहिते आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच, या स्पर्धेत श्रीशा इलेव्हन या संघाला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. तर, स्पर्धेतील मालिकावीर म्हणून रुद्रा वॉरियर्स संघाचा अष्टपैलू खेळाडू सुमित जाधव याची निवड करण्यात आली. तसेच, उत्कृष्ट फलंदाज नितीन भोसले, उत्कृष्ट गोलंदाज साहिल गोठम, तर उत्कृष्ट क्षेत्ररक्षक म्हणून गणेश बामणे यांना गौरविण्यात आले. या प्रिमिअर लिगच्या यशस्वीतेसाठी नडवली येथील सर्व क्रिकेट खेळाडूंनी मोलाचे सहकार्य केले.

**क्रीडा उद्योग विकास विभागाची स्थापना | चेअरमनपदी सुनील वालावलकर यांची निवड**

# महाराष्ट्राच्या क्रीडा अर्थक्रांतीची दमदार सुरुवात

**| मुंबई | क्रीडा प्रतिनिधी |**

महाराष्ट्राच्या क्रीडा क्षेत्रात आज ऐतिहासिक क्षणाची नोंद झाली आहे. क्रीडा अर्थव्यवस्थेला नवे पंख देणाऱ्या निर्णयांची नांदी मुंबईत रुजवली. उद्योग, गुंतवणूक आणि उद्योजकतेच्या नव्या पर्वाची मुहूर्तमेढ रोवत महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड ॲग्रिकल्चरने क्रीडा उद्योग विकास विभागाची अधिकृत स्थापना केली. शतक महोत्सवी वर्ष साजरे करणाऱ्या एमएसीसीआयएने या उपक्रमाद्वारे क्रीडेला औद्योगिक ओळख देत राज्याच्या क्रीडा अर्थव्यवस्थेला नवी दिशा दिली आहे. या क्रीडा उद्योग विकास समितीची घोषणा बुधवारी (दि.४) एमएसीसीआय अध्यक्ष रवींद्र माणगावे यांनी केली.

एमएसीसीआयएनेच्या शतक महोत्सवी वर्षात क्रीडा उद्योग विकास विभागाची स्थापना हा एक दूरदृष्टीपूर्ण निर्णय मानला जात आहे. औद्योगिक, कृषी आणि व्यावसायिक क्षेत्रात भक्कम कार्य करणाऱ्या एमएसीसीआयएने आता क्रीडा क्षेत्रालाही उद्योगाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा निर्धार केला आहे. या समितीवर क्रीडा क्षेत्रातील सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मजबूत करण्याची



महत्त्वाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. तसेच, क्रीडा उद्योगात गुंतवणूक वाढविणे, क्रीडा सुलभता पायाभूत सुविधांसाठी सार्वजनिक-खासगी-भागीदारी मॉडेल राबविणे, क्रीडा तंत्रज्ञान आणि उत्पादन क्षेत्रात नवउद्योजकांना प्रोत्साहन देणे, यांसारख्या महत्त्वपूर्ण मुद्द्यांवर समिती विशेष लक्ष केंद्रित करणार आहे. यासोबतच क्रीडा क्षेत्राला अधिकृतपणे उद्योगाचा दर्जा मिळावा यासाठी शासनाकडे विविध उपाययोजना आणि धोरणात्मक प्रस्ताव सादर केले जाणार आहेत. चेअरमन सुनील वालावलकर, सह-चेअरमन मंदार वैद्य, सदस्य क्षितिज वेदक, बाळासाहेब तोरसकर, विपुल सोळंकी, वैशाली भिडे-बर्वे, पौलोमी कुंडू, तसेच एमएसीसीआय अध्यक्ष रवींद्र माणगावे आणि उपाध्यक्ष करुणाकर शेट्टी हे पदसिद्ध पदाधिकारी म्हणून समितीला मार्गदर्शन करणार आहेत. त्यांच्या अनुभवसंपन्न नेतृत्वामुळे या विभागाच्या कामाला अधिक बळ मिळणार आहे.

### महाराष्ट्र क्रीडा उद्योगाचे केंद्र बनणार

या नव्या विभागाच्या माध्यमातून राज्यातील क्रीडा क्षेत्राला व्यावसायिक बळ मिळणार असून रोजगारनिर्मिती, गुंतवणूक वाढ आणि जागतिक संधींचा मार्ग अधिक सुलभ होणार आहे. महाराष्ट्राला देशातील अग्रगण्य क्रीडा उद्योग केंद्र बनविण्याच्या दिशेने हे पाऊल निर्णायक ठरणार असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. तसेच, एमएसीसीआयच्या क्रीडा उद्योग विकास विभागाच्या स्थापनेमुळे महाराष्ट्राच्या क्रीडा क्षेत्रात उद्योगाभिमुख परिवर्तनाची प्रक्रिया सुरू झाली आहे. धोरणात्मक विचार, सक्षम नेतृत्व आणि व्यापक दृष्टीकोन यांच्या बळावर क्रीडा क्षेत्र राज्याच्या अर्थव्यवस्थेत महत्त्वपूर्ण योगदान देईल, अशी आशा व्यक्त होत आहे.

> **“नवस्थापित क्रीडा उद्योग विकास विभाग क्रीडा क्षेत्राला केवळ खेळापुरते मर्यादित न ठेवता, ते उद्योजकता, रोजगारनिर्मिती, गुंतवणूक आणि आंतरराष्ट्रीय सहभाग निर्माण करणारे सक्षम आर्थिक क्षेत्र म्हणून विकसित करण्यासाठी कार्यरत राहणार आहे. राज्यातील क्रीडा उद्योग अधिक संघटित, व्यावसायिक आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचा व्यापक रोडमॅप या विभागाद्वारे राबविण्यात येणार आहे**
> **– रवींद्र माणगावे, अध्यक्ष, एमएसीसीआय”**

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)